पाठक, ड. आ. (n.d.). प्राचीनभारतीयशिक्षा.नईदिल्ली: कनिष्कपब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स.

बृहदारण्यकउपनिषद. (n.d.). Retrieved from hi.m.wikipedia.org.

भगवद्गीता . (n.d.). भक्तीवेदांतबुकट्रस्ट.

भट्ट, प. र. (n.d.). हितोपदेशः.दिल्ली: चौखम्बासंस्कृतप्रतिष्ठान.

म., ज. (२००१). भारतीयसांस्कृतिककोष .पूणे: अनमोलप्रकाशन.

व्या. डा. हरिदत्तशास्त्री, स. व. (n.d.). ऋग्वेदादिभाष्यभूमिका.वाराणसी.

श्रीनारायणराम्आचार्य, क. न. (१९९९ (द्वितीयआवृत्ती)). सुभाषितरत्नभांडागारः३०/१३.मुंबई : काव्यतीर्थ, निर्णयसागरप्रेस१९९९ (द्वितीयआवृत्ती).

सभा, स. प. (n.d.). सामवेद.आजमेर.

सायणभाष्य, च. स. (n.d.). ऋग्वेद.वाराणसी.

****

Manuscriptology and Linguistic History of Bengali Language, i.e., Bangla Bhasha.

Debabrata Santosh Kumar Chatterjee,
Dr. Nanda Puri

ABSTRACT

In olden times the Eastern and North Eastern part of Bharat, i.e., India was known as Gaud Desh or/and Gaud Bangal.

The word Gaud has been derived from Gur means Jaggery made from sugarcane and many others like Date, Palm etc.

Banga is derived from Vangnsha or Bansha, i.e., Bamboo. This region is full of Rivers, Lakes and Ponds, Forests. People of many ethnic groups were residing here. Various varieties of dialects were in prevail. Rainfall is abundent. Language, i.e., Bhasha of the residing people evolves from the regional soil, interaction of the people with other groups, communication, transportation, migration, war, battles, business, marriages. Bangla has a few cognate languages, Assamese, Oriya, Bishnupriya Manipuri, Magdhi, Maithili and Bhojpuri. They form a liguistic group. The then Gaud Banga originated Eastern Prakrit.

They are derivative of Indo Aryan as well as Indo European brances, viz., old Indo Aryan.

Middle Indo Aryan, and New Indo Aryan alongwith their substages. Bangla Bhasha is outcome of New Indo Aryan.

Some Dohas of Tantrik Buddhists, Nathis, Saivaites, Jainas are found as the oldest written documents. They were of transition period. Researchers find limitation while tracing the ground development from pre-buddhist period to Apabhramsa, Avahatta to the historic period of Bengal.

Resource Centre for Indian Laguages Technology solutions, in Indian Statistical Institute, Kolkata and some Universities are conducting penetrating research.

Bangla has Sadhu Bhasha and Chalit, i.e. colloquial bhasha. The writing is left to write. Vowels and consonants are like Sanskrit. Lipi is completely different. It has 12 vowels and 50 consonants. The script of modern Bangla Bhasha has a long journey with several break even points in its history.

We can take Brahmi Script as the base script, from it evolved Northern Script. During the reign of Kushenas Techarian Maitrie Mayek and GUPTAS

many documentation works were done, which can be found in various places with inscriptions, coins etc.

From time of Guptas several Lipis were derived in different regions of the then India. (From Burma, i.e. Myanmar to beyond Afganistan, No Pakistan, No Bangladesh.

Sarada Script, Siddham Script, Proto Bangali, Nagari.

From Proto Bangali and combined with Siddham Script, the Eastern Nagari Script is derived. From this Eastern Nagari Script the modern Assamese and Bengali Scripts were born. The parental system can be traced as follows –

Proto Synatic alphabet
Pheonician alphabet
Aramaic alphabet
Brahmi
Gupta
Sarada
Siddham – Kutila lipi
Proto Bengali
Bengali

The type of Bengali Script and language is ABUGIDA.

An abugida is a kind of syllabary in which the vowel is changed by modifying the base consonant symbol, so that all the forms that represent a given consonant plus each vowel resemble one another

e.g. क् + अ = क

Alphabets has horizontal line known as Matra running along the tops of the letters that link them together. It is less blocky and appear in sinuous shape, i.e., wavy circuitous is currently used in Bangladesh, West Bengal and by Migrants. It is spoken by 230 million native speakers and another 37 million as second language speakers. Bengali is the fifth most spoken native language and the seventh most spoken language by total number of speakers in the world.

Bengali Script has gone through much metamorphosis in last several centuries, much alterations have been observed through passing of time and socio-cultural influence Invention and introduction of new writing materials, writing instruments, Inks, Colours, influences of French, Portugese, Islam, Muslim, British, and lastly printing press and now computerised desktop publication have tremendous impact and influence in the lipi and language.

A Quick Cultural Assimilation has become order of the day.

****

Role of English Language in Sanskrit Universities for disseminating Sanskrit Language

Dr. Shweta Sharma

Abstract

The present paper deals with the Role of English Language in Sanskrit Universities. The transformative influence of English Language is well known not just in India but globally as well. Sanskrit being the mother of all languages has been ignored for various reasons which resulted in shattered educational policies and ultimately rootless intellectual scholars. The present paper attempts to throw light on historical perspective behind such drawbacks with reformative solutions. An attempt has also been made to analyse the use of English Language for disseminating Sanskrit knowledge treasure. There are two aspects for learning English language one is Ideal and other is practical. Practical aspect deals with First- English is a Global Language, Second- Learning of English improves employability and third- the most important one is for the purpose of Sanskrit.

Key words: English, Disseminating, Sanskrit, Language, knowledge, Treasure

An overview of both (English and Sanskrit) Languages

In India, English is seen not just as a language but as a pathway to come out of poverty and oppression. Indian consciousness is affected with this peculiar conviction, among almost all castes and classes, in both rural and urban part of India, in the transformative influence of English Language. The challenges of providing universal access to English are significant, English language is globally recognized, popular and readable. This is why even a nation like Germany has adopted English without German. Eventually, we cannot ignore the way in which English language has emerged as a powerful agent for change in India. But is wasn't so few centuries back, India has its own language and own knowledge system.

Sanskrit may not be the language of science and technology, in today's scenario but it cannot be discounted as a language not associated with Science and technology. It is a repository of great part of our cultural heritage. The source or root of Sciences, including Physics, Chemistry, Botany, Zoology, Mathematics, Agriculture, Environmental Science, Architectural Science (vastu-vidya), Geometry, Astrology, Metallurgy, Medicine, Meteorology, etc. [1]

The grammar of Sanskrit gives a very structured and logical view of the world and if taught properly, could help in the cognitive development of young

learners. Moreover, one of the benefits of learning Sanskrit early is getting used to different sound patterns. Sanskrit language exposes learners to the grapheme–phoneme or sound-symbol combination in a very logical manner and as such enables the pronunciation of all different kinds of sounds. Thus, learning Sanskrit early in life gives the training needed to speak any language be it English or German, with the correct pronunciation. Sanskrit is the mother of all Indian languages and as such the exposure to Sanskrit could give the much-needed impetus to learn any other language be it Indian or foreign.

One major argument for Indians to learn Sanskrit could be to get access to the vast treasure of knowledge stored in the ancient texts written in Sanskrit. Right from Rig Veda to the now famous texts on Yoga to Chanakyaniti are all written in Sanskrit. The irony is that these ancient texts have been originally translated by Western scholars. Although the value of these translations cannot be undermined because they have been instrumental in uncovering the gems hidden in these texts. However, the fact remains that an 'emic' approach to interpret and disseminate the texts would certainly add more value to the knowledge stored in the texts. Not to mention that there are still many ancient Sanskrit texts crying out for translation to reach a wider audience. The present paper deals with the need of learning English Language for Sanskrit Scholars or students. Being English Teacher in Sanskrit university, this attempt has been made to explore the expected benefit of learning English Language for Sanskrit university.

Need of Exploring the Role of English Language for the Sake of Sanskrit

Now the question arises why do we need English Language in Sanskrit universities? There are two aspects for learning English language one is Ideal and other is practical. The ideal approach, conveys that it is an enriching experience to have knowledge of other languages and it is scientifically proven also that a student having knowledge of more than one language is always brighter. Frank Smith says "One language sets you in a corridor for life. Two languages open every door along the way."[2]While explaining the practical approach, one must envisaged three reasons- First- English is a Global Language, It is the world's second largest native language, first international language, the official language in 70 countries, and English-speaking countries are responsible for about 40% of world's total GNP.[3]English is the mother tongue of 380 million people, and it is used worldwide by the newspapers, magazines, scientists, businessmen, and politicians. One billion to 1.5 billion people around the world presently speak English. It is the most widely language in 70 countries.[4] Second- Learning of English improves employability: Proficiency in English language opens new gates of job prospects. It's a fact that most interviews are conducted in English. Most of the interviewers make their judgment by the proficiency of English

language of that person instead of actual knowledge. According to some According to research from the US, those who speak English as a second language can command a wage increase of up to 30%, while those who have mastered it can earn 67% more.[5]

English being the most commonly used language in the corporate world; the knowledge of English is one of the most important employability skills. Knowledge of English is much sought after in the corporate world. Proper English does not mean only the ability to make grammatically correct sentences. It means other related skills for effective communication like presentation skills, convincing and negotiation skills and interpersonal skills using that language.[6] and third- the most important one is for the purpose of Sanskrit: As Sanskrit is our Intellectual Heritage which can be regained and preserved only with the use of English. English Language must be learned in order to rejuvenate Sanskrit language and for disseminating Sanskrit globally. Nani Palkhiwala rightly states it has been a long standing conviction that India is like a Donkey carrying a sack of gold- the donkey does not know what it is carrying but is content to go along with the load on its back.[7] It has been considered so because Indian knowledge was hidden in the Sanskrit language only. Even our young generation is reluctant to learn this language as it is not related to employability. The purpose of language is communication and exchange of ideas. Through the study of these two languages(Sanskrit and English), through the exchange of scriptures and the exchange of knowledge, Indian scholars can expand field of study and spread Sanskrit globally. Blending Sanskrit with English will open new possibilities for career and research internationally.

Historical Retrospect

The current situation of Sanskrit Education is very clear to us these is no need to look at the past and we are concerned about the present situation. But some of our present problem of Sanskrit Education have their root deep in the past and cannot be properly understood without proper historical retrospection. Sanskrit Education continued to be the common all-India medium of communication among the educated and the means of maintaining an all-India paradigm in literary execution and production, even in ·modern Indian languages.

With the predominance of Muslim power, a foreign language became, for the first time, the language of court-life and wide administrative use in revenue, legal and other departments. However, this dominance of Persian, though it had its effects on Sanskrit, could not extricate the Sanskrit language from its established position. It was only when the British brought in a complicate administrative machinery and introduced a new policy of education that turned the table completely which leads to the rapid decline of Sanskrit learning. It is, therefore, necessary to specify here, the most protuberant landmarks in the

history of modern education, so that the fortunes of Sanskrit during the last hundred and fifty years may be clearly followed and its present problems escalated in their proper viewpoint. Even when the modern Indian languages were developing, Sanskrit continued its course of creative activity, particularly in the realm of religious and philosophical literature, and its prestige was not at all on the wane. India has been ruled by many invaders including Mughals, Portuguese and Dutch but there was no change in Education system during their region. Even at the time of East India Company rule first 100 years they were only body of merchants and they did not undertake and educational activity.

It was only in 1698 that, in terms of the· Charter Act of that year, the Company was forced for the first time, to turn its attention to educational matters. The Charter Act required the Company to maintain priests and schools in its garrisons--a provision, which was, of course, intended solely for the children of the Company's European servants.[8]

The first change in education system occurred with the establishment of the Banaras Pathasala or Hindu College, in 1791 which is later known as Banaras Hindu College. The purpose was to endear themselves (British) to the Hindu group in order to rear a group of learned scholars who will assist them in administration and laws. So initially there was no major change in education and initiation of new universities found favourable for Sanskrit Studies. It was in 1813 the study of English language was introduced. By introducing both the studies the intension was to have a healthy combination of Western and Eastern knowledge. With the combination of both western and oriental thought, it was intended to produce a scholar capable of using both the general advancement of Sanskrit learning. This formulae of blending both the studies worked very well but this idea is abolished after few decade due to a controversy.

It was at this stage that a controversy arose between G. Thibaut and Pramada Das Mitra on the question of the ideal Sanskrit scholar. Thibaut wanted to convert the Pandit into an accomplished Sanskrit scholar of the Western type by making his knowledge fertile in the direction of independent research. To attain this object he thought that English should be studied as a means to understanding Western Sanskrit scholarship.[9] As against this, Mitra wanted to superimpose English and Western thought on Sanskrit learning by making an Indjan scholar of Sanskrit first become a finished 15 Pandit and then take to English and European studies. · It was thus -a question of fusion vs. superimposition.[10]

Such controversies didn’t hamper the growth and research in Sanskrit Education much but it was at the time of establishment of Banaras Sanskrit College a new tendency in educational policy was becoming evident in India Charles Grant, who had been the Secretary of the Board of Trade created by

Warren Hastings wrote in 1792 a tract called Observations on the State of Society among the Asiatic Subjects of Great Britain particularly with respect to Morals and on the Means -of improving it. In that work, Grant pronounced his highly damaging judgement on India, and prosed that the panacea for the moral, historical retrospect suggests, communication of our knowledge by the medium of our language. Since that time western knowledge is coming only through English Language.

Lord Bentinck, the Governor-General, endorsed Macaulay's views, and in his Resolution of 1835, reported “We must at present do our best to form a class who may be interpreters between us and the millions whom we govern; a class of persons, Indian in blood and colour, but English in taste, in opinions, in morals, and in intellect. To that class we may leave it to refine the vernacular dialects of the country, to enrich those dialects with terms of science borrowed from the Western nomenclature, and to render them by degrees fit vehicles for conveying knowledge to the great mass of the population”[11]

In an extreme fanaticism for Western education, it was forgotten that the attitude was severing national education from the roots of national existence. No doubt such a spur was furnished by Western education and was needed at the moment, and it was right that such a stimulus was eagerly sought. It would not be just to deny that Western education had been productive of immense benefit; without it we would have been out of date in an advancing world. But in the educational policy, which was hastily enunciated in the last century, no attempt was made to adapt the old learning to changing social and political needs, or the new learning to national sentiment and development. It was never realised in the past and even after independence it was equally ignored that Oriental learning and culture had their roots in the national consciousness and could not be so easily dismissed; and that it would not be wise to replace it entirely by Western education, however necessary and useful it might have been.

In the light of such historical commemoration English can be considered as tool to unveil the real treasure of knowledge which is part of Indian consciousness. The aspirations of a free Indian people, it was thought could be best expressed through Sanskrit, functioning through the Modem Indian Languages.

Reason behind current status of English Language:

British has colonies throughout the world and consequently their language was adopted by the natives. Many countries were colonized and India is one of them and being the language of ruler or colonizers, English left a mark on people across the globe. India was colonized for more than 300 years. As we start exploring the process of policy making about language in Indian Context, few

issues like implementation and role of English language in primary and higher education attract our attention.

According to Indian Constitution, Every citizen of India has equal linguistics rights, that is same for the minority both religious and linguistics. Minorities are granted a special right to be educated in their mother tongue. Despite of this accord, there are many controversies in the education and political front regarding the implementation of these constitutional provisions.

Multilingualism in NEP as a ray of hope:

The national language policy (or strategy) for school education, the three-language formula recommended by the National Commission on Education 1964–1966, was incorporated into the national education policies of 1968 and 1986. Accepting at least three-languages in school education has been seen as a convenient strategy, but concerns have also been expressed from various quarters about its 'unsatisfactory' implementation. English should not be introduced earlier than class V. The precise point at which English should be started at the middle stage was left to each individual state to decide[12]. In a way an associate official language, English knowingly or unknowingly has played an influential role in maintaining the diversity of India's language scene because the existence of English has meant that it has not been necessary to select any one Indian languages as a national language. In fact, the states which used to rally to slogans such as angriji hatao (remove English) are now eagerly introducing English in the first year of schooling.

It is better to have English taught as a subject rather than insist a false English medium education. Equipping English language education with the essentials in the native medium schools would benefit learning in general and language learning in particular. But converting schools to become English medium without proper support would be detrimental and counterproductive. Schools can be developed as multimedia schools where both the content subjects and the language are taught and learnt well in a complementary and supplementary manner. A 'language across the curriculum' perspective and a strategy of multilingualism would be of benefit on many counts. The centrality of language in learning needs to be recognised. English, then, can play a vital role as a language of mutual benefit – benefiting Indian languages as well as itself – and so enriching education as a whole.

The emphasis on multilingualism in the New Education Policy 2020, is evident in the use of the term more than 200 times in the whole 66-page document. Against this backdrop of multilingualism Sanskrit language as the bearer of culture and identity appears to have failed to mark its presence. Some may argue that

learning Sanskrit is perhaps not relevant in 21st century India, as she marches towards reaching new heights in fields of science and technology.

National Education Policy 2020 has stressed this need for translation and has proposed the idea of an Institution for Translation. This Idea implementation will require scholars with knowledge of different languages especially Sanskrit and English. So there is need of Indians who have knowledge of Mother as well as Sanskrit so that the hidden treasure of our knowledge heritage will be explored and disseminated globally. Now the question remains how Indians will be motivated to learn English and Sanskrit as both are considered difficult by general masses of Indian street.

There is no issues with English as it always enjoys privileged status because of its Economic and Social advantages. Now Sanskrit being the language of Indian culture and identity is at being seen as third choice and in many times may fail to draw attention of students. According to National Education Policy 2020, States have choice to introduce Sanskrit, under the trilingual policy, as a language through primary and secondary education.

Though, the real identity of India which is perhaps congruent with learning Sanskrit and disseminating its knowledge throughout world. Now this cannot be done only through making policies and shifting blame to Central or State governments. While the National Education Policy 2020 has rightfully pinned a lot of hope on multilingualism one can only wish that Sanskrit survives amidst the cacophony of languages striving to prove their worthy place in the education system. Otherwise, it will be like losing the mother amid the crowd of glamour. English can come out as a source to rejuvenate mother (Sanskrit Language) globally.

References:

1. Relevance of Sanskrit in the Modern Age- A Realistic Approach, Dr. N.C. Panda in Importance of Sanskrit Language Volume 1 July 14
2. https://becausewordsmatterblog.com/2019/05/09/
3. "Why Is English Considered a Global Language?." ukessays.com. 11 2018. UKEssays.
4. David Crystal (2003). English as a global language. Cambridge: Cambridge university press(4)
5. https://www.english.com/blog/learning-english-can-make-employable
6. Better English for Better Employment Opportunities, Dr. Meenu Pandey & Dr. Prabhat Pandey, International Journal of Multidisciplinary Approach and Studies, August 2014.
7. Elst, Koenraad (2014). Decolonizing the Hindu mind: Ideological development of Hindu revivalism. New Delhi: Rupa., p. 10[7]

8. Report of Sanskrit Commission, 1956-57, Printed in India by the Manager, Govt. of India Press, Nashik Road, published by Manager of Publication Delhi. 1958, p. 12
9. Report of Sanskrit Commission, 1956-57, Printed in India by the Manager, Govt. of India Press, Nashik Road, published by Manager of Publication Delhi. 1958, p. 14
10. Report of Sanskrit Commission, 1956-57, Printed in India by the Manager, Govt. of India Press, Nashik Road, published by Manager of Publication Delhi. 1958, p. 15
11. Oxford Essential Quotation(4th Edition) Edited by Susan Ratcliffe, Oxford University Press 2016
12. Agarwal, S.P. (ed.). 1993. Commissions and Committees in India, Volume 5. New Delhi: Concept Publishing Company.12

Reference Books:

1. A Language of History: Sanskrit Narratives of A Muslim Past, book by Audrey Truschke , Penguin Publisher,2020
2. Ideology and Status of Sanskrit: Contributions to the History of the Sanskrit Language,Author, E.J.Brill, Editor: Jan E. M. Houben Originally published: 1996
3. The Sanskrit Language: An Overview : History and Structure, Linguistic and Philosophical Representations, Uses and Users book by Pierre-Sylvain Fillozat published in 2000.
4. Status of English in India,by Dr. Jyoti Das 24by7 Publishing; 1st edition (14 February 2019)
5. An English Made in India: How a Foreign Language Became Local, Kalpana Mohan,published by aleph book Company,2019.

****

उत्तररामचरितावरील पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांच्या भावभूतार्थबोधिका टीकेची वैशिष्ट्ये

सौ.अंजली सुनील जोशी,
प्रो.नन्दा पुरी

सारांश

अभिजात संस्कृत नाटकांमध्ये भवभूतिविरचित उत्तररामचरित हे नाटक अजरामर ठरले करूण रसाचा उत्कर्ष गाठीत सहृदयांच्या हृदयाचा भेद घेणारे , भवभुतिच्या घनगंभीर भावाशयाने युक्त असे हे नाटक लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर पोहोचले . शब्दब्रह्मविद् वश्यवाक् कवीच्या भावविश्वाचा वेध घेत काव्यातील आशय उलगडण्याच्या दृष्टीने उत्तररामचरितावर प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यन्त अनेक उत्तमोत्तम टीका लेखन झाले. उत्तररामचरिताचा खरा आस्वाद घेण्यासाठी त्यावर लिहिण्यात आलेल्या टीका साहित्याच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरतात. उत्तररामचरित नाटकातील भाव तथा सत्य अर्थाचा बोध करून देणारी तसेच अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण भावभूतार्थबोधिका नावाची टीका पंडित भटजी शास्त्री घाटे यांनी लिहिली. साहित्यप्रेमी अभ्यासकांसाठी मोलाचे कार्य करणारे श्रीयुत भटजी शास्त्री घाटे हे महाराष्ट्रीय टीकाकार विदर्भ देशातील नागपूरचे रहिवासी होते. घाटे शास्त्रींची भावभूतार्थबोधिका टीका अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असून साहित्याच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शक आहे. प्रस्तुत टीकेचे महत्त्व तथा अनन्यसाधारणत्व लक्षात घेत या लेखात घाटे शास्त्रींच्या भावभूतार्थबोधिका टीकेतील वैशिष्ट्यांवर दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे.

उदृष्टे पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांची उत्तररामचरितावरील भावभूतार्थबोधिका टीका भवभूतीच्या भावाशयाचा वेध घेणारी टीका असून ही टीका वैशिष्टयपूर्ण आहे. साहित्याच्या अभ्यासकांना मार्गदर्शक असणाऱ्या या टीकेचे अनन्यसाधारणत्व व महत्त्व सांगणे हे प्रस्तुत लेखाचे उद्दिष्ट आहे. प्रस्तुत टीका 1895 मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. त्यास शंभराहून अधिक वर्षे लोटली असून प्रस्तुत टीकेसहित असलेली उत्तररामचरिताची प्रत सद्यस्थितीत दुर्मिळ आहे.

प्रस्तावना :-

भवभूतीविरचित उत्तररामचरित नाटकावर प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत अनेक टीकालेखन झाले. विदर्भातील नागपुरचे रहिवासी पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांनी एकोणिसाव्या शतकात उत्तररामचरितावर "भावभूतार्थबोधिका" नावाने टीका लेखन केले . प्रस्तुत टीकेवर एम. फिल्. या पदवीसाठी लघुशोधप्रबंधाचा विषय म्हणून "उत्तररामचरितावरील पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांच्या भावभूतार्थबोधिका टीकेचे समीक्षणात्मक अध्ययन" करण्यात आले असता प्रस्तुत टीकेतील अनेक वैशिष्ट्ये दृष्टिगोचर झाली.प्रत्येकच वेळी प्रस्तुत टीकेचा अभ्यास करताना टीकेतील नवनवीन पैलू दृष्टोत्पत्तीस पडतात. सर्वप्रथम डॉ. नंदा पुरी यांच्या 'दोन दुर्मिळ

टीकाकार' या शोधलेखात प्रस्तुत टीकेबद्दल माहिती प्राप्त झाली.तसेच नागपुरातील ज्येष्ठ अभ्यासक आचार्य डॉ. म. रा. जोशी यांनी प्रज्ञालोक मासिकात अनेक वर्षांपूर्वी "घाटे भटजीं यांची भावभूतार्थबोधिनी "शोधलेख लेखन केल्याचे संदर्भ प्राप्त झाले."अभिजात नाट्यवरील टीकासाहित्य" या शोधप्रकल्पातून "घाटेभटजी भावभूतार्थबोधिनी"" यातून देखील टीकेची माहिती प्राप्त झाली. तसेच हिंदू धर्म मंदिर, धंतोली, नागपुर येथून उत्तररामचरिताची भावभूतार्थबोधिनी टिकेसहित असलेली उत्तररामचरिताची Xerox प्रत प्राप्त करण्यात आली. मार्गदर्शिका डॉ. नंदा पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली "भावभूतार्थबोधिनी टीकेचे समीक्षणात्मक अध्ययन" करण्यात आले. त्यातून भावभुतार्थबोधिका टीकेतील अनेक वैशिष्ट्ये दृष्टिगोचर झाली. प्रस्तुत लेखात भावभूतार्थबोधिका टीकेचा परिचय करून टीकेतील वैशिष्ट्यांवर दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे. प्रस्तुत टीका कवी हृदयातील भावशयाचा वेध घेणारी असून टीकाकारांनी काव्यातील रस, भाव, ध्वनी यांचे विस्तृत विवेचन केले आहे. काव्यातील सौंदर्याचा वेध घेणारी व साहित्यिक मूल्यांचा शोध घेणारी ही टीका आस्वादक पद्धतीची असून साहित्यप्रेमींना रसास्वादन करून देणारी आहे. साहित्याच्या अभ्यासकांसाठी ही टीका अत्यंत उपकारक असून मार्गदर्शक आहे.

टीका व टिकाकाराचा परिचय

पंडित भट्टजी शास्त्री घाटे हे महाराष्ट्रीय टीकाकार असून त्यांचा जन्म विदर्भातील तळेगाव दशसहस्त्र (दशसर) येथ1834 मध्ये झाला. ते नागपूरचे रहिवासी असल्याचे व भोसलेकालीन प्रकांड पंडित असल्याची माहिती आचार्य डॉ. म. रा. जोशी यांच्या "घाटे भटजी यांची भावभूतार्थबोधिनी"[1] या लेखातून प्राप्त होते. प्रस्तुत टीका 1895 मध्ये लिहिल्याचे स्पष्ट संदर्भ टीकेतून प्राप्त होतात.

अंक समाप्ती दर्शक पुष्पिकेत उत्तररामचरिताच्या सातव्या अंकाअंती दिलेल्या श्लोकातून घाटेशास्त्रींबद्दल थोडकी माहिती प्राप्त होते. केवळ तीन श्लोकात त्यांनी ही माहिती देऊ केली आहे. ते लिहितात-

अहल्यागर्भजातेन श्रीकृष्णतनुजन्मना
कृष्णशिष्येण रचिता जयकृष्णेन धीमतां ll
घाटे इत्युपनाम्नेयं भट्टजी पदलक्ष्मणा l
अत्यष्टि17 नाग 8 कु 1मिते शके
1817 याम्यायने शुभे ll
भाद्रमास्य सिते पक्षे गुर्वष्टम्यां समापिता ll
भवभूतिसरस्वत्या भावभुतार्थबोधिका ll[2]

"अहिल्यागर्भजातेन श्रीकृष्णतनुजन्मना"[3] याद्वारे त्यांच्या मातेचे नाव अहिल्या व त्यांच्या पित्याचे नाव श्रीकृष्ण असल्याचे समजते. त्यांच्या गुरुचे नाव कृष्ण असून त्यांचे प्रथम नाम जयकृष्ण व उपनाम घाटे तसेच "भट्टजी" ही

त्यांची उपाधी असल्याची माहिती टीकेतील श्लोकातून मिळते.टीकेत टीका पूर्णत्वास गेलेल्या तिथीची स्पष्टपणे नोंद केलेली आहे. शके 1817 म्हणजेच इ.स. 1895 मध्ये टीका पूर्ण झाली व 15 डिसेंबर 1895 मध्ये 'इंदुप्रकाश' मुद्रणालय, मुंबई यांनी प्रकाशित केली. प्रथमावृत्ती नंतर 17 ऑक्टोबर 1909 मध्ये प्रस्तुत टीकेसहीत असलेल्या उत्तररामचरिताची व्दितीय आवृत्ती काढण्यात आली. टीके आरंभी केवळ तीन श्लोक आहेत.

महःकिमपि मन्महे शिवमनाविनोदास्पदम्
गजास्यमुमयासदा ललितलालीतंपालीतम् ll
अमन्दमदगण्डसंमिलमिलिन्दमालाकुलम् ll
सविद्यगणपं तथा गिरमपि स्तुमः कामदाम् ll
भावभूतेनाटकेऽस्मिन् भावभूतार्थबोधिकाम् ll
टीकांकर्तुंयद्युक्तःसा ही कृष्णगुरोकृपा ll[4]

गणपतीस वंदून टीकाकाराने वाणीस वंदन केले आहे. "गिरमपि स्तुमः कामदाम"'[5]
असे म्हणून वाणीची स्तुती करीत भवभूतिच्या मार्गाचाच टीकाकाराने अवलंब केला आहे. 'ललितलालीतंपालीतम्' 'संमिलमिलिन्दमालाकुलम्'[6] या पदररचनेतून टीकाकाराने सुरेख वर्णानुप्रास साधला आहे. यातून टिकाकाराचे रचना नैपुण्य दिसून येते."भावभुतेनाटकेऽस्मिन् भावभूतार्थबोधिकां....."[7] या श्लोकातून भवभूतीच्या नाटकातील भाव तथा सत्य अर्थाचा बोध करून देणारी ही टीका असून कृष्णगुरुंच्या कृपेने टीका लेखनास उद्युक्त झाल्याचे टीकाकार सांगतात व संपूर्ण टीकालेखनाचे श्रेय गुरुस अर्पण करतात.

टीकेचे शीर्षक

"भावभुतेनाटकेऽस्मीन् भावभूतार्थबोधिकाम्"[8] या ओळीत टीकाकाराने टीका लेखनामागचे जणू उद्दिष्टच सांगितले आहे. ग्रंथलेखक ग्रंथलेखनामागचे प्रयोजन सांगतो अशी परंपरा संस्कृत ग्रंथलेखन परंपरेत दिसून येते. त्या परंपरेस अनुलक्षून टीकाकार त्यांच्या टीकालेखना मागचे प्रयोजन कथन करतात. भवभूतीच्या नाटकातील भाव व सत्य अर्थाचा बोध करून देणारी ही टीका असल्याचे टीकाकार सांगतात. तेव्हा हेच उद्दिष्ट समोर ठेवून भावभुतार्थबोधिका असे टीकेचे शीर्षक टीकाकारांनी योजले असावे.

आचार्य डॉ.जोशी यांच्या लेखात भावभूतार्थबोधिनी टीकेच्या शीर्षकाचे स्पष्टीकरण देताना लिहितात "हे नाव उत्तररामचरित नाटकातील सातव्या अंकातील सूत्रधाराच्या तोंडी आलेल्या मजकुरावरून घाटे शास्त्रींनी

स्वीकारलेले दिसते ".[9] "सूत्रधार:। भो:भो:। भूतार्थवादी प्राचेतस सजङ्गमस्थावर...."[10] यावरील टीकेत घाटेशास्त्री स्पष्टीकरण देतात -"भूतार्थवादी भूतं सत्यं अर्थम् वदती तच्छील:"[11] अर्थात सत्य अर्थ सांगणारी, व उत्तररामचरिताच्या भावाशयाचे यथार्थ स्वरूप सांगणारी व त्यातील भावबंधाचे मर्म उलगडून सांगणारी ही टीका आहे. असेच या शीर्षकातून सांगायचे असावे. आचार्य डॉ. म.रा. जोशींचे हे स्पष्टीकरण योग्य असून पटण्याजोगे आहे .भावभूतार्थबोधिका टीकेच्या शीर्षकाचे स्पष्टीकरण बघता "भवभूतेरिदं नाटकं भावभूतं तस्य अर्थ बोधिकेती भावभूतार्थबोधिका" टीका हे योग्य ठरते.

भावभूतार्थबोधिनी/भावभूतार्थबोधिका

टीकेचे शीर्षक भावभूतार्थबोधिनी आहे किंवा भावभूतार्थबोधिका अशी शंका उपस्थित होते. कारण भावभूतार्थबोधिका,भावभूतार्थबोधिनी, भावबोधिनी, बोधिका अशाप्रकारे विविध नावाने प्रस्तुत टीकेचे उल्लेख दिसून येतात. घाटे शास्त्रींनी स्वत: कधी "भावभूतार्थबोधिनी" तर कधी "भावभूतार्थबोधिका" असा उल्लेख केल्याचे लक्षात आले आहे. प्रथम अंकाच्या पुष्पिकेत "इति भावभूतार्थबोधिन्यां प्रथमाड्कं समाप्तिं गत:।।"[12] असे ते लिहितात तर व्दितीयाड्कांच्या समाप्तिदर्शक पुष्पिकेत"इति भावभूतार्थबोधिकायां पञ्चवटीप्रवेशो नाम व्दितियोड्क:।।"[13] असा उल्लेख येतो. तिसऱ्या अंकाचे शेवटी भावभूतार्थबोधिका असे तर चतुर्थ अंका अंती भावभूतार्थबोधिन्या असा उल्लेख येतो.पाचव्या, सहाव्या व सातव्या अंकाच्या पुष्पिकेत मात्र भावभूतार्थबोधिका असेच म्हटले आहे.तेव्हा भावभूतार्थबोधिका किंवा भावभूतार्थबोधिनी यातील कोणतेही शीर्षक ग्राह्य मानावयास हरकत नसावी.

टीकेची वैशिष्ट्ये

पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांची भावभूतार्थबोधिका टीका पारंपरिक पद्धतीने लिहिलेली टीका असून टीका संक्षिप्त आहे. टीकेची भाषा प्रौढ व प्रगल्भ असून टीका प्रवाही आहे. घाटे शास्त्री व्याकरण तज्ज्ञ असल्याने त्यांनी उत्तररामचरिताच्या संहितेची शुद्धता व्याकरणानुसार तपासली आहे. शब्द हा अर्थाचा द्योतक असतो. म्हणूनच संहीतेच्या शुद्धतेस टीकाकाराने विशेष महत्त्व दिल्याचे दिसते .संहितेतील पाठभेदाचे परिक्षण करीत योग्य पाठ स्वीकारला गेला पाहिजे याबद्दल त्यांची आग्रही भूमिका दिसून येते. 'पाठस्तु असंगत:', 'अयं पाठं साधियान्' अशा प्रकारे टीकाकार टिप्पणी देतात.कवीकृत अपाणिनीय प्रयोग अचूकपणे टिपून त्याचे देखील टीकाकाराने स्पष्टीकरण केले आहे. एवढेच नव्हे तर नाट्यातील प्राकृत व संस्कृतछाये प्रती देखील टीकाकार दक्ष दिसतात.उत्तररामचरिताचे विश्लेषण करीत संपूर्ण कृतीचे परीक्षण तथा मूल्यमापन करणारे टीकाकार ग्रंथाचे चिकित्सात्मक समीक्षण करीत प्रसंगी स्वमत प्रभावीपणे मांडतात.असे हे टीकाकार केवळ टीकाकार नसून

संशोधक देखील आहेत. आचार्य डॉ.म. रा.जोशी घाटे शास्त्रींना संशोधक वृत्तीचा टीकाकार म्हणून संबोधतात. पाठभेदा बद्दल नोंद करताना टीकाकारासमोर उत्तररामचरितच्या एकापेक्षा अधिक प्रती असाव्या. त्यातूनच तर्कबुद्धीने योग्य पाठ कोणता ते घाटे शास्त्री सांगतात. पाठस्तु असंगतः, अयं पाठं साधीयान् अशाप्रकारे सूचना करीत ते योग्य पाठ स्वीकारण्यास सांगतात. व्याकरणाचे पांडित्य प्राप्त असलेल्या घाटे शास्त्रींचे साहित्यशास्त्रावर देखील तेवढेच प्रभुत्व असल्याचे पुरावे त्यांच्या टीकेतून प्राप्त होतात. संधी, समास आदींचे स्पष्टीकरण देणारे, व्याकरणागणिक संहितेची शुद्धता तपासणारे घाटे शास्त्री उत्तररामचरितातील रस, भाव, ध्वनी यांचे देखील विस्तृत विवेचन करतात. त्यासाठी साहित्यशास्त्रितील आधार देतात. नाट्यशास्त्रीय विश्लेषण करताना टीकाकाराने भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचे अनेक ठिकाणी प्रमाण दिलेले आहे .काही ठिकाणी धनंजयाच्या दशरूपकातील देखील आधार दिले आहे. यावरून घाटे शास्त्रींची साहित्यावरील असलेली घट्ट पकड दिसून येते .श्लोकातील छंद व अलंकारांचेही काही ठिकाणी लक्षणासहित स्पष्टीकरण केले असून शब्दांचा अर्थ देताना विविध कोशांचे संदर्भ देऊन त्यातील शब्दार्थ ही देऊ केले आहे. घाटे शास्त्रींची भावभूतार्थबोधिका टीका बहुआयामी टीका असून अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे .घाटे शास्त्रींच्या टीकेतील वैशिष्ट्यांचा आढावा घेताना सर्वप्रथम उत्तररामचरिताच्या नांदीच्या स्पष्टीकरण्यापासून येथे सूतोवाच करण्यात आला आहे.

"इदं गुरुभ्य: पूर्वेभ्यो नमोवाकं प्रशास्महे
विन्देम देवतां वाचममृतात्मना कलाम् ll"[14]

या नांदी श्लोकात "इदं गुरूभ्य:" असा पाठ टीकाकाराने स्वीकारला आहे. उत्तररामचरिताच्या काही संहितेत "कवीभ्य:"पाठ येतो. नांदी श्लोकाचे स्पष्टीकरण करताना घाटे शास्त्री लिहितात- "प्रारिप्सितस्य ग्रंथस्य निर्विघ्नसमाप्ती प्रचयगमनादि प्रयोजनावाप्तिकामो भवभूतिर्नामा सत्कवि: गुरुनमस्कार रूपं मङ्गलम् सूत्रधारमुखेनावतारयति l"[15]

वाल्मीकी प्रभृती जे कवी संप्रदायाचे गुरुस्वरूप आहे त्यांना तसेच पुरा कवींना भवभुतीने वंदन केले आहे याचेच अधिक स्पष्टीकरण देताना टीकाकार सांगतात -"अयं च श्लोक: कविकृत मंड्गलचरणरूपोऽपि 'सूत्रधार पठेन्नान्दी मध्यमं स्वरमाश्रित: lनान्दी पदैर्द्वादशभिरष्टभिर्वाप्यलंकृताl" इति भरतानुसारेण द्वादशपदनान्दीरूप: l"[16]

येथे टीकाकाराने नान्दीचे नाट्यशास्त्राच्या दृष्टीने विस्तृत विवेचन करीत नान्दी द्वादशपद असून सूत्रधार मध्यम स्वराचा आश्रय घेत नान्दी पठण करतो असे स्पष्ट करीत भरतांच्या नाट्यशास्त्रातील संदर्भ दिला आहे. पुढे नान्दीचे विस्तृत विवेचन करीत टीकाकार लिहितात "अनेन पूर्वगुरुनमस्कारहेतुसकललोक रंञ्जक वाङ्गामाधुर्यशंनसनरूपेण वाक्यार्थेन सरहस्यजृम्भकास्त्र देवता भागीरथी पृथ्वीवशिष्ठारुन्धत्यादी गुरुनमस्कारस्य प्रथमांकोपक्षिप्तस्य फलं अमृतात्मकलारूपसीतादेवी प्राप्तीरूपं सप्तमांकोपक्षिप्तं वस्तु व्यजते l विवक्षितान्यपर वाच्यध्वनिरेयं l 'विवक्षितान्यपर यत्र वाच्य भवेद्ध्वनौ" इति प्रकाशे तल्लक्षणात पत्तथ्यावक्त्रं वृत्तम् l"[17]

येथे पूर्वगुरुनमस्कारातून पृथ्वी, वसिष्ठअरुंधती आदी गुरुस्वरूप सर्वांना नमस्कार करीत जृम्भकास्त्र देवता, भागीरथी या गुरुस्वरूप देवतांनाही कवीने वंदन केल्याचे स्पष्टीकरण देत अमृतात्मकलारूपसीतेची प्राप्ती हे सातव्या अंकातील फळ यातून व्यञ्जींत होत असल्याचे टीकाकार सांगतात.अशाप्रकारे नाट्यशास्त्रीय व काव्यशास्त्रीय मूल्यमापन करीत येथे विवक्षितान्यपरवाच्यध्वनि असून मम्मटानुसार त्याचे लक्षणही टीकाकाराने दिले आहे. काव्य प्रकाशाचा उल्लेख टीकाकारांनी "प्रकाशे" असा केला आहे. "अमृतात्मकलारुपसीता" प्राप्तीचे सप्तमांकातील कवीद्वारे दिलेले संकेत देखील टीकाकार स्पष्ट करतात. अशाप्रकारचे हे बहुआयामी स्पष्टीकरण साहित्याच्या अभ्यासकांना अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

भवभूतीबद्दलच्या अनेक गोष्टी वादातीत आहे.' श्रीकण्ठ' हे त्याचे नाव होते वा उपाधी याबद्दलही विद्वानांची वेगवेगळी मते दिसून येतात. उत्तररामचरिताच्या प्रस्तावनेत कवीने स्वविषयक माहिती दिली आहे. "श्रीकण्ठपदलाञ्छन"[18] या प्रस्तावनेत आलेल्या माहितीवर टीकाकाराने पुढील प्रमाणे स्वमत मांडले आहे. श्री शब्दाचा अर्थ वाक् वाणी घेत ते लिहितात -"श्री ऋचा यजुंषि सामानि सा ही श्रीस्मृता सतां इति श्रृत्युक्ता त्रयीलक्षणा वाक् कंठे यस्य स: श्रीकंठ इति पदलाञ्छनं चिन्हं यस्य तयाभूत: I तात्कालिकै: जनै: भवभूते: श्रीकण्ठपदेन व्यवर्ह्रियमाणत्वात"[19] असे स्पष्टीकरण देत ज्याच्या कंठात वाणीची देवता सरस्वती निवास करीत होती अशा कवीचे "श्रीकण्ठ" हे व्यवहारी नाव असल्याचे मत प्रतिपादन टीकाकार करतात. अनेक अर्वाचीन टीकाकारांनी घाटे शास्त्रींचे हे मत ग्राह्य धरले आहे. तसेच "कालप्रियनाथस्य विदर्भदेशेभवभूतिर्निवासे पद्मपुरे प्रतिष्ठापितदेवता विशेषस्य शिवस्य I इदं मालतीमाधवे स्पष्टमभिहीतमं I यात्रायां उत्सव I"[20] असे मत मांडीत विदर्भातील पद्मपुरातील हे स्थान असल्याचे ठाम मत त्यांनी मांडले आहे. अनेक संशोधकांनी यावर आपआपली मते नोंदवली आहे. टीकाकाराचे असे मत त्यांच्या स्वयंप्रज्ञ तर्कबुध्दीचे घोतक असून त्यांच्या विविध संशोधनपर ग्रंथवाचन तथा ज्ञानाचे सूचक आहे. टीका लेखनासाठी टीकाकाराने परंपरागत पद्धतीचा स्वीकार केला असला तरीही त्यांच्या टीका लेखनाची स्वतंत्र शैली असल्याचे दिसून येते.स्वतंत्र तर्कबुद्धीने स्वमत ठामपणे मांडणे हे या टीकेचे वैशिष्ट आहे.

"मा निषाद प्रतिष्ठांत्वमगम: शाश्वती: समा:I
यत् क्रौंञ्चमिथुनादेकमवधी: काममोहितम् II"[21]

हा वाल्मीकी रामायणातील श्लोक कवी भवभूतीने उत्तररामचरिताच्या एका नाटकीय प्रसंगी मोठ्याच कल्पकतेने गुंफला आहे.प्रस्तुत श्लोकाचे वेगळे आणि वैशिष्टपूर्ण स्पष्टीकरण घाटे शास्त्री करतात. "इयं वाक् काव्यार्थ बीजं तद्यथा I हे मा निषाद I मा लक्ष्मी निषिदति अस्मिन् तत् संबोधनं I रामस्य विष्णुत्वात्सिताया लक्ष्म्यंशत्त्वात् I हे राम I त्वं शाश्वतीरित्यादी पूर्ववत् I अगम: प्राप्तवानसी यत् क्रौञ्च मिथुनात् क्रुञ्च कौटिलाल्पीभावयो: इति धातो: पचाद्यच क्रुञ्चौ तौ एव क्रौञ्चो कुटिलाल्पो तयो: वालितारयो: रावण मंदोदर्योर्वा यन्मिथुनं तस्मादेकं काममोहितं

कामत: (भ्रातृपत्न्या) रूमायां रममाणं सितायां आसक्तचित्त रावणस्य अवधीरिती l "[22] लक्ष्मीरूप सीता तथा मा निषाद विष्णुरूप राम असे पौराणिक संदर्भ घेत हे रामा तुला चिरकाल शांती मिळणार नाही कारण भ्रातृपत्नी आसक्त वाली तसेच रावणाचा वध करून रावण मंदोदरी तथा वाली रुमा यांची कायमची ताटातूट केली असे हे स्पष्टीकरण स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्तररामचरिताचा तृतीय अंक अप्रतिम साधला आहे. त्यातील काही श्लोकास विशेष प्रसिद्धी प्राप्त आहे. त्यातीलच वासंतीच्या (दंडकारण्यातील सीतासखी) मुखी आलेल्या प्रसिद्ध श्लोकाचे स्पष्टीकरण टीकाकाराने निराळेच केले असून त्यातून टीकाकाराची शैली व भाषा यांसह त्यांच्या विचारांचे वेगळेपण जाणवते.

श्लोक -

"त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं l
त्वं कौमुदी नयनोरमृतं त्वमङ्गे l
इत्यादिभि: प्रियशतैरनुरूद्ध मुग्धां
तामेव शान्तरथवा किमिहोत्तरेण ll"[23]

तृतीय अंकातील या श्लोकात सीतासखी वासंती रामास सीता त्यागाचा जाब विचारते असे स्पष्टीकरण टीकाकार करतात. वासंती आह- "शान्तमिती l पापमिति शेष: l इदं त्वयि असम्भाव्यंयत्वमेव कृतवानसि इति तत्परिहार व्यञ्जक: शान्त शब्दोच्चार: अथवा त्वां प्रति किं शेषं वाक्यं वक्तव्य l इह अस्मिन् अवसरे उत्तरेण l तामेवत्यस्मादधिकमुक्तेन उक्त वाक्यशेषेण किं l गते नीरे सेतुबन्धनवन्निष्प्रयोजन उपालम्भेन न किञ्चित् फलमित्यर्थः l"[24] टीकेतील हे श्लोकाचे स्पष्टीकरण व विशेषत: शेवटचे वाक्य विचार करता वासंती उपरोधिकपणे रामास तुझ्या सीतात्यागरूपी कृतीने सेतु बंधनादी, रावणयुद्धादी सर्वच कर्माचे काहीच प्रयोजन उरले नाही तर टीकाकार अक्षरश: "गते नीरे" म्हणजेच 'गेले पाण्यात' अशाप्रकारे स्पष्टीकरण करतात. या स्पष्टीकरणातून घाटे शास्त्रींची स्वतंत्र लेखन शैली दिसते. वासंतीच्या प्रश्नातुन प्रगट होणारा वेगळा भाव टीकाकाराने अचूक टिपला आहे. असे एक नव्हे अनेक उदाहरणे टीकेचा अभ्यास करताना दृष्टीस पडतात. नाटकातील बारीक-सारीक तपशीलही टीकाकाराच्या सूक्ष्म नजरेतून सुटत नाही प्रथम अंकातील श्लोक-

"अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणं सर्वस्वस्थासु य-
द्विश्रामो हृदयस्थ यत्र जरसायस्मिन्तहार्योरस :ll"[25].

या श्लोकातील अपाणिनीय पद अचूकपणे टिपून त्याचे केलेले विश्लेषण टीके नुसार- "यत्र हृदयस्थ विश्राम:l विश्राम इति अपाणिनीयं l घञि 'नोदात्तोपदेशस्ये' ति वृद्धिनिषेधेन रूपस्य दुर्लभत्वात किन्तु श्रम एव श्राम इति 'प्रज्ञादिभ्यच' इत्या कथाञ्चिद्योज्यं l"[26]

अशाप्रकारे सूत्राचा आधारदेत "विश्राम" चे स्पष्टीकरण टीकाकाराने देत त्यांच्या व्याकरणातील पांडित्वाची साक्षच दिली आहे.

अशाचप्रकारे पाठभेदाचे स्पष्टीकरण करीत कोणता पाठ स्वीकारला असता कोणता अर्थ निघतो त्या शब्दांच्या अर्थछटा टीकाकार स्पष्ट करतात. चतुर्थ अंकातील जनकमुखी आलेल्या श्लोकातील शेवटच्या दोन ओळींचे स्पष्टीकरण टीकाकाराने पुढील प्रमाणे केले आहे-

मनो मे सम्मोह: स्थिरमपि हरत्येव बलवा-
नयोधातुं यद्वत् परीलघुरयस्कान्त शकल:।।"[27]

टीका - "अत्र केचित्सम्मोद इति पाठं कल्पयित्वा एतद्दर्शनजन्य आनन्दातिशय इति व्याचक्षते। केचित्सम्मोह इति पाठेऽपि एतद्दर्शनजन्य व्यामोह इति व्याचक्षते । केचित्सम्मोहस्थिरमपिति पाठं पठित्वा एतस्मिन् अतिशय: सम्मोहे स्थिरमपि मे मन: । हरत्येवेति व्याचक्षते । "[28]

येथे "सम्मोद" पाठातून दर्शनाने झालेल्या आनंदातिशय, "सम्मोह" पाठातून जनकास लवाच्या दर्शनाने "मोह उत्पन्न होणे" तर "सम्मोह स्थिरमपि" यातून त्याच्या दर्शनाने त्याप्रती मोहाने आकृष्ट मनाची स्थिती अशी निराळी अर्थवलये टीकाकार स्पष्ट करतात. "सम्मोह, सम्मोद, सम्मोह स्थिरमपि" या शब्दांचे सुरेख स्पष्टीकरण तथा शब्दांची अर्थवलये व त्यातून निर्माण होणारे विविध भाव यांचे सुरेख स्पष्टीकरण घाटे शास्त्रींनी केले आहे .याच पद्यात परीलघु शब्दाने अधिकपददोष उत्पन्न होतो. तेव्हा या दोषाचे परिहार झाल्याचेही टीकाकार पुढे टीकेत स्पष्ट करतात. "एतद्व्याख्याने तू बालके लघुतया विशेषणस्य उभयत्र साम्येन तद्दोषपरिहार:।"[29] परिलघु हे लोभ (सम्मोह) याचे विशेषण आहे व बालक (लव) याचेही विशेषण आहे. टीकाकार लिहितात- "अत्र उभयत्र साम्येन" तद्दोदषपरिहार:"[30] अशाप्रकारे येथे टीकाकाराने विविध संहितेतील वेगवेगळे पाठ घेऊन त्यांची अर्थवलये स्पष्ट करीत त्यातील भाव स्पष्ट केला आहे. तसेच या श्लोकाचे काव्यशास्त्रीय दृष्टीने देखील स्पष्टीकरण दिले आहे. येथे अधिकपददोष झाल्याचे सांगून टीकाकाराने दोषाचा परिहार झाल्याचे स्पष्ट केले आहे.

उपसंहार

भावभूतार्थबोधिका टीका विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. टीकेचे समीक्षण केले असता त्यातील विविध पैलू दृष्टीस पडतात.

- घाटे शास्त्रीं व्याकरण पंडित असल्याने व्याकरणाच्या दृष्टीने त्यांनी संहितेची शुद्धता तपासली आहे.
- पाठभेदाच्या बाबतीत देखील ते अतिशय दक्ष असल्याचे दिसते.
- साहित्यशास्त्रावर टिकाकाराचे विशेष प्रभुत्व असल्याची पदोपदी साक्ष मिळते.
- टीकाकाराने उत्तररामचरिताच्या नांदीचे केलेले स्पष्टीकरण बघता असे दिसते की त्यात टीकाकाराने नाट्यशास्त्रीयदृष्ट्या व काव्यशास्त्रीयदृष्ट्या विस्तृत विवेचन केले आहे. नांदी श्लोकात टिकाकाराने

'गुरुभ्य:" पाठ स्वीकारला आहे .त्याचे देखील टीकाकाराने विस्तृत विवेचन केले आहे. सप्तमअंकातील "अमृतात्मकलारूप" सीताप्राप्तीचे कवीद्वारे केलेल्या संकेताचेही स्पष्टीकरण टीकाकार करतात.

- शब्दांचे अर्थ तथा त्यांच्या विविध छटा व अर्थवलये स्पष्ट करताना टीकाकार अनेक कोश व कोशकार यांचे संदर्भ देताना दिसतात.
- टीकाकाराचा अनेक टीका ग्रंथांचा अभ्यास असल्याचे दिसते. जगध्दर, मल्लिनाथ यांसारख्या प्रसिद्ध तथा श्रेष्ठ टीकाकारांचे उल्लेख अनेकदा प्रस्तुत टीकेत प्राप्त होतात.
- टीकाकाराने विविध न्यायांचा दाखला देत काही ठिकाणी स्पष्टीकरण केलेले आहे.त्यात काकतालीय न्याय ,मध्यमणिन्याय,देहलीद्विपन्याय असे उल्लेख येतात.
- नाट्यशास्त्राचे विश्लेषण करताना टीकाकाराने भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील व धनंजयाच्या दशरूपकातील प्रमाण देत नाट्यशास्त्रीय तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण लक्षण व त्यातील व्याख्या देत केले आहे.
- टीकाकाराने काव्यशास्त्रानुसार उत्तरामचरिताचे स्पष्टीकरण करताना काव्यातील रस ध्वनि, भाव याचे विस्तृत विवेचन केले आहे. काव्यातील दोष टिपून त्यांचा परिहार कसा झाला ते स्पष्ट केले आहे.
- "किमपिकिमपि मंद मंदमासत्तयोग:"[31]या प्रथम अंकातील श्लोकाचे स्पष्टीकरण देताना येथे असंलक्षक्रमध्वनीरत्यादिस्थायीभाव असून शृंगाररस असल्याचे विस्तृत विवेचन टीकाकार करतात. अशाच प्रकारे टीकेत भावांचे व ध्वनीचे विस्तृत विवेचन येते. म्हणूनच "भावभूतार्थबोधिनी" टीका आस्वादक टीका असून रसग्रहणास सहयोगी ठरणारी आहे. टीकाकारांनी शब्दार्थांच्या अर्थछटा उलगडताना दिलेले स्पष्टीकरण सहृदय साहित्य अभ्यासकांना आनंद देणारे असून साहित्याच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शक आह. प्रस्तुत टीका उच्च कोटीची असून टीका साहित्यातील लक्षणीय व वैशिष्टपूर्ण टीका आहे. टीकाकाराने उत्तररामचरित नाटकांचे केलेले मूल्यमापन बहुआयामी असून साहित्याच्या अभ्यासकांसाठी प्रस्तुत टीकेचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे प्रस्तुत लेखात टीकेतील काही वैशिष्ट्यांवर दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे.

प्रस्तुत लेखात पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांच्या भावभूतार्थबोधिका टीकेच्या वैशिष्टयांचे स्पष्टीकरण व विवेचन करण्यात आले आहे. "भवभूति विरचित उत्तररामचरितावरील पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांच्या भावभूतार्थबोधिका टीकेच्या समीक्षणात्मक अध्ययन" यात संपूर्ण टीकेचे समीक्षण करण्यात आले आहे. प्रस्तुत टीकेविषयी व टीकाकाराविषयी "अभिजात नाट्यवरील टीकासाहित्य" या लघुशोधप्रकल्पाच्या लेखिका त्यांच्या प्रकल्पात भावभूतार्थबोधिनी टीकेची प्रशंसा करताना लिहितात-"घाटेशास्त्रींची टीका अभ्यासल्यानंतर त्यांच्या टीकेची, प्राधान्याने दृष्टिगोचर होणारी वैशिष्ट्ये लक्ष वेधून घेतात आणि विशेषतः घाटेशास्त्रींची टीकाकार म्हणून वेगळी ओळख निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. "व्याकरणाचा परिसस्पर्श लाभलेले पांडित्य कोणताही भाव अभिव्यक्त करण्याची त्यांची मनमोहक शैली शब्दार्थाची अर्थ वलये शोधणारी सूक्ष्म दृष्टी नाट्यशास्त्रीय दृष्ट्या

आवश्यक असणाऱ्या तांत्रिक घटकाच्या आधारे होत गेलेल्या कथाबीजाच्या विकासाचा शोध घेणारी कुशाग्र बुद्धिमत्ता पाठ पाठांतराचा शोध घेऊन यथार्थ पाठाची निवड करणारी चिकित्सक वृत्ती अलंकारांचे विश्लेषण करणारी सौंदर्यदृष्टी भाव-भावना आशय आणि ध्वन्यर्थ यांचा घेतलेला मागोवा ग्रंथ संहितेचे मर्म उकलून दाखविणारी व पात्रांच्या भावभावनांचा वेध घेणारी आणि आशयाला भिडणारी मांडणी मूलभूत संदर्भ साहित्याचे यथार्थ ग्रहण प्रत्येक बाबींचे निर्दोष विश्लेषण अन्य टीकाकारांनी दाखविलेल्या दोषांचा परिहार अन्य टीकाकारांच्या मतांचा घेतलेला सकारात्मक परामर्श स्वतंत्र वृत्तीने आणि अंतर्गत पुराव्याच्या बळावर सुसंगतपणे मांडलेले निष्कर्ष अशा एक नव्हे अनेक गुणवैशिष्ट्यांचा साठा म्हणजे भावभूतार्थबोधिनीचा टीकाकार घाटे शास्त्री महाराष्ट्राला ललामभूत ठरले आहे"[32] प्रस्तुत लेखात भावभूतार्थबोधिका टीका व टीकाकाराचा अत्यल्प परिचय देऊन टीकेतील वैशिष्ट्यांवर दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे. भावभूतार्थबोधिका टीका आस्वादक टीका असून उत्तररामचरिताच्या रसास्वादनात सहृदयांस वाचक/अभ्यासकांना सहयोगी ठरणारी आहे.तसेच साहित्याच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शक आहे.

संदर्भ सूची

1. प्रज्ञालोक, अंक 236, संपादक श्री. श्रीश हळदे वर्ष57,पृ. 106.
2. उत्तररामचरित, भावभूतार्थबोधिकया टीका समवेतं, पृ.192.
3. तत्रैव पृ.192.
4. तत्रैव पृ.1.
5. तत्रैव पृ.1.
6. तत्रैव पृ 1.
7. तत्रैव पृ.1.
8. तत्रैव पृ.1.
9. प्रज्ञालोक. पृ.107.
10. उत्तररामचरित भावभूतार्थबोधिकया टीकया समवेतं , पृ.178.
11. तत्रैव. पृ.178.
12. तत्रैव. पृ.61.
13. तत्रैव. पृ.61.
14. उत्तररामचरित भावभूतार्थबोधिकया टीकया समवेतं पृ.1.
15. तत्रैव पृ.1.
16. तत्रैव पृ.1.
17. तत्रैव पृ.1.
18. तत्रैव पृ.2.
19. तत्रैव पृ.2
20. तत्रैव पृ.2

21. तत्रैव पृ.45.
22. तत्रैव पृ.45.
23. तत्रैव श्लो.3.26, पृ.85
24. तत्रैव पृ.85.
25. तत्रैव श्लो.1.39, पृ.31.
26. तत्रैव पृ.32.
27. तत्रैव श्लो.4.21, पृ.123.
28. तत्रैव पृ.123.
29. तत्रैव पृ.123.
30. तत्रैव पृ.123.
31. तत्रैव श्लो.1.27, पृ.20
32. अभिजात संस्कृत नाटयावरिल टिकासाहित्य-लघुशशोधप्रकल्प, नागपूर विद्यापीठ
    डॉ. आशा अंभोरे, पृ.428

संदर्भ ग्रंथ सूची

1.भवभूतिविरचितं उत्तररामचरितं नाम नाटकं
घाटेइत्युपनाम्ना भट्टजी पदलक्ष्मणा श्रीकृष्णसूनुना श्रीमता जयकृष्णेन विरचितया,
भावभूतार्थबोधिकया टीकया समवेतं
विनायक सदाशिव पटवर्धन इत्यनेन टिप्पण्यादिभिश्चालंकृतम्
मुंबापुरवर्तिनि 'इंदुप्रकाशा'ख्ये मुद्रणालये प्रकाशितम्
प्रथमावृत्ती – 15 December 1895
व्दितियावृत्ती -17 October 1909

2.काव्यप्रकाश
व्याख्याकार-आचार्य विश्वेश्वर
संपादक-डॉ. नरेन्द्र प्रकाशक- ज्ञानमंडल ग्रंथमाला, वाराणसी
पुनर्मुद्रण-डिसेंबर 2013

3.दशरूपकविधान
प्रा. कंगले र. प.
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
प्रथमावृत्ती-2002

4.नाट्यशास्त्रम्

व्दिवेदी पारसनाथ
संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी
प्रथमावृत्ती-1992
5.संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास
करंबेळकर विनायक वामन
श्रीशारदा प्रकाशन, नागपूर
व्दितियावृत्ती-1993

6.भवभूति
मिराशी डॉ.वासुदेव विष्णु
प्रकाशन-पाप्युलर प्रकाशन,मुंबई

7.महाकवि भवभूतिविप्रणीतं उत्तररामचरितं
भाषांतर व प्रकाशन- बेलवलकर श्री.कृ.,पुणे

8.संस्कृत टीका व टीकाकार
महाजन सुरेश विनायक
प्रकाशन-जिद्द पब्लिकेशन्स, पुणे
प्रथमावृत्ती 1/9/2011

****

कालिदासावर आधारित काव्य रचनांचे समीक्षण

मधुरा कायंदे
प्रो कविता होले

सारांश :

संस्कृत साहित्याचे विषयवैविध्य आणि त्याची लोकप्रियता या दान्ही गोष्टी सर्वमान्य आहेत. संस्कृत साहित्याच्या लोकप्रियतेला शिखरावर नेण्याचे श्रेय कवि कुलगुरू कालिदासाला जाते. कालिदासाच्या सप्तकलाकृती म्हणजे साहित्याच्या आभाळातील इंद्रधनुष्य होय.

कालिदासाची उत्तुंग लोकप्रियता आणि त्याच्या वैयक्तिक जीवनाविषयीची अनुपलब्ध माहिती यांचा संयुक्तिक परिणाम म्हणजे त्याच्या आयुष्याचे गूढ उकलण्याचे संशोधकांचे प्रयत्न. प्रस्तुत शोधपत्रात अशाच काव्याचे समिक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. कालिदासाला नायक म्हणून स्विकारत त्याच्यावर ज्या काव्यकलाकृती निर्माण झाल्या त्यातील 5 प्रातिनिधिक कलाकृतींचा यात अंतर्भाव केलेला आहे. कालिदासाच्या लोकप्रियतेला आणि त्याच्याविषयी कवींच्या मनात असलेल्या आदराला अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न आहे.

सांकेतिक शब्द : कालिदास, कालिदास चरितम् श्री.भा.वर्णेकर

काही व्यक्ती, घटना, ठिकाणे यांच्याभोवती एक वलय निर्माण झालले असते. महाकवी कवीकुलगुरू कालिदास हे असेच एक व्यक्तीमत्व. या महाकवीच्या प्रशस्तीत म्हटले आहे.

काव्यश्रुतीनां प्राणवाय तुभ्यं
कवि–प्रभूणां मनवेऽग्रगाय ।
वर्णाश्रमाणां गुरवे सदैव
श्रीकालिदासाय नमो नमस्ते ।।

महाकवी कालिदासाच्या स्मृतींना उजाळा देण्याचा प्रयत्न हा सदैव साहित्यविश्वात चाललेला असतो. कालिदासाच्या साहित्याचा प्रभाव हा भारतवर्षातीलच नव्हे तर संपूर्ण विश्वाच्या साहित्यसृष्टीवर आहे आणि निरंतर राहणार याचे कारण म्हणजे या महाकवीचा कल्पनाविष्कार, शब्दसमृद्धि आणि काव्य रमणीयता.

या महाकविच्या प्रतिभेच्या लखलखाटाने अनेकांचे डोळे दिपून गेले. मने कौतुकाने भरून आली आणि बुद्धी आश्चर्यचकीत झाली.

प्रा. राम शेवाळकर म्हणतात, ''चांगल्या काव्याच्या सहवासात रसिकांना आनंद मिळतोच, मनातील प्रापंचिक चिंतेची कोळीष्टके स्वच्छ होतात म्हणून तर सहृदय रसिक या महाकवीच्या सप्तरंगी कलाकृतीकडे आकृष्ट होतात.'' यात दुर्दैवाची गोष्ट एकचकी या

कवीने स्वतःविषयी काहीही लिहून ठेवले नाही, याचा सकारात्मक विचार करू गेल्यास आजही याविषयावर काम करण्यास संशोधकांना बराच वाव आहे.

या महाकविच्या काळाविषयी, कुळाविषयी, जन्मभूमी विषयी, कर्मभूमी विषयी कोठेही कोणतीही प्रमाण माहिती उपलब्ध नाही. प्रज्ञाभारती वर्णेकर याविषयी म्हणतात–

न खिस्तपूर्वे शतकेऽभवस्तं
खिस्तोत्तरे वा प्रथमे तुरीये ।
भवो हि लोकाभ्युदयाय येषां
तेत्वादृशा जातु न कालबद्धाः ।।

आजवर अनेक संशोधकांनी, विद्वानांनी कालिदासाच्या आयुष्यावर, चरित्रावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न आपआपल्या परीने केला. परिणामतः कालिदासविषयक अनेक अभ्यासपूर्ण पुस्तके उपलब्ध झाली.

1) डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर रचित 'कालिदास–रहस्यम्' हे खंडकाव्य.
2) डॉ. भि वेलणकर रचित " कालिदास चरितम् " हे नाटक.
3) मयूर देवल यांचे " कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य " हे नाटक
4) पियूष देशपांडे यांचे 'कालिदास प्रतिभोन्मेष'
5) डॉ. मिराशी यांचे 'कालिदास'
6) डॉ. शशीभूषण गुप्ता यांचे "उपमा कालिदासस्य"

ही आणि अशी असंख्य विविधा भाषी पुस्तके आज उपलब्ध आहेत. यांतून महाकवी कालिदासांचा जीवनपट उलडयास या सर्वांचे प्रामाणिक प्रयत्न दिसतात.

एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत कालिदास विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे म्हणतात, "कालिदासविषयक लिखाणही आता अंशतः पुनरावृत्तीच असणार आहे. कारण कालिदासाबद्दल आता कोणतीच गोष्ट अस्पष्ट राहिलेली नाही.'' तरीही त्या लिखाणाचे महत्व कमी होत नाही, याचे कारण सांगायचं तर –

'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयताया ।'

चरित्रगायन ही तर आपली परंपरा. 'सगुणचरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी ।' असे संत एकनाथ महाराजांनी देखील म्हटलंच आहे.

तीच तीच रामकथा जशी काळाच्या नव्या प्रवाहात चलचित्र, दूरदर्शन मालिका गीतरामायण, सचित्ररामायण कथा अशा विविध माध्यमातून पुढे आली आणि तरीही तितकीच लोकप्रिय ठरली.

पुरूषोत्तम श्रीरामाव्यतिरिक्त असा मान संपूर्ण भारतात आणखी दोन व्यक्तींना मिळाला. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि महाकवी कालिदास. यांपैकी प्रभु श्रीराम आणि राजाधिराज शिवरायांचे चरित्र तपशीलवार उपलब्ध आहे. तिसरे कालिदासाचे चरित्र वर्णन करण्याकरीता आधुनिक कवींनी आपली प्रतिभा पणाला लावली आहे.

कालिदासाच्या या गूढ अशा जीवनपटाने परावर्ती संशोधकांना उद्युक्त, प्रेरीत करून त्याच चरित्र उलगडणच्या प्रेरणेने केलेल्या स्तवनांचा, काव्यांचा, रूपकांचा परिचय करून देवून त्यांचे समीक्षण करण्याचा हा प्रयत्न आहे.

कालिदासचरितम् । – पं.श्री. भि. वेलणकर

हे एक रूपक आहे. प्रस्तावनेत कवीने म्हटल्याप्रमाणे हे ऐतिहासिक पौराणिक रूपक नव्हे तर या महाकवीचे धिषणोत्प्रेक्षित चरित्र आहे.

प्रस्तुत नाटकाची विभागणी प्र. अंकामध्ये झाली आहे. प्रत्येक अंकात तीन प्रवेश आहेत. परंपरेप्रमाणे यात नांदी, प्रस्तावना, भरतवाक्य देखील आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे हे संपूर्ण संस्कृत नाटक आहे. यात प्राकृत भाषेचा लवलेशही नाही. नाटकात यथोचित पद्यप्रयोग आहे, म्हणूनच याला संगीत नाटक म्हणूनही मान्यता आहे.

कालिदास हा या नाटकाचा नायक आहे. कालिदास हा विक्रमादित्य राजाचा राजदरबारी आहे. कालिदास आणि विक्रमादित्य वगळता इतर काल्पनिक पात्रांची पेरणी केली आहे. राणी वसुधा, मदनिका, निपुणिका, अलका, सुकीर्ती आदि पात्रे काल्पनिक आहेत. पंडित राजाच्या रूपाने एक काल्पनिक खलनायक कालिदासाचा प्रतिस्पर्धी म्हणून चितारला आहे.

कालिदासाच्या ऋतुसंहार या खंडकाव्याच्या लेखन समाप्तीने काव्याची सुरूवात होते आणि 'रघुवंशम्' महाकाव्याच्या लेखनारंभावर कथानक थांबते. रघुवंशम् हे महाकाव्य कालिदासाच्या प्रतिभेचा परमोच्च आविष्कार आहे. याची निर्मिती हा या चरित्राचा शिरोबिंदू आहे. हेच या नाटकाचे फलित आहे. कालिदास एक कुशल राजकारणी आणि स्वामिनिष्ठ सेवक होता. तरीही त्याच्यातील कवी त्याच्यातल्या राजकारण्यावर वरचढ ठरतो हे या नाटकाचे कथानक आहे.

प्रस्तुत नाटकाची कथावस्तु कविकल्पित आहे. प्रत्यक्ष नाटकाला सुरूवात करण्यापूर्वी कविने कालिदास विषयक स्वतःची गृहित तत्वे स्पष्ट केली आहेत. ती अशी

1. कालिदास हा उज्जयनीचा राजा चन्द्रगुप्त द्वितीय (विक्रमादित्य) यांच्या पदरी इ.स. च्या 4 थ्या शतकात होता.
2. मालवंशाने कालिदासाला राजदूत म्हणून विदर्भात पाठवले होते, वाकाटकांकडे नव्हे.

कालिदास रहस्यम् – प्रज्ञाभारती डॉ. श्री.भा. वर्णेकर

हे शतकोत्तर श्लोकरचना असलेले खंडकाव्य आहे. महाकवि, कालिदासाच्या चरित्राचे गुणगान करीत असतांना त्यांच्याच वचनांचा उपयोग करण्याचा एक अभिनव प्रयत्न या काव्यात आढळतो. या काव्याचे सात विभाग असून, आठव्या 'आश्चर्यमी कालिदासस्य कविता' हा विभाग कालिदासाच्या काव्यांचे अद्भूतत्व गौरविणारा आहे इतर 7 विभागांची नांवे

प्रस्तावनाष्टक – 8 श्लोक

तुझ्याच प्रेरणेने, तुझीच स्तुती, तुझ्या सारख्या उपमांच्या वापराने करण्याचा प्रयत्न करतो, असे म्हणत प्रस्तावना करणारे हे अष्टक आहे.

चरित्ररहस्य – 10 श्लोक

कालिदासांचा जन्म, स्थानादि तर ठावूक नाहीत, पण प्रज्ञाभारतींनी आपल्या कल्पनाशक्तीने या प्रश्नांची उत्तरे शोधत कालिदासाचे हे रहस्यमयी चरित्र उलगडत या 10 श्लोकांची रचना केली आहे.

श्रृंङगार रहस्य – 12 श्लोक

श्रृंङगार रसाधिपति अशा या कविच्या श्रृंङगार वर्णनांचा छात्रांवर होणारा परिणाम किती रोमांचक असतो हे या 12 श्लोकांतून मांडले आहे.

अद्‌भुतरम्यता रहस्य – 17 श्लोक

कालिदासाच्या कल्पनांच्या भरारीतून येणारी वर्णने किती अद्‌भूत आणि रम्य असतात याचे वर्णन या 17 श्लोकात आले आहे.

कवित्व रहस्य – 40 श्लोक

कालिदासाच्या वाणीतून प्रकटलेले त्याचे कवित्व, त्या कवित्वाचे श्रेष्ठत्व या 40 श्लोकातून मांडले आहे. त्याच्या काव्यातले दाखले देत कवीने हे वर्णन मनोरम केले आहे.

हृद्‌गतरहस्य – 14 श्लोक

कालिदासांच्या काव्याविषयीचे वर्णेकरांचे हृदयस्य आदरभाव, भाक्तिभाव प्रदर्शित करणारे हे 14 श्लोक आहेत.

स्तोत्रांजली – 8 श्लोक

उपसंहारात्मक असे भक्तीभाव प्रदर्शित करणारे 8 श्लोक आहेत.

प्रस्तुत काव्याची शैली प्रासादिक आहे. क्लिष्टता कोठेही नाही. कालिदासाच्या काव्याचे स्वरूप त्यांनी फार मनोहरपणे मांडले आहे

या संपूर्ण काव्यात कालिदासाच्या व त्यांच्या काव्याप्रतीचा परमभक्तीभाव प्रकट करून शेवटच्या 5 श्लोकातून सत्कवींच्या कवितेची, शाश्वतता, मधुरता आणि रसवत्ता यांचे महत्व सांगतो.

प्रस्तुत काव्य हे कालिदासावरील भक्तीचा मूर्तीमंत आविष्कार आहे. 'तुझेच घेवोनी तुला अर्पितो' असे या पूजेचे स्वरूप आहे.

कालिदास – एका गुराख्याचे महाकाव्य : मयूर देवल

महाकवी कालिदासाचा जीवनपट उलगडून दाखवणारे हे नाटक. या नाटकात प्रसंगोचित पद्याचा व संगीताचा प्रयोग केला गेला असल्याने हे नाटक संगीत नाटक हे बिरूद मिरवते.

या संगीतिकेत 2 अंक आहेत आणि या दोन अंकात कालिदासाचा काली या गुराख्यापासून ते महाकवी कालिदासापर्यंतचा प्रवास चितारला आहे.

या नाटकात, कालिदास हा अर्थातच नायक आहे. त्याखेरीज वासंती, नर्तिका, कांचन, वारूची शामल, शांतीनाथ या पात्रांच्या आधारे कालिदासाचा जीवनपट उभा करण्याचे शिवधनुष्य पेलले आहे.

काली हा गुराखी, त्याचे सामान्य पातळीचे जीवन, अमात्याच्या कटामुळे राजकन्येबरोबर त्याचा विवाह. त्यातून पुढे त्याचा महाकवित्वापर्यंत पोहचण्याचा प्रवास आहे.

रोचक घटनांनी पुढे जाणारे हे कथानक आहे. कालिदासाच्या आयुष्यातले महत्वाचे प्रसंग या नाटकात उत्तमरित्या साकारले आहेत.

संस्कृत महाकवी कालिदासाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीये. त्यामुळे जी काही माहिती उपलब्ध आहे तिच्या आधारे आणि त्यांची नाटकं तसेच महाकाव्ये यांच्या आधाराने हे नाटक रचले आहे.

प्रस्तुत नाटक हे प्रायोगिक असून याचे अनेक प्रयोग रसिकांच्या उदंड प्रतिसादात पार पडले आहेत ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे.

कविराज – ॲड. श्री. ज्ञानेश्वर कुलकर्णी

कालिदासाच्या जीवनावरची पहिलीच मराठी कादंबरी 'कविराज '

या कादंबरीत लेखकाने कोठेही कालिदासावरच्या कोणत्याही दंतकथेच्या आधाराने लिखाण केलेले नाही. प्रस्तावनेत कुलकर्णी स्वतःच सांगतात की या कविराजाने स्वतःविषयी कोठेही काहीही उल्लेख केला नाही. केवळ दंतकथा तेवढ्याा प्रचलनात आहेत. परंतु या दंतकथांची विश्वासार्हता काहीही नाही. तेव्हा या कादंबरीच्या लिखाणात कोणतीही दंतकथा विचारात घेतलेली नाही.

ऋतसंहारापासून मेघदूतापर्यंत कालिदासाच्या समग्र साहित्याचे अभ्यासपूर्वक बारकाईने परिशिलन केल्यास त्या वाङ्मयाचा कर्ता कसा असावा याचा कयास बांधता येतो आणि तो कयास बांधण्याची तारेवरची कसरत म्हणजे 'कविराज' ही कादंबरी.

कालिदासाच्या काव्यात येणारी विरहवेदना (शकुन्तला–दुष्यन्त विरह, रतीविलाप) ही त्यांनी स्वतः अनुभवलेली असावी, त्याने केलेल्या भोग विलासाची वर्णने त्याच्या वैयक्तिक अनुभवांवरूनच प्रेरीत असावी, त्याच्या रचनांमधील वैभवाची वर्णने (उज्जयीनी बाजारपेठ, राजमहाले, रत्नादि) त्यांनी जवळून बघितलेली असावी या दृष्टीने तो राजकवी असावा असे अनेक कयास बांधत लेखकाने ही कादंबरी रचली आहे.कालिदासाचे उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य याच्या बहिणीशी प्रेमसंबंध होते या 'लीलातिलक' नामक काव्यातील उल्लेखाचाही यात प्रमाण मानत प्रचिती दिली आहे. एकूणच या कादंबरी चा विस्तार तर्क कयास आणि मानी अनुभवांवरून ठरला आहे.

कालिदासप्रतिभोन्मेषः – लक्ष्मण कृष्ण पित्रे

कविकुलगुरू कालिदासचा जीवनपट उलगडण्याच्या प्रयत्नातले हे आणखी एक रूपक म्हणजे कालिदास – प्रतिभोन्मेष हे नाटक

एक अंक आणि सहा प्रवेशांमध्ये या महाकविचा गूढ जीवनपट उलगडण्याचा प्रयत्न पित्रेंनी केला आहे.

कालिदासाविषयीच्या अनेक आख्यायिकांवर हे नाटक आधारलेले आहे. कालिदास हा एक गुराखी होता, अथवा तो ब्राह्मणपुत्र असून अनाथ होता व त्याचा सांभाळ गुराख्याच्या घरात झाला. अशिक्षित अशा या तरूणाचे लग्न राजाचा अमात्य सूडभावनेने राजकन्या अवन्तिसुन्दरीशी लावून देतो. सत्य समजल्यावर राजकन्या त्याला राज्यातून हाकलून देते. कालीमातेपुढे प्राणत्याग करण्याचा प्रयत्न करीत असतांना देवी प्रसन्न होवून

त्याला बुद्धिमत्ता प्रदान करते. हा सुप्रसिद्ध कवी होतो. पत्नीला कृत्याचा पश्चात्ताप होतो पण कालीदास तिला गुरूस्थानी मानतो. ती क्रोधाने 'स्त्रीमुळेच तुला मृत्यु येईल' असा शाप देते. पुढे उतारवयात तो त्याचा मित्र सिंहलेश्वर कुमारसेन याला भेटायला जातो. समस्यापूर्ती स्पर्धेची माहिती एका गणिकेकडून प्राप्त होते. तो ती समस्या तत्काळ सोडवतो पण गणिका पारितोषकाच्या मोहाने त्याची हत्या करवते. सत्य उघडकीला आल्यावर राजा कालिदासाची काव्यपरंपरा पुढे सुरू रहावी याकरिता प्रयत्नरत होते असे अत्यंत वेगवान, जिवनातील चढउतार योगायोग चित्रित करणारे हे नाटक कालिदासाच्या प्रतिभेचे दर्शन घडवते.

उपसंहार :

कालिदासावरील ही काव्ये त्याच्या जीवनविषयक गूढवाला जाणण्याकरीता लिहिली गेलीत. एवढेच नव्हे तर त्याला प्राप्त झालेल्या यश, प्रसिद्धी, मान आदिंच्या आदरापोटी अनेक कवी आपले व कालिदासाचे नाव जोडून घेऊ लागले. अपर कालिदास, अभिनव कालिदास अशा या नावांची संख्या तब्बल 36 एवढी आहे.

कालिदास हे नाव आणि त्या नावाभोवतीचे वलय संशोधकांना आजही खुणावते आहे. हा कालिदासाचा साहित्यावरचा प्रभाव आणि हेच त्याच्या अद्भत काव्यांचे यश

वरील प्रातिनिधिक उदाहरणांवरून आपल्याला या कविचा सह्रदयांच्या मनावरचा परिणाम दिसून यतो. एक असा असामान्य प्रतिभेचा कवि की ज्याच्या नावाव्यतिरिक्त दूसरी कोणतीही माहिती उपलब्ध नाही. त्याचा गूढ जीवनपट उलगडण्याचे संशोधकांचे हे प्रयत्न कवि कुलगुरू कालिदासाच्या साहित्याविश्वावरील प्रभावाचे द्योतक आहे.

संदर्भ ग्रंथसूची

- **संस्कृत साहित्य का इतिहास**
  बलवंत उपाध्याय, शारदा मन्दिर, बनारस
- **वैदिक साहित्य का इतिहास**
  डॉ. राममूर्ति शर्मा, ईस्टर्न बुक लिंकर्स
- **कालिदासरहस्यम् ।**
  डॉ. श्री.भा. वर्णेकर
- **कालिदासचरितम् ।**
  डॉ. भि. वेलणकर
- **कालिदास एका गुराख्याचे महाकाव्य् ।**
  मयूर देवल
- **कालिदासप्रतिभोन्मेषः**
  पियूष देशपांडे
- **कालिदास**
  डॉ. मिराशी

''''

धर्मशास्त्रातील प्रायश्चित्त विधानाची समाजजीवनात प्रासंगिकता

रोहिणी र. देशमुख,
प्रो.डॉ.नंदा ज.पुरी

सारांश :-

धर्मशास्त्रसाहित्य अत्यंत विशाल तथा प्राचीनतम असे शास्त्र आहे.वैदिककाळानंतर सूत्र काल हा धर्मशास्त्रीय ग्रंथांचा उद्धवकाल मानला जातो. कल्पसूत्राचे अवांतर भेद रूप म्हणजे धर्मसूत्र होय. यालाच धर्मशास्त्र अशी व्याख्या आहे. अशा या धर्मशास्त्रात प्रमुख तीन विषय वर्णिले गेले आहेत. (१)आचार (२)व्यवहार आणि तदनंतर प्रायश्चित्त. प्रायश्चित्त ही संकल्पना म्हणजे धर्मशास्त्रांनी भारतीय संस्कृतीला दिलेली एक महत्त्वपूर्ण देणगीच आहे. त्यातील प्रायश्चित्तांचा विचार करावयाचा झाल्यास प्रायश्चित्त म्हणजे पापनाशाचे एक साधन होय. तर काही धर्मशास्त्रीय ग्रंथांत प्रायश्चित्त म्हणजे केलेल्या दुष्कृत्यांचे परिमार्जन या अर्थी वापरण्यात आलेला आहे. तर काही ठिकाणी आपत्तीकारक कृत्यांचे निवारण करण्याकरिता करावयाचा विधी या अर्थी आलेला आढळून येतो. चुकीने अथवा हेतुपूर्वक केलेल्या कृत्यांचा नाश निरनिराळ्या प्रायश्चित्ताच्या योगाने होतो असे पूर्वाचार्यांनी सांगून ठेवलेले आहे. प्रायश्चित्त केल्याने मनुष्याचा अंतःकरणाला शांती मिळते व इतर लोकही त्यायोगे संतुष्ट होतात असे मत मध्ययुगीन काळात झालेल्या ग्रंथकारांनी देखील प्रतिपादित केले. अर्थातच मानवी जीवनाचे सुयोग्यतेने निर्वहण करण्याकरता धर्मशास्त्राने दिलेल्या ज्ञानाची नितांत गरज आहे असे दिसते. व त्यामुळेच प्रायश्चित्तांच महत्त्व प्राचीन काळापासून आपल्या वेद, स्मृति तथा पुराणग्रंथात सविस्तर वर्णन केलेले आहे.

प्रायश्चित्त व्यक्तीच्या चित्ताला निर्मळ करते. प्रायश्चित्त सामाजिक ऐक्य व व्यक्तीचे मनोधैर्य टिकविण्यास सहाय्य करते. त्यायोगे समाजाचे हित साधले जाते. आज समाजात जी अस्थिरता दिसून येते आहे ती कमी करण्यासाठी पुनश्च धर्मशास्त्रातील प्रायश्चि- त्तासारख्या मौलिक सत्याचा आधार घेण्याची नितांत गरज आहे. वर्तमानात मनुष्यांचे होत असलेले शारीरिक, मानसिक व नैतिक अधःपतन टाळण्यासाठी आजच्या समाजाला प्रायश्चित्तांची नितांत गरज आहे असे वाटते.

मानवी मनातील दोषभावना कमी करून मला निर्मळता प्राप्त करून देण्याचे महत कार्य प्रायश्चित्त घडवून आणते. सामाजिक ऐक्य व स्वीकृती तसेच सामाजिक गरजांचे योग्य प्रकारे निर्वहण यात प्रायश्चित्तांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण वाटते.

आजच्या काळात मानवी मनाला तसेच वर्तनाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यात प्रायश्चित्तांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण वाटते.

भारतीय मानसशास्त्राच्या दृष्टीने बघितले असता मनुष्याच्या मनात जेव्हा नकारात्मक गोष्टींचे प्राबल्य वाढते तेव्हा तो विकार मनाला जडतो व आंतरिक अस्वस्थता वाढवतो. पतंजलि योगासुत्रात देखील चित्त- वृत्ती-

निरोधाबद्दल सांगितलेले आहे.चित्त भरकटण्यापासून तसेच वृत्ती (वागण्याची विशिष्ट पद्धत) या दोघांनाही वेळेत कायमस्वरूपी रोकण्यासाठी प्रायश्चित्त प्रक्रिया दीर्घकालिक व कठोर असलेली दिसून येते. अर्थातच मनुष्याचा मानसिकता पाया तेवढा मजबूत बनवायचा असल्यास वर्तमानातही न्यायिक व्यवस्थेबरोबरच अशा प्रकारच्या प्रायश्चित्तांची योजना असणे अत्यंत गरजेचे वाटते.

उद्दिष्ट :-

प्राचीन धर्मशास्त्रातील प्रायश्चित्त विधानाचे महत्व पटवून देऊन आजच्या काळात दोष व पापक्षालनासाठी प्रायश्चित्ताची प्रासंगिकता विशद करणे.

प्रस्तावना :-

भारतीय संस्कृतीचे क्षेत्र अत्यंत विस्तृत असून त्यात धर्म, दर्शन, इतिहास, साहित्य, सामाजिक चालीरीती इत्यादी समाविष्ट होतात. यापैकी धर्माचे महत्त्व भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण मानले जाते. ही एक अत्यंत व्यापक संकल्पना आहे. किंबहुना धर्म हाच मानवी जीवनाचे अस्तित्व आहे. म्हणूनच धर्माचा खरा अर्थ कर्तव्य तथा आचरण असा घेतला जातो. धर्म म्हणजे तोच जो मनुष्याला संपूर्ण विनाशापासून आणि अधोगतिपासून वाचवून अभ्युदय आणि नि:श्रेयस प्रदान करेल.

"यतोऽभ्युदय निःश्रेयससिद्धीःस धर्मः ।"१

तर महाभारतात

"धारणाद्धर्ममित्याहुधर्मो धारयते प्रजाः।"२

म्हणूनच पूढे आचार व कर्तव्य आणि त्यांचे पालन हाच धर्मशास्त्राचा प्रमुख विषय ठरला. प्रथम धर्मसूत्रे व त्यानंतर स्मृती ग्रंथांचे निर्माण झाले. म्हणूनच

"श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।"३

स्मृतीग्रंथांनी ही प्रामुख्याने वेदार्थच प्रतिपादित केले. त्यामुळे सदाचार तसेच धर्माचरण आज स्मृतींचा प्रमुख विषय ठरला. अशा या स्मृतींमध्ये तीन प्रमुख विषयांचे विवेचन दिसून येते. आचार, व्यवहार तथा प्रायश्चित्त. यापैकी प्रायश्चित्त विधानाच्या अंतर्गत विविध प्रायश्चित्तांचे विधान सांगितलेले आहे.

"अवश्यमेव भोक्तव्यं कृतं कर्म शुभाशुभम्।"४

असे असल्याने शुभ- अशुभ कर्मांचे फळ भोगावे लागते असे स्मृती म्हणतात. त्यामुळे 'कर्मविपाक' हा देखील स्मृतींचा एक प्रमुख विषय ठरतो. जेव्हा मनुष्याच्या हातून एखादे दुष्कृत्य घडते व त्याने या कृत्यांचे प्रायश्चित्त देखील केले नाही तर तेव्हा धर्मशास्त्राने या पापकृत्यांच्या चिन्हस्वरूप कुठल्यातरी रोगांनी तथा शारीरिक दोषांनी मनुष्य ग्रासीत होतो असे सांगितले आहे. त्यामुळे ढ मनुष्य प्रायश्चित्त स्वरूप कर्म करतो तेव्हाच मनुष्य या सांसारिक जन्म मरणाच्या दारुण दुःखातून मुक्त होऊन अनंत आनंदात विलीन होतो. अर्थात चित्तशुद्धी होवून पून्हा तो अशा कर्मविपाकांकडे वळत नाही.

धर्मशास्त्रीय ग्रंथातील हे विषय मनुष्याच्या इहलौकिक तथा पारलौकिक आनंदाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. धर्मशास्त्र आचारवान बनण्याचे ज्ञान देते सद्व्यवहार शिकवते आणि म्हणूनच मानवतेसाठी हे

परमकल्याणकारी सिद्ध होते. म्हणूनच पुन्हा कालबाह्य झालेल्या धर्मशास्त्रातील या ज्ञानाकडे जाण्याची व ते आत्मसात करण्याची नितांत गरज वाटते.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग केला गेला.

प्रायश्चित्त विधान:-

धर्मशास्त्रीय ग्रंथातील तिसरा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय म्हणून प्रायश्चित्त महत्त्वपूर्ण ठरते. वैदिक साहित्यात प्रायश्चित्तांसाठी दोन शब्द प्रयुक्त केलेले आढळतात. 'प्रायश्चित्त' तथा 'प्रायश्चित्ती 'परंतु या दोघांचाही अर्थ समान मानल्या जातो. तैतरिय संहितेत 'पातकांचे परिमार्जन' या अर्थाने हा शब्द योजलेला आहे. तर काही ठिकाणी याचा अर्थ **"आपत्तीकारक कृत्यांचे निवारण करण्याकरता करावयाचा विधी** "।५या अर्थाने आलेला आढळतो .परंतु बहुतांशी धर्मग्रंथात आणि टीकाग्रंथात प्रायश्चित्त म्हणजे

"प्रायो नाम तप: प्रोक्तं चित्तं निश्चय उच्यते।
तपोनिश्चयसंयोगात् प्रायश्चित्तमिती स्मृतम् ।"६

अर्थात प्राय (म्हणजे तप) आणि चित्त (म्हणजे निश्चय)अर्थात दृढ भावना, या दोन पदांपासून झालेला आढळून येतो.

तर बालंभट्टी या ग्रंथात उधृत केलेल्या एका वचनात प्राय म्हणजे पाप आणि चित्त म्हणजे शुद्धता असा अर्थ घेऊन प्रायश्चित्त म्हणजे पापापासून शुद्धी असा केलेला आहे. म्हणूनच प्रायश्चितांचे महत्त्व पूर्वीपासून आजतगायत तसेच कायम आहे. हे सांगताना शातातप ऋषि
म्हणतात,

"प्रायश्चित्तविहीनानां महापातकीनां नृणाम्।"
नरकान्ते भवेज्जन्म चिन्हांकित शरीरिणाम्।।"७

परंतु धर्मग्रंथांनी एवढे सांगूनही आज हे ज्ञान दुर्लक्षिले गेले व त्यामुळे समाजाचा स्तर कुठेतरी खालावलेला आढळतो. मनुष्याला समाजात योग्य प्रकारे घडविण्यासाठी तसेच न करण्यायोग्य अशा दुष्कृत्यापासून परावृत्त करण्यासाठी आज न्यायिक व्यवस्थेबरोबरच प्रायश्चित्तांची मदत घेणे पर्याप्त ठरते.

प्रायश्चित्तांची समाजजीवनात प्रासंगिकता:-

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. समाजात जगत असताना समाजातील नीतिनियमांचे पालन करणे हे पर्याप्त ठरते. अशा उत्तम समाजाची निर्मिती करीत असताना धर्मशास्त्रातील ज्ञानाची निश्चितपणे मदत होते.

परंतु वास्तविक बघितले असता वर्तमानात प्रगतीशील राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या जीवघेण्या स्पर्धा व त्यायोगे आलेल्या अनेक समस्या यांमुळे मानवी वर्तनाला गुंतागुंतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यातूनच दारिद्र्य, भ्रष्टाचार, चोऱ्या, आत्महत्या, दरोडे, खालावलेली मूल्ये यासारख्या अनेक समस्यांनी आज समाजाला पोखरले आहे. मनुष्यांचे नैतिक, सामाजिक व शारीरिक अध:पतन होत आहे. हे सर्व टाळण्यासाठी व मानवी मनाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी प्रायश्चित्त हा उत्तम मार्ग आहे.

प्रायश्चित्ताने समाजाचे हित साधले जाते असे धर्मशास्त्र सांगते. आज आपल्या समाजव्यवस्थेत मनुष्याच्या हातून घडलेल्या दुष्कृत्यांसाठी अथवा चुकांसाठी न्यायिक व्यवस्था आहे. परंतु न्यायव्यवस्था ही पुराव्यांवर आधारलेली असते. पुरावा सिद्ध झाला नाही तरीदेखील असे कृत्य घडले नसावे हे नाकारता येत नाही. शिक्षा अथवा दंड झाला नाही तरी माणसाचे मन खरे काय हे जाणून असते, व हीच दोषभावना मनात तशीच राहून व्यक्तीची आंतरिक अस्वस्थता वाढवते. ही मनातील अस्वस्थताच समाजास घातक ठरते.

अशावेळी आपल्या चुकीचे परिमार्जन स्वतः करण्यासाठी प्रायश्चित्त घेण्याची निवड व्यक्ती करू शकेल अशी सामाजिक व्यवस्था न्यायिक व्यवस्थेच्या जोडीने घडवून आणल्यास व्यक्ती वर्तन सुधारण्यास सहाय्यक ठरू शकेल व त्यामुळेच आज प्रायश्चित्तांची नितांत आवश्यकता वाटते.

प्रायश्चित्त घेणारी व्यक्ती स्वतः घेतलेल्या प्रतिज्ञेत बद्ध होते आणि त्यामुळेच ती पूर्णत्वाने त्याचे पालन करून सदाचारी होते. याउलट अपराध कबूल करून अथवा दंड भोगून कुठलीही व्यक्ती स्वतःला तीच चूक पुन्हा करण्यापासून रोखू शकत नाही. अर्थात दंड भोगून सुद्धा अशा व्यक्तीत सुधारणा दिसून येत नाही. मनुष्याने केलेल्या दुष्कृत्यांचा परिमार्जनास जेव्हा ती व्यक्ती स्वतःहून प्रवृत्त होते तेव्हाच त्याच्या मनाची शुद्धी होऊन केलेल्या दुष्कर्मातून त्याची सुटका होते व यालाच प्रायश्चित्त म्हणतात. म्हणूनच उपनिषदातदेखिल असे म्हटले आहे की

"यन्मनसा ध्यायति तद् ,वाचा वदति,यद् वाचा वदति।
तत् कर्मणा करोति,यत् कर्मणा करोति तदभिसम्पद्यते।।"८

त्यामुळेच प्राचीन काळी चुकीच्या परिमार्जनासाठी प्रायश्चित्त घेण्यात येत असत. जसे वैदिक मंत्रांचे उच्चारण, तुलाभार ज्यात व्यक्ती स्वतः जवळील सोने, चांदी तथा धान्य व्यक्तीच्या वजनाइतके दान करीत असे. तसेच अन्नदान अर्थात भुकेल्यांना तसेच गरजूंना भोजन देणे, पंचगव्याचे सेवन देखील प्रायश्चित्त स्वरूप व्यक्ती करीत असे. त्याचबरोबर उपास करणे हेदेखील प्रायश्चित्त व्यक्ती घेत असे. आजच्या काळात देखील यातील बरीचशी प्रायश्चित्ते मनुष्य चुकीच्या परिमार्जनासाठी घेत असतो. जसे तीर्थयात्रा करणे, अन्नदान करणे, सोने,चांदी, धान्य दान स्वरूप देणे, उपवास करणे, पापांपासून मुक्त होण्यासाठी पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे, इत्यादी प्रायश्चित्ते आजही घेतली जातात.

प्रायश्चित्त घेण्याचा प्रमुख उद्देश हाच की जाणतेपणी अथवा अजाणतेपणी जी काही आपत्ती- कारक कृत्य मनुष्याच्या हातून घडतात त्यांचे परिमार्जन व्हावे, ज्यामुळे व्यक्ती अंतर्बाह्य शुद्ध होऊन त्याच्या मनातील दोषभावना नाहीशी होते व मृत्युपश्चात अशी व्यक्ती स्वर्ग प्राप्त करते असे शास्त्र सांगते. त्यामुळेच प्राचीन काळापासून तर आजतागायत प्रायश्चित्तांचे महत्व यत्किंचितही कमी झालेले नाही व होणारही नाही.

अशा या प्रायश्चित्तांचे अनेक प्रकार आहेत. अभिसस्त (public confession) अनुताप (Repentance) प्राणायाम, होम, जप, दान, तीर्थ उपवास इ..

अभिसस्त अर्थ पब्लिक कन्फेशन हे प्रायश्चित्त घेताना व्यक्तीस घरोघरी जाऊन भिक्षा मागावी लागत असे व त्या प्रत्येक घरी स्वतः केलेल्या पाप कर्माचे उच्चारण करावे लागे. या प्रायश्चित्ताचा हेतू हाच की व्यक्तीने केलेल्या चुकीच्या कर्माची त्याला जाणीव व्हावी, घरोघरी भिक्षा मागून उदरनिर्वाह करण्याचा हेतू हाच की त्याचा अहंकार गळून पडावा, त्या व्यक्तीत नम्रता यावी त्यायोगे बुद्धी शुद्ध व्हावी. एकदा का बुद्धी शुद्ध झाली की असे कृत्य घडणार नाही अशी व्यक्ती स्वतःच काळजी घेते व त्यायोगे वर्तनात सुधारणा घडून येते.

अनुताप या प्रायश्चित्ताचे अनुसरण तर आपण आजही करताना दिसतो.

उदाहरणार्थ- लहान मुलाने जर एखादे कृत्य केले तर त्याला याची जाणीव करून देण्यासाठी 'मी असे करणार नाही 'असे अनेक वेळा लिहायची शिक्षा दिली जाते. याचा उद्देश हाच की केलेले कृत्य त्याच्या कायम स्मरणात राहावे, मनापासून बुद्धीत रुजावे,बुद्धीपासून पासून चित्तात रुजावे आणि एकदा का ही गोष्ट चित्तात रुजली की तसे वर्तन पुन्हा घडून येण्याची शक्यता कमी होते.

म्हणूनच भारतीय संस्कृतीत मुलांमध्ये लहान वयातच संस्काररुपी बीजाचे रोपण केले जाते, जेणेकरून पुढे येणारी पिढी संस्कारक्षम होऊन समाजास हितकारक ठरेल. त्यादृष्टीने सुदृढ समाजाच्या पुनर्बांधणीसाठी प्रायश्चित्तांची नितांत गरज आहे. प्रायश्चित्तांचा प्रमुख उद्देश मानवी मनाची शुद्धी हाच असल्याने ती झाल्याशिवाय मनुष्य सतकृत्यांकडे आकर्षिला जाऊ शकत नाही. एकदा का मनाला निर्मळता प्राप्त झाली की मनुष्य सतकृत्यांकडेच वळेल. म्हणूनच वेदांनी देखील

"तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।।"९

अशी शिकवण समाजाला दिली ती सर्वथा योग्यच वाटते. व या मनाच्या शुद्धी करता म्हणूनच प्रायश्चित्तांची नितांत गरज वाटते.

संदर्भ सूची:-

१. वैशेषिक द.अ क्र.१श्लोक क्र.2
२. महाभारत शांतीपर्व२००/३०१
३. मनु.स्मृ.अ.२श्लो.क्र.१०
४. धर्मशास्त्रांक पृ.क्र.१८८
५. धर्म.का.इति. प्र.३पृ.क्र.१५
६. गौ.ह.टी.२२.१
७. शातातप १/१
८. वैदिक नि.पृ.क्र.२५१
९. यजुर्वेद. अ.क्र.३४ मं.१-६

संदर्भ ग्रंथ सूची:-

1. मनुस्मृती
भट्ट पंडित रामेश्वर
चौखंबा संस्कृत प्रतिष्ठान
आवृत्ती 2015
2. धर्मशास्त्राचा इतिहास
भट यशवंत आबाजी
महाराष्ट्र राज्य साहित्य व
संस्कृती मंडळ; मुंबई

प्रथमावृत्ती 1980

3. धर्मशास्त्र का इतिहास
काने डॉ. पांडुरंग वामन
उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान
प्रथम संस्करण 1963

4. धर्मशास्त्र आणि समाज
पंडित नलिनी व्याख्यानमाला

5. धर्मशास्त्र संग्रह
श्रीकृष्ण दासाने खेमराज
प्रथमावृत्ती 1933

6. वैदिक निबंध
वेदालंकार डॉ. रघुवीर
न्यू भारतीय बुक कॉर्पोरेशन;
दिल्ली

6. स्मृति साहित्य हे सामाजिक
प्रबंधन
यादव डॉ. धर्मपाल
बी. एस. के पब्लिशर्स, दिल्ली
प्रथम संस्करण 2015

****

चाणक्यनीतितील मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून राज्यशास्त्र विषयाचे अध्ययन

कु. वैष्णवी जगन्नाथ पाटील,
डॉ. पराग जोशी

सारांश :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी "चाणक्यनीतितील मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून राज्यशास्त्र विषयाचे अध्ययन" असा विषय निवडलेला आहे. शोधनिबंधाच्या सुरूवातीस चाणक्यनीतिचा व भारतीय विद्यापीठांद्वारे शिकविल्या जाणाऱ्या राज्यशास्त्र या विषयांतील अभ्यास घटकांचा सारांशरूपाने विचार केलेला आहे. व त्यानंतर चाणक्यनीतिद्वारे राज्यशास्त्र विषयांतील कोणते घटक अभ्यासता येवू शकतात याचा विचार मांडलेला आहे. सामाजिक शास्त्रामध्ये अतिशय महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या 'राज्यशास्त्र' या विषयास खूप मोठा इतिहास आहे. व या इतिहासात आचार्य चाणक्यांचे नाव एक पारंगत राजनीतिज्ञ म्हणून घेतले जाते. त्यांनी रचलेल्या 'अर्थशास्त्र' व 'चाणक्यनीति' या दोन्हीही ग्रंथाचा अभ्यास संपूर्ण जगभर केला जात आहे. त्यांनी रचलेल्या नीतिग्रंथामध्ये राज्यशास्त्रातील अनेक घटकांविषयीचे मार्गदर्शन मिळते. जे आजही तितकेच फायदेशीर आहे. चाणक्यांनी आपल्या नीतिग्रंथात केवळ नीतिमूल्येच नव्हे तर व्यावहारीक कुशलतेचेही धडे दिलेले आहेत. त्यांच्या नीतिग्रंथात राज्यशास्त्र, प्रशासन या दोन्ही विषयांचा समावेश असलेला पाहायला मिळतो. ज्याचा उपयोग आधुनिक काळातही होवू शकतो. याकारणानेच, राज्यशास्त्र विषयाच्या अध्ययनासाठी चाणक्यनीति कशी उपयूक्त ठरू शकते हे मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे केला आहे.

मुख्यशब्द : चाणक्यनीति, आचार्य चाणक्य, राज्यशास्त्र.

प्रस्तावना :

भारतीय राजकीय विचारवंतांमध्ये आचार्य चाणक्यांचे नाव अग्रणी आहे. चाणक्यांनी मगध सारख्या बलाढ्य देशाच्या नंद राजाच्या सत्तेचा पूर्णत: नाश करून बुध्दीमान अशा चन्द्रगुप्ताला राजसिंहासनावर बसवले. केवळ एक राजकीय विचारवंतच नव्हे तर एक अध्यापक, कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, तत्वज्ञ, आचार-विचारांचे मर्मज्ञ, कूटनीतितील सिध्दहस्त्ा, चन्द्रगुप्ताचे मंत्री म्हणूनही त्यांची ख्याती आहे. भारतीय साहित्याच्या दृष्टीने पाहिले तर त्यांचे योगदान अतूलनीय आहे. त्यांनी रचलेला "अर्थशास्त्र" ग्रंथ पिढ्यानपिढ्या संपूर्ण जगाला अर्थशास्त्राचे, राज्यशास्त्राचे मार्गदर्शन करत आहे. त्यांनी रचलेला नीतिग्रंथ म्हणजेच चाणक्यनीति होय. या ग्रंथात व्यक्तीने आयुष्य्ा कशारीतीने व्यतित करावे याचे मार्गदर्शन आपल्याला लाभते. याशिवाय ही नीति व्यक्तिला व्यवहारातील कुशलताही शिकवते. संस्कृत साहित्यातीलच नव्हे तर भारतीय साहित्यात या नीतिग्रंथाला महत्वाचे स्थान असलेले पाहायला मिळते.

चाणक्यनीतिमध्ये आचार्य चाणक्यांनी सतरा अध्याय रचलेले आहेत. यांतील श्लोक व्यक्तिला जीवनमूल्यांचे शिक्षण तर देतातच शिवाय व्यावहारिक दृष्टीनेही मार्गदर्शन करतात. चाणक्यनीतिचा अभ्यास केवळ नैतिकमूल्यांसाठीच नसून याचे अध्ययन राजकीय, प्रशासकीय, व्यवस्थापकीय दृष्टीने करता येवू शकते. राज्यशास्त्र विषयाचा विचार केला तर "चाणक्यनीति" किती मार्गदर्शक ठरू शकते व प्रचलित राज्यशास्त्र विषयाच्या घटकांचे अध्ययन चाणक्यनीतिद्वारे कसे करता येवू शकते. हे स्पष्ट करण्यासाठीच संशोधकाने शोधनिबंधासाठी प्रस्तुत विषय निवडलेला आहे.

उद्दिष्ट :

"राज्यशास्त्र" या विषयाच्या अध्ययनासाठी चाणक्यनीतिची उपयुक्तता स्पष्ट करणे.

शोधपद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विवेचनात्मक शोधपद्धती वापरण्यात आलेली आहे.

चाणक्यनीति चा सारांश :

चाणक्यनीति मध्ये एकूण सतरा अध्याय आहेत. यांत आप्त म्हणजे कोण?, जीवनावश्यक गोष्टींचे महत्व, सावधगिरीचे तत्व, मित्रांची लक्षणे, गुप्ततेचे महत्व, पालकांची कर्तव्ये, उत्तम संगतीचे महत्व, दुष्ट व्यक्ति पासून लांब राहावे, साधुचे महत्व, उत्तम व मधुरवाणीचे महत्व, अतिरेकाचा त्याग, उत्तम आरोग्याचे महत्व, विद्देचे महत्व, सद्गुणांचे महत्व, मनुष्यबळाची आवश्यकता, माता ,पिता, पत्नी इ. ची कर्तव्ये, उत्तम कार्यासाठी आत्मविश्वासाची आवश्यकता, सत्याचे महत्व धर्माचे/कर्तव्याचे महत्व, श्रवणाचे फायदे, व्यक्तिने प्राण्यांकडून शिकण्यायोग्य गोष्टी, आयुष्य समाधानाने व्यतित करावे, सुरक्षितता, शत्रुसोबतचे वर्तन, सावधानतेचे महत्व, कृतज्ञता, शांती, धन इ. चे महत्व तसेच आत्म्याविषयीचे विवेचनही चाणक्यनीतित आढळते.

चाणक्यांनी वेगवेगळ्या श्रेणीतील लोकांच्या अपेक्षा कोणत्या असतात, सत्पात्री ज्ञानाचे महत्व, सर्वश्रेष्ठ गोष्टी कोणत्या आहेत, शिक्षणाचे महत्व, थोड्याप्रमाणात केलेल्या दिखाव्याचे महत्व, युक्तीचे महत्व, आहारविषयीचे विवेचन, मनाचे विवेचन, मौन, त्याग इ. महत्व, आदर्श गृहाचे लक्षण, सातत्याचे महत्व, कार्य करताना करावयाच्या गोष्टी, योग्य नियोजनाचे महत्व, आपत्तीकालीन कार्य, राजाची कर्तव्ये, धार्मिकतेचे महत्व, सामूहिक कार्याचे महत्व, धन-धान्य, विद्या इ. च्या संग्रहाविषयी प्रामाणिकपणा, संस्कार, मधुरवाणी, गुरूमहिमा, जशास तसे वागणे अशा अनेक गोष्टी सांगितल्या आहेत.

वास्तविक पाहाता चाणक्यनीतिचा आढावा घेतला तर एक गोष्ट जाणवते की, ही नीति नीतितत्वाचे, नीतिमूल्यांचे सखोल मार्गदर्शन तर करतेच मात्र यांतील कित्येक श्लोक केवळ मूल्येच नाही तर अनेक प्रचलित विषयांचे कमी अधिक प्रमाणात ज्ञान देतात. यांतील अनेक श्लोक आधुनिक विषयांना स्पर्श करतात. या दृष्टीनेही या ग्रंथाचे महत्व खूप आहे.

राज्यशास्त्र विषयात समाविष्ट होणारे घटक :

सामाजिक शास्त्रांमध्ये राज्यशास्त्र विषयाचे स्थान केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात महत्वाचे आहे. या विषयांचे अध्ययन करत असताना केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व काही प्रमाणात व्यवस्थापकीय अशा अनेक बाबींचा अभ्यास केला जातो. राज्यशास्त्राच्या अभ्यास घटकांमध्ये राज्यशास्त्र या विषयाचा इतिहास तसेच अनेक तत्वज्ञ विचारवंत, यांच्या मतांचा, तत्वांचा, सिध्दांतांचा व

विचारांचा समावेश होतो. राज्यशास्त्रांतील ज्या महत्वपूर्ण संकल्पना आहेत जसे समता, न्याय, बंधूता, सार्वभौमत्व्, क्रांती या मूलभूत संकल्प्नांचेही सखोल अध्ययन यांत केले जाते.

जगभरातील अनेक देशांचा इतिहास व त्यांच्या शासनव्यवस्था, प्रशासनव्यवस्था, न्यायव्यवस्था यांच्या अध्ययनासोबतच नोकरशाहीचे देखील सखोल अध्ययन राज्यशास्त्रात केले जाते. आज "लोकप्रशासन" हा एक स्वतंत्र अभ्यासविषय आहे. मात्र या विषयाचे अध्ययन पूर्वी राज्यशास्त्र विषयाच्या अंतर्गत केले जायचे. आज तो एक स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून अभ्यासला जातो. असे असले तरी लोकप्रशासन विषयक अनेक घटकांचा समावेश राज्यशास्त्रात होतो. उदा. लोकप्रशासनाचा अर्थ, व्याख्या, उगम, महत्व, स्वरूप, सिध्दान्त, संघटना, कार्मिक प्रशासन, वित्तीय प्रशासन, सुशासनाची संकल्पना, प्रशासकीय नीतिमत्ता अशा अनेक घटकांचा उल्लेख करता येईल.

राज्यशास्त्र विषयांत आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनाला महत्वाचे स्थान आहे. यांत शस्त्र, युद्ध, शक्तिचे तत्व, संघर्ष, शस्त्रस्पर्धा, संधी, तह, करार, कलह, कूटनीति, गठबन्धन, वैश्वीकरण अशा अनेक गोष्टी समाविष्ट आहेत. देशाचे इतर राष्ट्रांशी कसे संबंध असावेत याचा देखील विचार मांडलेला आहे. यासंबंधीच्या अनेक विचारवंतांची मते, राजकीय तत्वे, नीतिमूल्ये, अनेक राजकीय संकल्पना यांचाही समावेश यांत केला जातो. देश व प्रदेशानुसार राज्यशास्त्र विषयाच्या घटकांत बदल असलेला जाणवतो. मात्र सामान्यदृष्टीकोनातून राज्यशास्त्र या विषयांतील अभ्यास घटकांत वरील घटकांचा समावेश असलेला पाहायला मिळतो.

चाणक्यनीतिच्या माध्यमातून राज्यशास्त्र विषयाचे अध्ययन :

आचार्य चाणक्य यांच्या चाणक्यनीतित एकूण सतरा अध्याय आहेत. त्यांच्या नीतिमध्ये राज्यशास्त्र विषयी मार्गदर्शन करणारे अनेक श्लोक पाहायला मिळतात. जे आपल्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या राज्यशास्त्र विषयातील अनेक घटक सांगताना आढळतात. चाणक्यांनी आपल्या नीतित अगदी सुरूवातीच्याच काही श्लोकांमध्ये आपत्ती किंवा संकटप्रसंगांवर मात करण्यासाठी धनसंचयाचे महत्व सांगितले आहे. ते म्हणतात,

"आपदार्थे धनं रक्षेत्।"[१]

याठिकाणी अप्रत्यक्षरित्या हे कथन केले आहे की, देशात येणाऱ्या कोणत्याही अडचणींवर मात करण्यासाठी राष्ट्राकडे धनसंचय असणे अत्यावश्यक आहे. या श्लोकाद्वारे आचार्य चाणक्यांनी आर्थिक प्रशासनातील एका महत्वपूर्ण घटकाकडे लक्ष वेधलेले दिसून येते. आणि ते म्हणजे भविष्यातील संकटांवर मात करण्यासाठी धनसंचयाचे महत्व होय. आपत्ती निवारणार्थ आत्मविश्वासाने त्या आपत्तीस सामोरे जावून ती आपत्ती सोडवावी व त्या आपत्तीचे भय हे केवळ ती आपत्ती किंवा संकट येईपर्यंतच असावे. असे मत चाणक्य आपल्या पूढीलश्लोकात मांडतात. ते म्हणतात,

"तावत् भयेषु भेतव्यं यावद्भयमनागतम्।
आगतं तुभयं दृष्ट्वा प्रहर्तव्यमशङकया"॥[२]

आपत्ती किंवा संकट निवारण्यासाठी पूर्वनियोजन करणे व संकटाला सामोरे जाणे याचे महत्व सांगताना चाणक्य म्हणतात,

"अनागतविधाता च प्रत्युपन्नमतिस्तथा।
द्वावेतौ सुखमेधते यद्भविष्यो विनश्यति"॥[३]

या श्लोकानुसार, आपत्ती निवारणासाठी जो सुरूवातीपासूनच तयारीत असतो व संकट आल्यास जो तीचा तात्काळ सामना करतो अशा दोन्ही व्यक्तींच्या सुखात वाढच होते. या श्लोकाचा अप्रत्यक्ष अर्थ शासनाचे आपत्ती निवारणाचे धोरण कशा स्वरूपाचे असावे ह्या बाबतींत मार्गदर्शक आहे. अशारीतीने चाणक्यांनी शासनाचे आपत्ती निवारणाचे धोरण कसे असावे यासंबंधी काही सल्ले दिलेले आढळतात. जे आजही लागू पडताना दिसून येतात.

देश किंवा राष्ट्र कसे असावे हे सांगताना चाणक्य सांगतात,

"यस्मिन् देशे न सम्मानो न वृत्तिर्न च बान्धवा:।
न च विद्याऽऽ**गम: कश्चित् तं देशं परिवर्जयेत्"**॥[4]

प्रस्तुत श्लोकांत राष्ट्राने आपल्या नागरिकांना कोणत्या गोष्टी द्याव्यात. याचा अप्रत्यक्षरित्या उल्लेख केलेला आढळतो. याश्लोकानुसार, राष्ट्राने आपल्या नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था करावी व नागरिकांनी केलेल्या उत्तम कार्याविषयी त्यांचा सत्कार, सम्मान देखील करावा. थोडक्यात, प्रस्तुत श्लोकात चाणक्यांनी राष्ट्राचे नागरिकांप्रती असलेले कर्तव्य सांगितलेले आहे. त्यांनी राष्ट्राकडे उत्तम शासनव्यवस्था, उत्तम आरोग्यव्यवस्था, विद्वत्ता व उत्तम आर्थिक व्यवस्था असायला हवी याचा पुरस्कार केला आहे तर अराजकतेचा निषेध केलेला पाहायला मिळतो. आचार्य चाणक्य व्यक्तिच्या निश्चीत कार्याला महत्व देताना दिसून येतात. ते सांगतात,

"यो ध्रुवाणि परित्यज्य् अध्रुवं परिषेवते।
ध्रुवाणि यस्य् नश्य्न्ति अध्रुवं नष्टमेव च"।[5]

यानुसार, जी व्यक्ति निश्चीतपणे प्राप्त होणारी गोष्ट सोडून अनिश्चीत गोष्टीच्या मागे जाते, त्या व्यक्तिस अनिश्चीत गोष्ट तर प्राप्तच होत नाही मात्र निश्चीत मिळणारी गोष्टही नाश पावते. याश्लोकाद्वारे शासनव्यवस्थेने, प्रशासनाने किंवा यांच्याशी निगडीत कोणाही व्यक्तिने, समूहाने व संस्थेने कार्य करताना अधिक महत्व कोणत्या गोष्टींना द्यावे हे सांगितलेले आढळते. राज्यशास्त्रामध्ये शासनाने एखादे धोरण निश्चीत केल्यानंतर किंवा एखादा महत्वपूर्ण निर्णय घेतल्यानंतर त्याबाबत गुप्तता राखणे व योग्यवेळीच त्याची वाच्यता करणे याला महत्व दिले जाते. याविषयी फार पूर्वीच आचार्य चाणक्यांनी सल्ला दिला आहे. ते सांगतात,

"मनसा चिन्तितं कार्यं वाचा नैव प्रकाशयेत्।
मन्त्रेण रक्षयेद्गूढं कार्ये चाऽपि नियोजयेत्"॥[६]

प्रस्तुत श्लोकानुसार, मनात योजिलेले कार्य कुणाजवळही बोलून दाखवू नये. त्यासंदर्भात पूर्ण विचारांती योग्य नियोजन करावे व आपली योजना गुप्तच ठेवावी. याठिकाणी चाणक्यांनी गुप्ततेचे महत्व व योग्य नियोजन करण्याचा सल्ला या दोन्हीही गोष्टी सांगितलेल्या आहेत. दण्डाविषयी चाणक्य सांगतात, शिक्षा करणे किंवा दण्ड करणे हे गुणांच्या वृद्धीसाठी आवश्यक आहे. याद्वारे आचार्य चाणक्यांनी दण्ड करण्याचे महत्व मांडले आहे.

शासनव्यवस्थेमध्ये मंत्रीमंडळाचे स्थान हे महत्वाचे आहे. हे ओळखून चाणक्य सांगतात,

"मन्त्रीहीनाश्च् राजान: शीघ्रं नश्यन्त्यसंशयम्।[७]

प्रस्तुत श्लोकानुसार, “मंत्रीमंडळाच्या अभावी देशाच्या प्रमुखाचा नाश होवू शकतो.” म्हणूनच चाणक्यांनी शासनातील उत्तम मंत्रीमंडळाचे महत्व जाणून त्याची महत्ता स्पष्ट केलेली आहे. व पात्रतेनुसार कार्य सोपवण्यावर भर दिलेला आहे. धोरणनिश्चिती करताना, कार्य करताना सतर्कता हे तत्व ही महत्वपूर्ण ठरते याकारणाने चाणक्यांनी सतर्कतेचा किंवा सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यांच्या मते “जो नेहमी सतर्क असतो त्यास कोणतीही भीती वाटत नाही.”[८] प्रस्तुत सल्ल्याचा मतितार्थ राष्ट्रासाठी, शासनासाठी खूप लाभदायक व महत्वपूर्ण आहे. राजकीय नीतिमत्तेमधील खूप महत्वाच्या घटकाकडे चाणक्यांनी लक्ष वेधलेले दिसून येते.

शासन करणाऱ्या शासकाविषयी तसेच प्रशासन करणाऱ्या प्रशासकाविषयी किंवा कोणत्याही मुख्य अधिकाऱ्याविषयी चाणक्य काही मते मांडतात. ते सांगतात, “राजाला प्रजेचे परिणाम भोगावे लागतात” याचा मतितार्थ हे सांगतो की, कोणत्याही शासकावर, अधिकाऱ्यावर किंवा वरिष्ठावर त्याच्या जनतेच्या, कनिष्ठांच्या कार्याची जबाबदारी असते. याकारणाने कोणत्याही कृत्यासाठी वरिष्ठालाच जबाबदार धरले जाते. म्हणून अंतिमत: वरिष्ठांनाच परिणाम भोगावे लागतात. राजाच्या किंवा शासकाच्या गुणांविषयी सांगताना चाणक्यांनी ‘लोककल्याणकारी राजा’ ला पवित्र मानले आहे. या संकल्पनेद्वारे चाणक्यांनी शासन हे जनहितार्थच हवे हेच सांगितले समजते. शासकाचे गुण सांगताना चाणक्य लिहितात शासकाने कधीही समाधानी नसावे त्यांच्या मते, समाधानी राजा (शासक) नष्ट होतो.[९] याचा मतितार्थ असा आहे की, शासकाने जनकल्याणाबाबत, धोरणांबाबत, आपल्या कार्याबाबत, कधीही समाधानी असू नये. कारण शासक जर समाधानी असेल तर त्या राष्ट्राची प्रगतीच खुंटेल. याकारणाने शासक महत्वाकांक्षी असावा असे चाणक्यांना वाटते. जनता शासकाचेच अनुकरण करत असते हे सांगताना चाणक्य लिहितात,

“राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठा: पापे पापा: समेसमा:।
राजानमनुवर्तन्ते यथा राजा तथा प्रजा:”।।[१०]

प्रस्तुत श्लोलानुसार, “राजा (शासक) जर धर्मात्मा असेल तर प्रजाही त्याप्रमाणेच असते याउलट राजा जर पापी असेल तर प्रजाही पापी व राजा उदासीन असेल तर प्रजा देखील उदासीनच असते. कारण प्रजा नेहमीच राजाचे (शासकाचे) अनुकरण करत असते.” याकारणाने शासकाचे आचरण हे उत्तम असावे यावर चाणक्यांनी भर दिलेला आहे. राष्ट्र दुराचारमुक्त असावे यासाठी चाणक्यांच्या नीतित सुशासनाची संकल्पना देखील पाहायला मिळते. त्यांनी प्रश्नाद्वारे या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. एका श्लोकांत चाणक्य विचारतात,

“कुराजराज्येन कुत: प्रजासुखं”।[११]

म्हणजे, “वाईट राज्यात किंवा देशात प्रजेला सुख कोठून मिळेल?” प्रस्तुत प्रश्नाद्वारे त्यांनी राज्यांत, राष्ट्रांत सुशासनाची आवश्यकता मान्य केलेली आहे हेच स्पष्ट होते.

राज्यशास्त्र विषयांत राजकीय, प्रशासकीय नीतिमत्ता हा घटक देखील अभ्यासला जातो. चाणक्यांच्या नीतित याविषयी देखील माहिती आढळते. चाणक्यांनी व्यक्तिमध्ये नियमितपणा, लढवय्येपणा, सतर्कता, कृतज्ञता, देशाप्रति निष्ठा, प्रामाणिकपणा, कार्यतत्परता, कर्तव्यपरायणता अशी अनेक मूल्ये सांगितलेली आहेत. कृतज्ञता हे मूल्य सांगताना त्यांनी हंसाचे उदाहरण दिले आहे. ते म्हणतात,

“यत्रोदकं तत्र वसन्ति हंसा: तथैव शुष्कं परिवर्जयन्ति।
न हंसतुल्येन नरेण भाव्यं पुनस्त्यजन्ते पुनराश्रयन्ते”।।[१२]

या श्लोकानुसार, "व्यक्तिने हंसाप्रमाणे वागणे उचित नाही. कारण हंस पाणी असलेल्या ठिकाणी राहात असतात. जर त्यांच्या निवासाच्या ठिकाणाचे पाणी संपले तर ते त्या स्थानाचा त्याग करतात." थोडक्यात, व्यक्तिने कृतज्ञतेने युक्तच असायला हवे. असे चाणक्य मानतात. प्रामाणिकपणा हे मूल्य सांगताना चाणक्यांनी प्रामाणिकपणे धन जमा करण्यावर भर दिलेला आहे. हे आढळते.[१३]

चाणक्यनीतित कृतज्ञतेबरोबरच कर्तव्य तत्परता, नम्र आचरण, पारदर्शी व्यवहार या मूल्यांवर देखील भर दिलेला आहे.[१४] या नीतिमत्तेच्या अभावी कोणतेही शासन सुशासन होवूच शकणार नाही. राज्यशास्त्र विषयामध्ये आंतरराष्ट्रीय संबंध व देशाचे परराष्ट्र धोरण या दोन्ही घटकांचा अभ्यास विस्तारपूर्वक केला जातो. प्रत्येक राष्ट्राने इतर राष्ट्रांशी आपले सलोख्याचे, शांततेचे, मैत्रीपूर्ण, सौहार्द्याचे संबंध बनवणे गरजेचे असते. आपल्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी इतर राष्ट्रांशी आपला व्यवहार उत्तम असणे गरजेचे असते. यासंबंधी चाणक्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या काही सल्ले दिलेले आढळतात. चाणक्य म्हणतात,

"लुब्धमर्थेन गृहणीयात् स्तब्धमंजलिकर्मणा।
मूर्ख: छन्दोऽनुवृत्तेन यथार्थत्वेन पण्डितम्"।।[१५]

प्रस्तुत श्लोकानुसार, "लोभी व्यक्तिस धनाद्वारे, अहंकारी व्यक्तिस हात जोडून, मूढ व्यक्तिस त्याच्या इच्छेनुसार वर्तन करून तर विद्वान व्यक्तिस सत्य परिस्थिती सांगून वश करता येते."

या श्लोकाचा मतितार्थ लक्षात घेतला तर जाणवते की, याठिकाणी व्यक्तिच्या जागी जर राष्ट्राचा विचार केला तर राष्ट्रांराष्ट्रांतील संबंध कशारीतीने राखावेत याचे देखील मार्गदर्शन केलेले आहे. इतर राष्ट्राशी कसा व्यवहार करावा हे पूढील श्लोकाद्वारे देखील स्पष्ट होते. चाणक्य सांगतात,

"अनुलोमेन बलिनं प्रतिलोमेन दुर्जनम्।
आत्मतुल्यबलं शत्रुं विनयेन बलेन वा"।।[१६]

प्रस्तुत श्लोकानुसार, "बलवान शत्रूशी त्याच्यानुरूप व्यवहार करून, दुष्टशत्रूला जशास तसा व्यवहार करून व तुल्यबळ शत्रूला नम्रतेने किंवा बळाने जिंकावे." या श्लोकांत 'शत्रू' असा शब्द असला तरी शत्रू व मित्र अशा दोन्हीही राष्ट्रांशी व्यवहार करत असताना वरील सल्ल्याचा निश्चीतच लाभ होवू शकतो. यापूढील एका श्लोकाद्वारे चाणक्यांनी 'धन' असणाऱ्या व्यक्तिचे महत्व मांडलेले आहे. ते म्हणतात, ज्याच्याजवळ धन आहे तोच व्यक्ति सुखी व सन्मानाने राहू शकतो. येथे अप्रत्यक्षरीत्या श्रीमंत, विकसित व सुबत्तापूर्ण राष्ट्राविषयीचे मत असलेले पाहायला मिळते. कारण ज्याप्रमाणे धनवान व्यक्ति सुखी राहाते, त्या व्यक्तिस मान, सन्मान अधिक मिळतो. त्याचप्रमाणे धनवान राष्ट्रास जगभरात सन्मान लाभतो. जगभरातील सर्वच देश त्यांच्याशी मैत्रीपूर्ण व्यवहाराची अपेक्षा करताना दिसतात.

चाणक्यनीतिमध्ये राज्यशास्त्र विषयक घटकांतील प्रशासन या घटकावर देखील भर दिलेला दिसून येतो. प्रशासनासाठी आवश्यक घटक पद्धत, नीतिमत्ता अशा अनेक गोष्टींचा विचार राज्यशास्त्रात ही केला जातो. कारण, कोणत्याही राष्ट्रात शासन व प्रशासन या दोन्ही गोष्टी तेवढयाच महत्वाच्या आहेत. शासनातील कार्य करणारी व्यक्ति ही प्रशासनाद्वारे आपले कार्य पाडत असते. योग्य प्रशासनाशिवाय जनकल्याणाचे कोणतेही कार्य यशस्वीपणे पूर्ण होवू शकणार नाही. म्हणूनच चाणक्यांनी देखील आपल्या नीतिद्वारे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या प्रशासन विषयी महत्वपूर्ण बाबी सांगितलेल्या आहेत. त्यांच्या मते, एखाद्या पदावर व्यक्तिची नियूक्ती करावयाची

असल्यास योग्य व्यक्ति नेमावी. तसेच त्यांनी व्यक्तिच्या अंगी असणाऱ्या उत्तम गुणांवर भर देण्यास सांगितले आहे आणि मनुष्यबळाविषयी सांगताना कार्यानुरूप मनुष्यबळाच्या विचारास महत्व दिलेले आहे.

चाणक्यांनी शासन व प्रशासन करत असताना विचारपूर्वक निर्णय घेणे, नियोजन करणे, कार्य करणे व ते कार्य व्यवस्थीतरित्या पूर्ण करणे, आवश्यकता नसेल तर अधिक वाच्यता न करणे अशा अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत. त्यांच्या नीतित संघटनात्मक कार्याचा देखील उल्लेख आढळतो.ते सांगतात,
"अनेक व्यक्ति जेव्हा संघटित होऊन एकत्रितरित्या शत्रूचा सामना करतात तेव्हा ते निश्चितच सफल होतात." येथे शत्रू असा जरी उल्लेख असला तरी याचा मतितार्थ असे सांगतो की, एखादे महत्वपूर्ण कार्य एकत्रितपणे केले तर ते कार्य निश्चीतच सफल होते.

अशाप्रकारे चाणक्यनीतिमध्ये प्रचलित राज्यशास्त्र विषयांतील अनेक घटकांचा समावेश असलेला पाहायला मिळतो. सारांशरूपाने पाहिले तर चाणक्यनीतित शासन, प्रशासन, आपत्तिजनक परिस्थितीत अपेक्षित कार्य, परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय संबंध, राजकीय तसेच प्रशासकीय नीतिमत्ता, सुशासनाची संकल्पना असे काही महत्वपूर्ण घटक असलेले पाहायला मिळतात.

उपसंहार/निष्कर्ष :

चाणक्यनीतिचे अध्ययन केल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, या नीतित 'राज्यशास्त्र' या विषयासंबंधी बरीच माहिती उपलब्ध आहे. राज्यशास्त्र विषयाच्या अंतर्गत जे घटक अभ्यासले जातात. त्यांतील अनेक घटकांसंबंधीची माहिती व ज्ञान प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या चाणक्यनीतिमध्ये आढळते. याचा उपयोग राजकीय दृष्टीने, प्रशासकीय दृष्टीने नक्कीच होवू शकतो. चाणक्यनीतिमध्ये राज्यशास्त्र विषयांतील अनेक महत्वाच्या संकल्पनांचा विचार असलेला पाहायला मिळतो. उदा, लोककल्याणकारी राज्याचा विचार, सुशासनाची संकल्पना, राजकीय मूल्ये, प्रशासकीय मूल्ये, शासनव्यवस्था, शासकातील गुण, कर्तव्ये इ. यावरून प्रचलित राज्यशास्त्र विषयांतील काही घटकांचे अध्ययन करण्यासाठी चाणक्यनीति नक्कीच मार्गदर्शक आहे असे म्हणता येवू शकते.

संदर्भसूची :

१) चाणक्यनीति, अध्याय १, श्लोक ५
२) चाणक्यनीति, अध्याय ५, श्लोक ३
३) चाणक्यनीति, अध्याय १३, श्लोक ६
४) चाणक्यनीति, अध्याय १, श्लोक ७
५) चाणक्यनीति, अध्याय १, श्लोक १२
६) चाणक्यनीति, अध्याय २, श्लोक ६
७) चाणक्यनीति, अध्याय २, श्लोक १४
८) चाणक्यनीति, अध्याय ३, श्लोक ११
९) चाणक्यनीति, अध्याय ८, श्लोक १७
१०) चाणक्यनीति, अध्याय १३, श्लोक ७

११) चाणक्यनीति, अध्याय ६, श्लोक १२
१२) चाणक्यनीति, अध्याय ७, श्लोक १३
१३) चाणक्यनीति, अध्याय ७, श्लोक २० व अध्याय १५, श्लोक ६
१४) चाणक्यनीति, अध्याय १२, श्लोक १४
१५) चाणक्यनीति, अध्याय ६, श्लोक १०
१६) चाणक्यनीति, अध्याय ७, श्लोक १०

संदर्भग्रंथसूची :

१) चाणक्यनीतिदर्पण: - डॉ. गुंजेश्वर चौधरी
२) चाणक्यनीति – डॉ. विजया देशपांडे
३) कौटिलीय अर्थशास्त्रम् – वाचस्पति गैरोला
४) नीतिवाक्यामृतम् – श्री सोमदेव सूरि
५) नीतिनिधि – मृदुला त्रिवेदी, टी. पी. त्रिवेदी
६) भारत की राजव्यवस्था – एम. लक्ष्मीकांत
७) भारतीय शासन आणि राजकारण – डॉ. सुधाकर जोशी
८) लोकप्रशासन – बी. बी. पाटील.
९) Political Science – Pravin Kumar Jha

****

'चक्रम्' या एकाङ्किकेच्या अनुषंगाने महाराणी द्रौपदीच्या मनोव्यथेचे विश्लेषण

सौ. मृदुला अतुल तापस
प्रो. कविता होले

प्रस्तावना-

रामायण आणि महाभारत या आर्ष महाकाव्यांनी भारतीय मनावर हजारो वर्षे अधिराज्य केले आहे आणि पुढेही करत राहतील. अनेक विद्वानांनी, कलाकारांनी या महाकाव्यातील प्रसंगांचा, व्यक्तिरेखांचा अन्वयार्थ आपापल्या विचारधारांनुसार लावला आहे. त्याचे चित्र, संगीत, नृत्य, नाट्य, कथा-कादंबऱ्या अशा विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून सादरीकरण केले गेले, तसेच पुढेही होत राहील. प्रस्तुत शोधनिबंधात 'चक्रम् ' या विद्याधर पुंडलिक यांनी लिहिलेल्या आणि डॉ. आशाताई गुर्जर यांनी अनुवादित केलेल्या एकांकिकेचा मानसशास्त्राच्या आधाराने अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महाभारताच्या युद्धामुळे झालेले दुष्परिणाम सर्वांना कळले आहेत. परंतु त्यापलीकडे जाऊन युद्धाचे माता आणि स्त्री म्हणून द्रौपदीच्या मनावर कशा प्रकारे परिणाम झाले असतील याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न प्रस्तुत एकांकिकेत केलेला आहे. त्या आधारे एक स्त्री आणि माता या भूमिकेतून वावरणाऱ्या द्रौपदीच्या मनोव्यथेचे विश्लेषण करणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे.

कळीचे मुद्दे (key words)-

महाभारतातील व्यक्तिरेखा, मानसशास्त्रीय अध्ययन,युद्धाचे दुष्परिणाम, द्रौपदीची मनोव्यथा.

संशोधन पद्धती- प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट -' चक्रम्' या एकांकिकेतील द्रौपदीच्या मनोव्यथेचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण करणे आणि वर्तमानकालीन परिस्थितीत समाजाला त्याचा कसा लाभ होईल याचा शोध घेणे हे प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

एकांकिकेचे कथानक-

महाभारताचे युद्ध घडून गेल्यावर काही वर्षे युधिष्ठिराने आपल्या बंधूंच्या साहाय्याने पृथ्वीवर राज्य केले. अभिमन्यूचा पुत्र परीक्षित राज्य करण्यास सक्षम झाल्यावर, त्याला राज्याभिषेक करून पांडवांनी द्रौपदीसह महाप्रस्थानास जाण्याचे ठरविले. महाप्रस्थानाला निघण्यापूर्वी द्रौपदी भीमाजवळ येथून जाण्यापुर्वी मला अश्वत्थाम्याची भेट घ्यायची आहे अशी इच्छा व्यक्त करते. भीम त्याला शोधण्याचा आटोकाट प्रयत्न करतो पण

तो भेटत नाही. नंतर स्वतः अश्वत्थामा द्रौपदीच्या भेटीला येतो. या दोघांच्या संवादातून काय घडले असेल ह्याची कल्पना करून, प्रस्तुत एकांकिकेचे कथानक रचले आहे. युद्धामुळे खरोखर काय साधले? कुणाला काय मिळाले? घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ त्या त्या व्यक्तींच्या संदर्भात काय लावायचा? असे अनेक प्रश्न द्रौपदीला पडले असणार अशी कल्पना करून लेखकाने एकांकिकेचे कथानक रचले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात द्रौपदीला स्त्री आणि माता या भूमिकेतून सहन करावी लागलेली मनोव्यथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मानसशास्त्रातील् एक सिद्धान्त आहे – `The ABCs of attitude.' which is originally developed by Albert Ellis. Here A represents an event or experience, B represents the beliefs about the A and C represents the emotions and behaviours that follow from those beliefs. Affects refers to feelings or emotions that are evoked by a particular person, item or event. A does'nt causes C. A triggers off B and B then causes C.[1]

Human beings come to feel and act as they do that is, that a combination of biological, psychological and social factors are involved.[2]

या सिद्धान्ताच्या आधारे आपण एकाच घटनेशी निगडीत असलेल्या भीम, द्रौपदी आणि अश्वत्थामा यांच्या भिन्न भिन्न प्रतिक्रियांचा विचार् करु शकतो.

महाभारतीय युद्धातील घटनांचे भीमाच्या मनावर झालेले परिणाम्-

महाप्रस्थानाला निघायचे ठरल्यानंतरही भीमाच्या मनात भीती किंवा पश्चाताप या दोन्ही गोष्टी नाहीत. वनवासाच्या काळातले द्रौपदीसह घालवलेले सुखद क्षण तो आठवतो आहे, त्याने सुखावतो आहे. द्रौपदी मात्र घडून गेलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा पुन्हापुन्हा प्रयत्न करते आहे. अर्जुनाला कर्णाच्या प्रतिशोधापासून वाचवण्यासाठी आपण घटोत्कचाचा बळी दिला, ही भावना तिला पंधरा वर्षानंतर सुद्धा छळतेच आहे.- **'अर्थशून्या एषा हत्या इति अंतर्मनसि कुत्रापि न त्वया अनुभूतम्|**[3] असा प्रश्न ती कळवळून भीमाला विचारते. महाभारताच्या मूळ कथेत मात्र श्रीकृष्णाने घटोत्कचाचा वध जाणून-बुजून घडवून आणला असे त्याच्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट होते. **'जर महायुद्धात कर्णाने त्याचा वध शक्तीने केला नसता तर त्या भीमसेन पुत्र घटोत्कचाचा वध मलाच करावा लागला असता. केवळ तुमचे प्रिय करण्याच्या इच्छेमुळे मी याआधीच त्याचा वध केला नाही. हा राक्षस ब्राह्मणांचा द्वेष करणारा तसेच यज्ञांचा द्वेष्टा असून धर्माचा लोक घडवणारा आणि पापी वृत्तीचा होता म्हणून मी त्याचा वध घडवून आणला असेच श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतो.'**[4] प्रत्यक्ष महाभारतात त्याच्या मृत्यूनंतर सगळे पांडव दुःखी झाले तरी विशेष शोक अगदी

---

[1] Mapc block no 2 unit 2 pg no 33

[2] Mapc block no 2 unit 2 pg no 33

[3] चक्रम् पृ. १५

[4] महा द्रोणपर्व पृ ५६२

भीमाने सुद्धा केल्याचा उल्लेख नाही पण येथे लेखक श्री विद्याधर पुंडलिक यांनी मात्र या घटनेचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करून त्याचा परिणाम काय झाला असेल याची कल्पना केलेली आहे.

भीम द्रौपदीची समजूत काढताना म्हणतो की, त्या क्षुद्र अश्वत्थाम्याचा व्रण सत्य आहे तसाच आपला उद्याचा महाप्रस्थानाचा मार्गही सत्य आहे.त्यावेळी द्रौपदी भीमाला विचारते **'अश्वत्थाम्नः व्रणः? अपि च ममाघातः? गतः प्रतिविन्ध्यः,श्रुतकर्माऽपि गतः, शतानिकः मृतः,श्रुतसेनः अपि मृतः| किमस्य एकैकस्य मरणं किमपि अर्थं न बिभर्ति?**[5] यावेळी भीम तिला सांगतो की युद्धाच्या यज्ञामध्ये अपरिहार्यपणे दिल्या गेलेल्या या आहुती आहेत. पुत्रांच्या अमानुषपणे केलेल्या हत्येनंतर युधिष्ठिराने द्रौपदीचे सांत्वन करताना म्हटले आहे-' **हे शुभे ! तू धर्म जाणारी आहेस तुझे पुत्र आणि बंधू यांना क्षत्रिय धर्माला साजेल असेच मरण प्राप्त झाले आहे म्हणून तू त्यांच्यासाठी शोक करू नकोस.**'[6]

द्रौपदीच्या मनोव्यथेचे विश्लेषण -

एकाङ्किकेच्या सुरुवातीला दोघेच एकत्र बसलेले असताना भीम द्रौपदीला म्हणतो, की सर्व प्रकारच्या संकटकालीन परिस्थितीला सामोरे गेल्यानंतर, अनेक प्रकारची असामान्य दुःखे सहन केल्यानंतर सुद्धा, तुझा कुरळा, शामल, घनविपुल केशसंभार आजही तसाच आहे आणि मला तो तितकाच प्रिय आहे. द्रौपदी त्याला उद्वेगाने विचारते- **'अद्यापि तदेव प्रियमस्ति ननु येषां हताशानां केशानां कृते तद् महाभारतं अभूत्|'**[7]

संपूर्ण महाभारतात आपल्या हक्कासाठी लढणारी तेजस्वी शलाकाच जणू अशी द्रौपदीच सर्वांना दिसते. एका सामान्य स्त्रीला जशी आपल्या गुणांसह आपले अस्तित्व अपत्यांच्या रूपात आपल्या नंतरही पृथ्वीवर टिकून राहावे अशी आस असते तीच आस - **'मम पतीनां पश्चात अस्मद्रूपाकाराः मम पुत्राः पृथिवीतले तिष्ठेयुः|मत्सौंदर्यस्य मद्रुधिरस्य च मातृकं रिक्थं स्वीकृत्य आगताः मे पुत्राः इमं लोकं पश्येयुः।'**[8] या द्रौपदी च्या उद्गारातून दिसून येते.

अश्वत्थामा जेव्हा तिला म्हणतो की तुझ्या पुत्रांना मारून तुझे ते वरदान पण मी नष्ट केले, तेव्हा द्रौपदी म्हणते या युद्धात पांडव जिंकले पण त्यातून खरेच मला काय मिळाले याचा विचार करता मला कळलेले सत्य आहे- '**अन्ततोगत्वा धर्माधर्माभ्यां दुःखं सत्यतरम्| कर्माकर्माभ्यां दुःखं सत्यतरम्। सत्पक्षप्रतिशोधाभ्यां दुःखं सत्यतरम्।'**[9]

अश्वत्थामा आणि द्रौपदीच्या संवादातून हळूहळू उलगडत जातात युद्धाचे दुष्परिणाम. प्रतिशोध घेण्याचे चक्र जे द्रुपद- द्रोणांच्या वैरापासून सुरू होते, ते परीक्षितावर गर्भावस्थेत अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्र सोडण्याने थांबले असे वाटते. पण द्रौपदी म्हणते मी त्या प्रतिशोधाला थांबवायचे सोडून याची चरम सीमा गाठली. अश्वत्थाम्याच्या

---

[5] चक्रम् पृ.१६

[6] महा सौप्तिकपर्व पृ.६७६

[7] चक्रम् पृ १०

[8] तत्रैव पृ १६

[9] तत्रैव

मस्तकावर जन्मापासून असलेल्या दिव्यमण्यामुळे त्याला अनेक गोष्टींवर ताबा मिळवणे शक्य होते.' **दिव्यमणेः तृषाक्षुद्भयवेदनानाशन सामर्थ्यं मया ज्ञातमासीत्। तत् सामर्थ्यमेव अपहृतम्।'**[10]

महाप्रस्थानापूर्वी अश्वत्थाम्याला भेटायची तिची तीव्र इच्छा असते. नेहमीप्रमाणेच भीम तिच्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो, पण तो सापडत नाही. द्रौपदीला समजावण्यासाठी भीम म्हणतो- **'न स दुरात्मा प्राप्तः।अन्ततोगत्वा अश्वत्थामा नाम शून्याटवीषु बभ्रम्यमाणः कश्चित् क्षुद्र-चिरंजीवः।'**[11]

शेवटी ती भीमाला विचारते की जे घडले ते असत्य नसले तरी ते संपायला हवे असे नाही का वाटत तुला? **'असत्यम्? असत्यं न स्यादपि। अयं संहारः समाप्यताम्, अयं समाप्तिं नेयः इति त्वया कदापि क्षणमपि न चिन्तितम्?'**[12]

सर्वांचे प्रेमाने करणारी, अभिमन्युवर सुभद्रेपेक्षा अधिक प्रेम करणारी द्रौपदी जेव्हा म्हणते -**'ततोऽपि परीक्षितः न मामकीनः। न कोऽपि मम रुधिरोत्पन्नः मम श्यामलां तनुं वा, मम भ्रुकुटीं वा, मम रक्तनखान् वा, मम कुरलान् अलकान् वा गृहीत्वा आत्मनः द्रौपदेयत्वं ख्यापयन् मत्पश्चात् अत्र भविष्यति।'**[13] तेव्हा तिची नेमकी मनोव्यथा सहृदयानां नेमकी लक्षात येते. पण अंतर्बाह्य क्षत्रिय योद्धा असणाऱ्या आणि द्रौपदी वर अत्यंत प्रेम करणाऱ्या भीमाला तिच्या मातृहृदयाची वेदना समजू शकत नाही.

अश्वत्थाम्याची वेदना आणि परिणाम-

अश्वत्थामा कदाचित आपली व्यथा समजू शकेल अशी आशा तिला वाटत असते म्हणून ती त्याला विचारते- **'मम पञ्चपुत्राः त्वया हताः। पौत्रा अपि। सर्वे पाञ्चालाः त्वया कर्तिताः। एतत् सर्वमपि न त्वं सन्तोषाय अभूत्। यदि तावता एव समाधानम् अभविष्यत् किं प्रतिशोधस्य चक्रं तत्रैव विरामं ना लप्स्यत?'**[14]

अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्राचा प्रयोग उत्तरेच्या गर्भावर केल्यानंतर श्रीकृष्णांनी .- **'तुला सर्व विद्वान पवित्र पापी पुन्हापुन्हा पाप कर्म करणारा आणि बालघातकी समजत आहेत. यासाठी तू या पापकर्मांचे फळ स्वीकार. आजपासून तीन हजार वर्षे पर्यंत तू या पृथ्वीवर भटकत राहशील तू कधीही कोठेही कोणाही बरोबर बोलण्याचे सुख मिळवू शकणार नाहीस तू एकटाच निर्जन जागी भटकत राहशील.'** [15]असा शाप अश्वत्थाम्याला दिलेला आहे. माझ्या पुत्रांच्या मृत्यूनंतर तरी तू का थांबला नाहीस? जन्माला सुद्धा न आलेल्या गर्भस्थ शिशूवर ब्रह्मास्त्र का सोडले? असे ती जेव्हा कळवळून अश्वत्थाम्याला विचारते, तेव्हा अश्वत्थामा जे उत्तर देतो ते सगळ्या गोष्टींचे अर्थच बदलून टाकणारे असते. तो म्हणतो- **'केवलं कुतुहलम् | शुद्धं कुतूहलम् |**

---

[10] तत्रैव पृ ४१

[11] तत्रैव पृ ९

[12] तत्रैव पृ १४

[13] तत्रैव पृ १९

[14] तत्रैव पृ ३५

[15] महा सौप्तिकपर्व पृ.६८६

प्रलयंकरमोहस्य कुतूहलम्।'[16] हे असे कुतूहल कशासाठी? असा प्रश्न द्रौपदी विचारते तेव्हा अश्वत्थामा म्हणतो हे कसे घडले याला माझ्याजवळ खरेच उत्तर नाही. जे घडले त्यावर माझा ताबा नव्हता. कुठलीतरी अज्ञात शक्ती जणू माझ्याकडून ते घडवीत होती. अश्वत्थाम्याचे संपूर्ण स्पष्टीकरण ऐकल्यावर द्रौपदीच्या हृदयातील मातृत्व भाव जागा होतो. शिवाय तिच्या हेसुद्धा लक्षात येते की- ' **भिन्नैः मार्गैः अस्माभिः प्रतिशोधस्य द्वे चरमकाष्ठे आसादिते। परं न ज्ञायते प्रतिशोधार्थः। यदि किञ्चित् सत्यमासीत् तर्हि तत् दुःखमेव। यदि किञ्चिदर्थवत् आसीत् तर्हि तत् केवलं प्रतिशोधचक्ररोधनमेव।'**[17]

महाभारताच्या युद्धात पांडव विजयी झाले. द्रौपदी महाराणी झाली पण. महाप्रस्थानाला निघण्याच्या आदल्या दिवशी ती भीमाला सांगते, गेली पंधरा वर्षे मी एकटी पुन्हा एकदा वनवास सहन करते आहे - **'युद्धोत्तरं सम्राज्ञीपदप्राप्तेः पश्चात् अहम् अपरं वनवासमिव वसामि| तस्मिन् वनवासे मत्सार्धं त्वं आसीः अर्जुनः आसीत्| परं सम्राट्पाण्डवानां राजकुलगते वनवासे यूयमपि न स्थ|'**[18] एक प्रश्नपिशाच्च तिला सतत छळते आहे असे ती भीमाला सांगते- **'त्वया सततं प्रतिशोध एव प्रार्थितः किन्तु त्वया अन्ततोगत्वा किं प्राप्तम्?'**[19] तिच्या मनाला त्रस्त करणाऱ्या प्रश्नपिशाचाची परिणती शेवटी अश्वत्थाम्याच्या रूपात होते. कारण द्रौपदीच्या आज्ञेने अश्वत्थाम्याच्या मस्तकावरचा मणी ओढून काढल्यावर, अश्वत्थामा भळभळती जखम आणि अमरत्वाचे आता शापस्वरूप ठरलेले वरदान यासह निघून जातो. तेव्हा त्याचे ओठ काहीतरी सांगू बघत होते हे तिच्या लक्षात येते.. अश्वत्थामा आपण होऊन तिच्या भेटीला येतो, कारण त्यालाही काही सांगायचे असतेच.

द्रौपदी आणि अश्वत्थामा या दोघांच्याही मनातील किल्मिष संवादाने नष्ट होते. प्रतिशोधाचे हे चक्र थांबायला हवे याबद्दल द्रौपदीच्या मनाचा दृढनिर्धार होतो. ती म्हणते वेदनाच असेल, दुःखच सत्य असेल तर मग आपल्या ताब्यात काय आहे? यावर हताशपणे अश्वत्थामा जेव्हा म्हणतो की ती वेदना सहन करणे आणि दुःख वाहणे इतकेच आपल्या हातात आहे तेव्हा मात्र द्रौपदीच्या ठिकाणी असलेली एक कणखर पण प्रेमळ माता प्रकट होते. ती अश्वत्थाम्याला म्हणते- **'तव व्रणे स्नेहसेचनं करोमि। स्नेहेन लप्स्यते प्रकामम् आरामम्। शनैः शनैः त्वं व्रणः क्रमशः विरोपितः भविष्यति।'**[20]

मूळ महाभारतात मात्र द्रौपदीने म्हटले आहे - 'हे पांडव हो! तुम्ही सर्व लोक ही गोष्ट नीट ऐका की जर अश्वत्थाम्याला स्वतःच्या पापकर्माचे फळ मिळाले नाही तर मी निश्चित प्राणत्याग करीन !'[21]

---

16 चक्रम् पृ १७

17 तत्रैव पृ ४२

18 तत्रैव पृ २०

19 तत्रैव पृ २१

20 तत्रैव पृ ४४

21 महा सौप्तिकपर्व पृ.६७६

उपसंहार-

अशा प्रकारे संपूर्ण एकांकिकेचे अध्ययन केल्यावर पुढील निष्कर्ष काढता येतात-

- महाभारताच्या युद्धातील विजय हा पांडवांसाठी अत्यंत महत्त्वाचा होता. त्यासाठी पुत्रांचे बळी जाणे ही घटना दुःखद असली तरी पाण्डवांच्या मते ती महायज्ञातील आहुती होती.
- रुपगर्विता द्रौपदीच्या अपमानाचा सूड घेणे हा या युद्धाचा एक महत्त्वाचा उद्देश होता परंतु विजयानंतर द्रौपदीच्या हातात काहीच उरले नाही.
- माता म्हणून द्रौपदीच्या वाट्याला आलेले दुःख पांडवांपैकी कोणालाच जाणवत नव्हते, इतकेच काय ते कृष्णालाही कळले नाही ही द्रौपदीची व्यथा होती.
- प्रतिशोधाच्या अग्निमध्ये धुमसत राहिल्याने जो प्रचंड संहार घडून आला त्यातून कोणालाच काहीही प्राप्त झाले नाही हे द्रौपदीच्या लक्षात आले. मात्र भीम आणि इतर पाण्ड्वांची प्रतिक्रिया अगदी वेगळी होती
- युद्धानंतर विजयी वीरांची पत्नी आणि सम्राज्ञी ठरलेल्या द्रौपदीला आई म्हणून आपण पराभूत झालो हे शल्य त्रास देत राहिले.
- युद्धातील विजयामुळे मिळालेले साम्राज्ञीपद द्रौपदीसाठी वनवासापेक्षाही वेदनादायी ठरले. यातुन भौतिक समृद्धीतून सुख प्राप्ती शक्य नाही हे सत्य अधोरेखित झालेले दिसुन् येते.
- द्रुपद राजापासून सुरू झालेले प्रतिशोधाचे चक्र आपल्या मृत्यूपूर्वी थांबवले पाहिजे, ही जाणीव द्रौपदीला तीव्रतेने झाली होती. भीमाला मात्र युद्धातील आप्तांचे मृत्यु आहुतिप्रमाणे वाटले. अगदी त्याच्या मुलांच्या मृत्युने सुद्धा तो दुःखी झाला नाही.
- अत्यंत महत्त्वाचे म्हणजे युद्ध आणि प्रतिशोधाची भावना यामुळे जे परिणाम होतात त्यात धर्म आणि अधर्म दोन्ही बाजूंच्या हाती काहीच उरत नाही हे येथे द्रौपदीच्या माध्यमातून अधोरेखित झाले आहे.
- दुःख मुक्ती स्नेहभावाने होऊ शकते वैरभावाने नव्हे हे अंतिमतः द्रौपदी आणि अश्वत्थामा दोघांनाही लक्षात आले.पण द्रौपदीवर मनापासुन प्रेम करणार्या भीमाला तिची वेदना समजू शकली नाही.

अशाप्रकारे चक्रम या एकाङ्किकेत सम्राज्ञी द्रौपदीचे एक वेगळे पण सत्याच्या जवळ जाणारे असे रूप दाखवण्याचा प्रयत्न लेखक विद्याधर पुण्डलिक यांनी केला आहे. द्रौपदी, अश्वत्थामा आणि भीम ही तीन प्रमुख पात्रे आणि दोन गौण पात्रे यांच्या सहाय्याने त्यांनी युद्धाच्या दुष्परिणामांचा अत्यंत महत्त्वाचा, पण क्षत्रियांद्वारे दुर्लक्षिला जाणारा पैलू 'चक्रम्' या ऐतिहासिक एकांकिकेत मांडला आहे. डॉ. आशा गुर्जर यांनी त्याचे संस्कृतमध्ये उत्तम प्रकारे रूपांतर करून, संस्कृत प्रेमी आणि अभ्यासकांसाठी एक उत्तम कलाकृती सादर केली आहे.

महत्त्वाचे म्हणजे आजही परिस्थिती बदललेली नाही. आजच्या काळातही या सर्व गोष्टी लागू होतात. नवनवीन शस्त्रास्त्रांच्या माध्यमातून जगात कुठे ना कुठे युद्ध सुरूच आहे. त्यात मुख्यतः मातृहृदये होरपळली

जातात हे अजूनही वीर, राजकारणी यांच्या दृष्टीने महत्त्वाचे नसते हाच या शोधनिबन्धातून प्राप्त झालेला निष्कर्ष आहे.

प्रस्तुत एकांकिकेच्या माध्यमातून एका महत्वाच्या सामाजिक प्रश्नाला वाचा फोडण्यात आली आहे. समाजप्रबोधनासाठी याचे प्रस्तुतीकरण होणे ही काळाची गरज आहे.

संक्षेप सूची -

चक्रम् एकाङ्किका हस्तलिखित - चक्रम्

महाभारत - महा.

संदर्भसूची -

संदर्भ ग्रंथसूची -

१. चक्रम् एकाङ्किका हस्तलिखित
मराठी लेखक -श्री. विद्याधर पुण्डलिक.
अनु. डॉ. आशा गुर्जर

२. महाभारत (मराठी)
संच- खण्ड १-११
प्रकाशक- विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे

३. महाभारताचे वरदान
लेखक- श्री. र. भिडे
प्रकाशक- राजहंस प्रकाशन,पुणे

४. BPS-006
Social Psychology
Editor- prof. Manas Mandal
Prof. Amulya Khurana

५. Group A
MPCE-013
Psychotherapeutic Methods
Editor- rof Vimala Veerraghawan

****

गुलाबगीतेतील योगदर्शनाचे विश्लेषणात्मक अध्ययन

श्री.राजेन्द्र मेश्राम ,
प्रो.कविता होले

सारांश

प्रोया महाकाव्याचे दोन भाग .या महाकाव्याची रचना केली आहे 'प्रज्ञाचाक्षुषम्' मधुसूदन पेन्ना यांनी . -पहिल्या भागाला श्रीगुलाबरावमहाराजचरितम् असे म्हटले आहे तर दुस .केलेले आहेतया भागाला गुलाबगीता म्हटले आहे. गुलाबगीतेत वैदभीय संत प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराज यांचे तत्त्वज्ञान विशद केलेले आहे. या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून मानवासाठी कल्याणकारी असा उपदेश दिलेला आहे. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने सहा आस्तिक दर्शने आहेत. ती म्हणजे सांख्य, योग, वैशेषिक, न्याय, पूर्वमीमांसा आणि वेदान्त. ही सहाही दर्शने वेदांचे प्रामाण्य मानतात. याशिवाय तीन नास्तिक दर्शने आहेत. ती म्हणजे चार्वाक, जैन व बौद्ध. ही दर्शने वेदांचे प्रामाण्य नाकारतात.

या भारतीय दर्शनांपैकी योग दर्शन एक महत्त्वाचे दर्शन आहे. पारंपारिक योग दर्शनाच्या पार्श्वभूमीवर श्रीगुलाबराव महाराजांना अपेक्षित असलेल्या योग दर्शनाचे वर्णन काव्याच्या माध्यमातून गुलाबगीतेत करण्यात आले आहे. प्राचीन शास्त्रांबद्दल महाराजांच्या मनात अतिशय आदरभाव होता. महाराज शास्त्रांकडे समन्वय दृष्टीने बघत होते. गुलाबगीतेतील योग विचार हे पारंपारिक योग सिद्धांतांवर आधारित असले तरी ते योग, वेदांत आणि भक्ती यांचा योग्य समन्वय साधणारे आहेत.

उद्देश -

गुलाबगीता ही विद्वान संत श्री गुलाबराव महाराज यांच्या तत्त्वज्ञानाने ओतप्रोत भरलेली आहे. या गुलाबगीतेत काव्याच्या माध्यमातून रेखाटण्यात आलेल्या योगदर्शनाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

संशोधन पद्धती -

या शोधपत्रासाठी विश्लेषणात्मक अध्ययन पद्धती उपयोगात आली आहे.

परिचय -

'प्रज्ञाचाक्षुषम्' या महाकाव्याचे नायक श्रीगुलाबराव महाराज हे आहेत. दि. ६ जुलै १८८१ साली अमरावती जिल्ह्यातील लोणीटाकळी या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडीलाचे नाव श्री. गोंदुजी मोहोड व आईचे नाव सौ. अलोकाबाई मोहोड होते. वयाच्या नवव्या महिन्यात डोळे आल्याचे निमित्त झाले व त्यांना

कयमचे अंधत्व आले. अंधत्वामुळे शाळेत जावून त्यांना शिक्षण घेता आले नाही. महाराजांचे वय १२ वर्षांचे असतांना त्यांचा विवाह झाला. त्यांना केवळ ३४ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांची बुद्धी तल्लख होती. एकदा ऐकलेले ते कधी विसरत नसत. अशा विपरित परिस्थितीत व अल्प कालावधीत अतिशय उल्लेखनीय असे कार्य त्यांनी केले. श्रीगुलाबराव महाराजांनी मांडलेल्या समन्वय विचारामुळे त्यांना ‘समन्वयमहर्षी’ म्हणून संबोधले जाते. त्यांनी विपुल व अमुल्य अशी ग्रंथरचना केली आहे.

श्रीगुलाबरावमहाराजांच्या जीवनावर आधारित ‘प्रज्ञाचाक्षुषम्’ या महाकाव्याची रचना प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी केली आहे. या महाकाव्यात एकूण ११ सर्ग आहेत. महाकवींनी सर्गांना ‘ईक्षण’ असे म्हटले आहे. पहिल्या १० ईक्षणात विद्वान संत श्री गुलाबराव महाराज यांचे चरित्र काव्यबद्ध रीतीने रेखाटण्यात आले आहे. या भागाला ‘श्रीगुलाबरावमहाराजचरितम्’ असे म्हटले आहे. अकराव्या ईक्षणात एकूण सात अध्याय आहे. या भागाला 'गुलाबगीता' असे म्हटले आहे. या सातही अध्यायांत श्रीगुलाबराव महाराजांचे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. गुलाबगीतेच्या पाचव्या अध्यायात गुलाबराव महाराजांच्या योगसिद्धान्तांचे विश्लेषण काव्यस्वरुपात करण्यात आले आहे. यात योगस्वरूप, योगप्रकार, योगाविघ्ने, योगरहास्य, चित्त, योगसाधन, हठयोग, राजयोग, ईश्वर, कैवल्य इत्यादींचे विश्लेषण करण्यात आले आहे.

ध्यानेन ब्रह्मसारूप्यं चित्तस्य योग उच्यते।
ज्ञानेन ब्रह्मतादात्म्यं तस्य वेदान्त उच्यते।।
अहं ममेति तत्त्वतस्त्यक्त्वैकाग्रमानस।:
ध्यायीत देवदेवं तद् योगरहस्यमुच्यते।।
मोक्षार्थं चित्तवृत्तीनां निरोधो योगसंज्ञक।:
कर्तृसम्पाद्यरूपश्च वस्तुसम्पाद्यरूपक।।:
भावनाविशदस्त्वाद्यो भावनाजन्मवान् पर।:
एवं द्वैविध्यमापन्नो योगश्चित्तमलापहा।।
सांख्येन त्वंपदार्थस्य तत्पदार्थस्य च योगत।:
वेदान्तेन तयोपूर्णमैक्यस्य शोधनं भवेत्।। :[१]

ध्यानसाधनेद्वारे मनाचे ब्रह्मासोबत साम्य किंवा सादृस्यता साधने म्हणजेच योग होय त्याचप्रमाणे ज्ञानसाधनेद्वारे ब्रह्मासोबत मनाची एकरूपता साधने म्हणजे वेदांत होय. योग रहस्य म्हणजे मी, माझे या प्रकारचे विचार नाहीसे करून एकाग्र मनाने देवदेव असे ध्यान केले तर ते योग रहस्य होय. मोक्षप्राप्तीसाठी चित्तवृत्ती म्हणजेच योग होय. तो वास्तविक-ज्ञानप्रप्तीरूप किवा परमात्माप्राप्तीरूप असतो. वास्तविक-ज्ञानप्राप्तीरूप योग हा भावनांना शुद्ध करतो तर परमात्माप्राप्तीरूप योग हा शुद्ध भावना निर्माण करणारा असतो. अश्या प्रकारे चित्ताचा मळ घालविता येतो. 'त्वम्' पदार्थाचे सांख्याद्वारे, 'तत्' पदार्थाचे योगाद्वारे आणि 'त्वम्' व 'तत्' या दोहोंचेही पुर्नतादात्म्याने निर्धारण होईल.

हठो ध्यानं तथा मन्त्रो लयो नादश्च पञ्चमा।:
योगस्यैते प्रकारास्तु राजयोगस्य सिद्धये।।
पातञ्जलो राजयोगो निदिध्यासननामक।:

योगिनश्चितिरूपेण केवला सा ह्यवस्थिति।।:
चित्तवृत्तिनिरोधेन चैतन्यमवशिष्यते।
तस्या।।:स्थितेरुपायास्तु योगशब्देन कीर्तिता :
श्रद्धामूलो हि योगस्यात् श्रद्धेयं जननी स्मृता। :
योगाभ्यासप्रवृत्तं या कल्याणी पाति सर्वदा।।
श्रद्धातो वर्धते शक्तिस्तस्याश्च वर्धते स्मृति।:
स्मृतेर्दाढ्येन सम्पन्नो योगी समाधिमाप्नुते।।[२]

योगाचे पाच प्रकार आहेत. हठयोग, ध्यानयोग, मंत्रयोग, लययोग तसेच नादयोग या पाच योगप्रकारांमुळे राजयोगाची सिद्धी होते. निदिध्यासन नावाचा पातंजल राजयोग आहे. योगासाधकाच्या चैतन्य स्वरुपामुळेच कैवल्याची स्थिती प्राप्त होते. चित्तवृत्तीचा नाश झाल्यावर फक्त चैतन्य शिल्लक राहते. चैतन्य शिल्लक राहणे म्हणजेच योग होय. योग साधनेसाठी श्रद्धा अतिशय महत्त्वाची आहे. श्रद्धा म्हणजेच योगाची माता. ती कल्याण करणारी आहे त्याचप्रमाणे योगाभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्यांचे सतत रक्षण करते. योगासाधकाला समाधी अवस्थेला पोहोचण्यासाठी श्रद्धा अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे शक्ती वाढते, शक्ती वाढल्यामुळे स्मृतीचा विकास होतो व विकसित झालेल्या स्मृतीमुळे समाधी अवस्थेला सहज पोहोचता येते.

समाधौ परिपक्वे हि प्रज्ञा सञ्जायते परा।
ऋतम्भरेति शास्त्रेऽस्मिन् गीयते सा सदोदिता।।
श्रद्धा रुद्राक्षमालेव स्वेच्छात।:स्वीकृता पुन :
गले स्थापयितुं शक्या नैवेति ज्ञायतां परम्।।
श्रद्धामयो भवेज्जीवस्तस्माच्छ्रद्धा भवेत् स्वयम्।
सा सात्त्विकी योगमार्गेऽस्मिन् योगिनं पाति सर्वदा।।
श्रद्धासत्त्वेऽपि यो योगे शङ्कावान् वर्तते सदा।
शङ्का श्रद्धां विनिघ्नन्ती प्रज्ञाञ्च तानयेत् सताम्।।
सशङ्कपण्डितान्नूनं निष्ठावान् पामरो वर।:
यतो निष्ठा फलं सूते शङ्का नाशयते नरम्।।[३]

योगसाधक जेव्हा समाधीमध्ये परिपक्व अवस्थेला पोहोचतो ती श्रेष्ठप्रज्ञा म्हणजेच निर्मळ बुद्धी होय. यालाच योगशास्त्रात ऋतंभरा असे म्हणतात. जीव हा श्रद्धामय असतो त्यामुळे श्रद्धा ही स्वयंभू असते व कुणालाच त्यासाठी प्रवृत्त करता येत नाही. सात्त्विक श्रद्धा नेहमी योगासाधाकाचे रक्षण करते. जो योगसाधक श्रद्धाशील असूनही योगाविषयी शंकाग्रस्त असतो, ती शंका श्रद्धेच्या नाशाला कारणीभूत ठरतो व त्याची प्रज्ञा कमी होते. याचे कारण असे की, श्रद्धा ही फलदायी असते तर शंका ही विनाशक असते.

योगाभ्यासे विरक्तेस्तु महत्त्वं शास्त्रसम्मतम्।
अविरक्तसदा योगं कुर्वाणोऽपि न सिद्धिभाक्।। :

अविरक्तपुनर्योगे प्रवृत्तोऽपि क्षणे क्षणे। :
विषयासक्तित।।:श्रान्तो योगमेव त्यजेत् खल :
विषयेषु मानसं यस्य न सक्तं निर्मलं पुन।:
अधिकारी स एवात्र शमादिषट्कसंयुत।।:
अष्टाङ्गयोगनिष्ठस्य क्रमशास्त्रेषु कथ्यते। :
तत्क्रमानुगते तस्मिन् तत्फलं हस्तगं भवेत्।।
नियमेषु प्रधानं स्याच्छ्रवणं गुरुवक्त्रत।:
तेनैव तामसी शक्तिर्निरुद्धा योगिनश्चिरात्।।[४]

योगाभ्यासात विरक्तीला शास्त्रसंमत महत्त्व आहे. विरक्ती प्राप्त झालेल्यालाच योगाभ्यासामुळे फलप्राप्ती होते. जो माणूस अविरक्त आहे तो वारंवार योगदिशेकडे प्रवृत्त होऊनही विषयासक्तीमुळे योगाचे फळ प्राप्त करू शकत नाही व अंतिमतः योगसाधना सोडून देतो. ज्याचे मन शम, दम, तितिक्षा, उपरति, समाधान आणि श्रद्धा यांनी परिपूर्ण आहे तोच योगाचे फळ प्राप्त करू शकतो. अष्टांगयोगाचे आचरण करण्यासाठी शास्त्रात क्रम सांगितला आहे. त्या क्रमाचे आचरण केले तर त्याला निश्चित फलप्राप्ती होते. योगाभ्यासाच्या नियमांपैकी गुरुमुखातून श्रवण हा नियम योगासाधकाने पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे सत्त्व, रज्, तमोगुणापैकी तमोगुणामुळे उत्पन्न झालेल्या तामसी वृत्तीचे शमन होते.

यमाभ्यासेन निष्ठात इन्द्रियाणां क्रमेण हि।
निरोधो जायते तस्मादात्मशक्तिर्विवर्धते।।
आसनानां जये देहे स्थैर्यमुत्पद्यते परम्।
ततो द्वन्द्वप्रहारात् स योगी दु खं न:विन्दति।।
प्राणायामेन चित्तस्य चाञ्चल्यं नाशितं भवेत्।
तस्मादेकाग्रता नूनं जायते मनसोऽचिरात्।।
एतैर्नियतमभ्यस्तैर्मूढावस्था नाश्यते ननु।
क्षिप्तावस्था तथा नष्टा प्रत्याहारेण मानसी।।
धारणाध्यानसामर्थ्यादन्या विक्षिप्तनामिका।
नाशं याति सदा चित्ते योगाभ्यासविरोधिनी।।[५]

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या यमांचे निष्ठेने व क्रमाने पालन केले तर चित्तवृत्तीनिरोध होऊन आत्मशक्तीचा विकास होतो. आसनांवर विजय मिळविल्याने शरीरात स्थिरता निर्माण होते त्यामुळे शीत-उष्ण, भूक-तहान अश्या पिडा उत्पन्न झाल्या तरी तो योगसाधक दु:खी होत नाही. प्राणायामामुळे मनाची चंचलता नष्ट होऊन एकाग्रता निर्माण होते. प्राणायामांचा सराव केल्याने चित्ताची विवेकशून्य नाश पावते. प्रत्याहारामुळे विषयासक्त होणारी चित्ताची चंचलता दूर होते. धारणा आणि ध्यान यांच्या सामर्थ्यामुळे सत्त्वगुणाच्या आधिक्याने समाधी अवस्था प्राप्त झाल्यावर चित्ताची विषयांकडे आकर्षित होणारी योगाभ्यासाची विरोधी, विक्षिप्तवृत्ती नाश पावते.

सम्प्रज्ञातसमाधेस्तु चित्तैकाग्र्यं भवेन्नृणाम्।
निर्विकल्पसमाधेश्च निरोधो मनसो भवेत्।।
प्राणायामेन चित्तस्य चाञ्चल्यं नाश्यते ध्रुवम्।
तथापि विषयासक्तिर्मनसो नैव नश्यति।।
परात्परतरे दृष्टे चित्तस्य विषयस्पृहा।
नष्टा भूत्वाऽथ कैवल्यं योगिनो भवति ध्रुवम्।।
तदर्थं प्राणरोधेन सहान्यद्दोषदर्शनम्।
नियतं क्रियते चेत् तत् मनसो हन्ति कल्मषम्।।
चित्तस्य मृदुसंवेगो वासना परिकीर्तिता।
स्वप्नश्च मध्यसंवेगस्तीव्रसंवेगकारणम्।।[६]

सात्विकि, रजसि आणि तमसि हे वृत्तीचे तीन प्रकार आहेत. सात्विक वृत्तीमुळे ध्येयविषयाचा पूर्ण साक्षात्कार होतो त्यालाच संप्रज्ञात समाधी असे म्हणतात. संप्रज्ञात समाधीमुळे मानवाचे चित्त एकाग्र होते. सर्व चित्तवृत्तीचा निरोध झाल्यावर केवळ संस्कारच शिल्लक राहतो त्या अवस्थेला निर्विकल्प समाधी असे म्हणतात. प्राणायामाच्या अभ्यासाने मनाची चंचलता निश्चितपणे निघून जाते परंतु मनातील विषयाबद्दलची आसक्ती तशीच राहते. परवैराग्यामुळे परब्रह्माचे दर्शन होताच चित्ताची विषयास्पृहा नष्ट होऊन योगी निश्चितपणे कैवल्यस्थितीला पोहोचतो. प्राणायामाने इतर दोषांचे दर्शन सतत केले तर मनातील सर्व दुष्टविचारांचा नाश होतो. चित्ताच्या वैराग्याचे तीन प्रकार असतात. मृदुसंवेग (मृदूवैराग्य), मध्यसंवेग (मध्यवैराग्य) व तीव्रसंवेग (तीव्रवैराग्य). मृदुसंवेग म्हणजे वासना, मध्यसंवेग म्हणजे स्वप्न तर तीव्रसंवेग म्हणजे वैराग्याचे कारण होय.

मनसस्तीव्रसंवेगाज्जगत् सत्यमिव स्फुरेत्।
ईश्वरे तीव्रसंयोगात् समाधिसिद्धिरीश्वरात्।।
ईश्वरप्रणिधानेन साधकश्च समाधिभाक्।
व्युत्थानेऽपि जगद् ब्रह्म द्रष्टुं शक्नोति केवलम्।।
वैराग्यादपराख्याच्चेदिन्द्रियाणां विनिग्रहः
अभ्यासाच्च समाधिसदा नृणाम्।। :स्यात् सम्प्रज्ञात :
परवैराग्यदाढर्येनासम्प्रज्ञातो भवेद् ध्रुवम्।
प्रारब्धनाशको यश्च त्रिविधकथ्यतेऽधुना।। :
अक्षीणवासनं चित्तं दृश्यते पुनरुत्थितम्।
असंप्रज्ञातभेदोऽयं स्वयंव्युत्थान।।:नामक-
विष्णुश्च शंखनादेन प्रह्लादं शान्तमानसम्।
अबोधयद् गाढसुप्तन्तु पुरा लोकशिवाय हि।।
एवं व्युत्थानमापन्नं बाह्यतो दृश्यते परम्।
असंप्रज्ञातप्रभेदोऽयमन्यव्युत्थाननामकः।।

पुरा शिखिध्वजस्यायमसंप्रज्ञातनामकः
समाधिर्नाप्नुवन् भङ्गं व्युत्थानेऽप्यञ्चितोऽभवन्।।
एवं व्युत्थानकालेऽपि समाधिस्थितिरञ्चिता।
असंप्रज्ञातभेदोऽयं व्युत्थानरहिताभिधः।।[७]

मनामध्ये तीव्रसंवेग उत्पन्न झाल्यामुळे हे जग सत्याप्रमाणे भासेल तर ईश्वरामध्ये तीव्रसंवेग झाल्यास ईश्वरापासून समाधिसिद्धीही होईल. योगसाधक ईश्वर भक्तीने समाधी प्राप्त करून घेण्यास पात्र ठरतो व समाधीतून बाहेर आल्यावरही तो जगाला ब्रह्मरूपातच पाहू शकतो. अपर वैराग्यामुळे योगासाधकाला जर इंद्रिय निग्रह साधता आला तर योगाभ्यासाने संप्रज्ञात समाधी मानवाला नेहमी साधता येईल. परवैराग्य दृढ झाल्यामुळे निश्चितच असंप्रज्ञातसमाधी प्राप्त होऊ शकते तसेच प्रारब्धाचा नाश करणारा हा योग तीन प्रकारचा असतो. योगासाधकाच्या वासनांचा नाश झाला नाही तर परत व्युत्थान पावलेल्या मनामध्ये नामरूपात्मक संस्कार मध्ये मध्ये पुन्हा जागृत होतात. हा असंप्रज्ञातयोगाचा 'स्वयं व्युत्थान' नावाचा एक प्रकार होय. पूर्वीच्याकाळी विष्णूने शंखानाद करून गाढ झोपेत असलेल्या शांत मनाच्या प्रह्लादाला जागे केले होते त्याच प्रमाणे दुसऱ्यांकडून अथवा बाह्यदृष्टीने जागृत केल्या गेलेला असंप्रज्ञातसमाधीचा हा 'अन्यव्युत्थान' नावाचा दुसरा प्रकार होय. पूर्वी ही असंप्रज्ञात समाधी शिखिध्वज नावाच्या राज्याला व्युत्थानामध्ये देखील विच्छेद न होता प्राप्त झाली होती. त्याचप्रमाणे व्युत्थानकाळातही समाधिस्थिती प्राप्त झाली तर तो 'व्युत्थानरहित' नावाचा असंप्रज्ञातसमाधीचा तिसरा प्रकार होय.

व्यतिरेकेन या निष्ठा त्वम्पदार्थगामिनी।
सा व्युत्थानं भजेन्मध्ये नामरूपविवर्जिता।।
अन्वयेन तु या निष्ठा सा तत्पदार्थगामिनी।
सा न व्युत्थानमाप्नोति नामरूपाञ्चिता तथा।।
यदन्तस्फूर्तिजं ज्ञानं तदेवाऽत्र विशिष्यते।:
अन्येभ्यो ज्ञानरूपेभ्यो ऋतम्भरेति कीर्तितम्।।
ज्ञानानन्तरमप्येषोऽसंप्रज्ञातनामकः
समाधिश्च समभ्यस्तसाध्नोति परमं पदम्।। :
क्वचित् स्वप्नोपि योगत्वं याति हिरण्यनामकः
यथार्थापार्थभेदेन स्वप्नो हि द्विविधः।।स्मृत :[८]

जी निष्ठा व्यतिरेकाने 'त्वम्' पदार्थाचे अनुगमन करते ती नामरूपरहित होऊन मध्येच जागृतावस्था प्राप्त करेल. परंतु जी निष्ठा अन्वयाने उत्पन्न होते ती 'तत्' पदार्थाचे अनुगमन करते व ती नामरूपात्मक असून पुन्हा जागृत अवस्था प्राप्त करीत नाही. जे अंत:करणात साकारलेले ज्ञान आहे तेच ज्ञान विशेष ठरते, हे विशेष ज्ञान म्हणजे 'ऋतंभरा' होय. ज्ञानानंतरही जेव्हा असंप्रज्ञात समाधीचा चांगला अभ्यास होतो व तो निरंतर चालूच असतो तेवा योगसाधाकाला सर्वोच्च स्थान प्राप्त होते. स्वप्नाला हिरण्ययोग म्हणतात व तो यथार्थ आणि अपार्थ अश्या दोन प्रकारचा आहे.

अन्यार्थश्च भवेत् स्वप्न।:क्वचिदन्यार्थसूचक :
स्वप्ने च देवदेवस्य गुरूणामपि दर्शनम्।।
यथार्थकथ्यते भाग्याद् भाग्योदर्कश्च कथ :्यते।
स्वप्नादिष्टैश्च विद्वद्भिर्निर्मितं वाङ्मयं महत्।।
देहेस्मिन् कुण्डलाकारा कुण्डलिनी प्रकाशिनी।
मूलाधारमधिव्याप्य भासते शक्तिरीश्वरी।।
या शक्तिपृथिवीं धत्ते कुण्डलाकारिणी परा। :
सैवादिशेषनामानं भजते तन्त्रवाङ्मये।।
एवं योगरहस्यं यो ज्ञात्वा योगं समभ्यसेत्।
कैवल्यं प्राप्य जन्मादिचक्रस्यान्तं समाप्नुयात्।।[९]

स्वप्न हे कधी एखादा अर्थ देणारे किंवा अन्य अर्थाची सूचना देणारे असू शकते. कधी स्वप्नामध्ये परमात्म्याचे किंवा गुरूचेही दर्शन होऊ शकते. भाग्य चांगले असेल तर यथार्थ स्वप्न पडते आणि तेव्हा भाग्याचे फळ सांगितले जाते. त्यामुळेच स्वप्नामध्ये आदेश प्राप्त झाल्याने विद्वानांनी विपुल साहित्यनिर्मिती केली आहे. या देहामध्ये कुंडलाकर असलेली तेजस्वी कुंडलिनी आहे. ही ईश्वरी शक्ती मूलाधारचक्राला व्यापून राहते. जी कुंडलाकारिणी परा शक्ती पृथ्वीला धारण करते तीच तंत्रवाङ्गमयामध्ये 'अदिशेष' नावाने ओळखली जाते. अश्याप्रकारे जो योगाचे रहस्य जाणून योगाचा अभ्यास करेल तो कैवल्य प्राप्त करील आणि जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होईल.

निष्कर्ष -

प्रामधुसूदन पेन्ना विरचित प्र .ज्ञाचाक्षुषम् या महाकाव्यातील गुलाबगीता एक वैचारिक अमूल्य असा खजिना आहेमानव कल्याणसाठी हितकर बाबीचे . तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून उपदेशात्मक मौलिक विचारांचे व तत्त्वज्ञानाचे विवेचन त्यात आलेले आहे- जसे .

१. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर यांच्यापासून अलिप्त राहावे .
२. दु .खविनाश करावा:दु :खाची कारणे शोधून स्वत:
३. कोणत्याही बाबतीत अति लोभ करून नये.
४. ध्यानाने ब्रह्मासोबत साम्य साधणे म्हणजेच योग होय.
५. ज्ञानाने ब्रह्मासोबत एकरूपता साधणे म्हणजे वेदांत होय.
६. एकाग्र मानाने देवदेव करणे म्हणजे योगरहस्य होय.
७. योग भावनांना शुद्ध करतो.
८. परमात्मा प्राप्तीरूप योग शुद्ध भावना निर्माण करतो.
९. हठयोग, ध्यानयोग, मंत्रयोग, लययोग, नादयोग या पाच योगप्रकारांमुळे राजयोगाची सिद्धी होते.
१०. चित्तवृत्तीच्या नाशानंतर चैतन्यच शिल्लक राहते.
११. श्रध्दा ही योगाची माता होय.

१२. श्रेष्ठ प्रज्ञा म्हणजे निर्मळ बुध्दी होय.
१३. निर्मळ बुध्दी म्हणजे ऋतंभरा प्रज्ञा होय.
१४. अष्टांग योगाचे आचरण क्रमाने करावे.
१५. आसनांनी शरीरात स्थिरता निर्माण होते.
१६. चित्तवृत्तीनिरोधाने आत्मशक्तीचा विकास होते.
१७. प्राणायामाने मनाची साध्य होते.
१८. प्रत्याहाराने चित्ताची चंचलता दूर होते.
१९. संप्रज्ञात समाधीमुळे चित्त एकाग्र होते.
२०. चित्तवृत्तीनिरोधाने निर्विकल्प समाधी प्राप्ती होते.
२१. अंत:करणात साकारलेले ज्ञान म्हणजे ऋतंभरा प्रज्ञा होय.
२२. स्वप्नयोग म्हणजे हिरण्ययोग होय.

या लेखात दिलेल्या श्लोकांच्या व्यतिरिक्त अन्य बरेच असे श्लोक आहेत जे अमूल्य मार्गदर्शन करतात . .त्यामुळे त्याही श्लोकांचे अध्ययन करणे आवश्यक आहे गुलाबगीतेचा उपदेश हा सर्वांना व सर्वकालिक लागू पडणारा आहे, त्यामुळे गुलाबगीतेचे सखोल अध्ययन करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची -

1. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - २, ३, ४, ५, ६.
2. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - ७, ८, ९, १०, ११.
3. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - १२, १३, १४, १५, १६.
4. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - १७, १८, १९, २०, २१.
5. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - २२, २३, २४, २५, २६.
6. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - २७, २८, २९, ३०, ३१.
7. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक -३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०.
8. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - ४१, ४२, ४३, ४४, ४५.
9. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-5, श्लोक - ४६, ४७, ४८, ४९, ५०.

संदर्भग्रंथ -

1. पेन्ना मधुसूदन, प्रज्ञाचाक्षुषम्, न्यु भारतीय बुक कॉरपोरेशन, नवी दिल्ली, 2014
2. घटाटे कृष्ण माधव, श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा, श्रीगुलाबरावमहाराज जन्मशताब्दी प्रकाशन, नागपूर, द्वि.आ. 1981 व तृ.आ. 2003
3. अगस्ती कलापिनी, प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबराव महाराजांचे योग-दर्शन, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, 2001
4. घटाटे कृ.मा., समन्वय महर्षि दिव्यचक्षु श्रीगुलाबरावमहाराज प्रणीत सर्व धर्म समन्वय, प्रकाशक-सुमेधा गोविंदराव लिमये, मुंबई-

****

प्रभुवंश हस्तलिखिताचे ऐतिहासिक अध्ययन

सौ.सरिता राजेंद्र गिल्लरकर
डॉ.राजेंद्र जैन

प्रस्तावना:प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय प्रभुवंश हस्तलिखिताचे ऐतिहासिक अध्ययन असा आहे -. या हस्तलिखित ग्रंथाचे नाव प्रभुवंश असे आहे. या काव्याचे कवि गोविंद पंडितआणि या काव्याची व्याख्या अनंत , कवि यांची आहे.

प्रस्तुत काव्यात श्रीमंत सवाई माधवराव पेशव्यांच्या जन्मापासून ते त्यांच्या विवाहापर्यंतचे वर्णन अतिशय रसाळपणे केलेले आहे.सदर काव्य इस.. १८८० च्या सप्टेंबर महिन्याच्या काव्येतिहाससंग्रहात प्रसिद्ध ‘ झाले आहे.[1]

या काव्याच्या रचनेचा व लेखनाचा काळ यासंबंधी प्रस्तुत हस्तलिखितात स्पष्ट निर्देश आहे तो म्हणजे शक १७१६ किंवा इस..१७९४ कवि गोविंद किंवा टीकाकार अनंत हे दोघेही सवाई माधवराव यांचे समकालीन होते यावरून दिसतेकदाचित दोघांचाही पुण्याच्या दरबाराशी निकटचा संबंध असावा मात्र आतापर्यंत प्रसिद्ध . [2].झालेल्या कागदपत्रात गोविंद नावाचा कोणी कवी पेशव्यांच्या दरबारी असल्याचा उल्लेख नाही
काव्येतिहाससंग्रहात ही पोथी १८८०त प्रसिद्ध झालीपरंतु प्रसिद्ध करताना त .ी कोठे व कोणाकडून उपलब्ध झाली यासंबंधी काहीही माहिती दिलेली नाही.

प्रस्तुत काव्यात मुंज विवाह समारंभ यांची अत्यंत सविस्तर वर्णने यात आहेत. मराठी सामाजिक चालीरीती च्या अभ्यासकांना ती खचितच उपयुक्त ठरतील. सवाई माधवरावांच्या राजकीय जीवनाविषयी फारच थोडी माहिती या काव्यात आली आहे पण जी आहे त्यात अशा एका गोष्टीचा उल्लेख आहे की जो अन्यत्र नाही.

काव्यात सवाई माधवरावांच्या जन्म मुंज विवाह या तीन प्रसंगांचा उल्लेख आहे पैकी ’प्रभुवंश‘ जन्माचा शक व इतर माहिती ऐतिहासिक पुराव्यावरून बरोबर ठरते. परंतु मुंजीचा शक काव्यात दिलेला नाही फक्त पर्वती परिसरात मुंज झाल्याचा उल्लेख आहेपेशवे बखरीत शक १७०१ मध्ये मुंज झाल्याचा उल्लेख . आहे. मराठी रियासतीत वैशाख शु५हा मुंजीचा दिवस दिला आहे .. ‘प्रभुवंशकाव्यात विवाहाच्या प्रसंगाचे वर्णन ’ आले असले तरी विवाहाचा शक दिलेला नाही. पेशवे बखरीत माघ शुद्ध ९शक१७०४दिला आहे. प्रभुवंशात सवाई माधवराव पेशवे यांची पत्नी ही थत्ते यांची मुलगी असा उल्लेख आहे. यावरून सवाई माधवरावांच्या पहिल्या विवाहाचे हे वर्णन आहे तसे .परंतु वधूचे पूर्वाश्रमीचे नाव दिलेले नाही ,ही गोष्ट उघड आहे ,तिच्या

[1] ‘प्रभुवंश एक अध्ययन उषा रानडे ’पुणे

[2] . प्रभु वंश एक अध्ययन उषा रानडे, पुणे

वडिलांचे नाव दिलेले नाहीअसे नाव ठेवले आहे 'रमा' फक्त लक्ष्मीपूजनाला .. तसेच मेव्हण्याने सवाई माधवरावांची लग्नापूर्वी पूजा केली असा उल्लेख आहेयावरून वधूचे वडील तेव्हा हजर नसावेत किंवा ह्यात . नसावेत बखरीतील वर्णना वरून सवाई माधवरावांची पत्नी केशव नाईक थत्ते यांची मुलगी होती असे दिसते. पेशवेकालीन महाराष्ट्रात बाळाची भैरव थत्ते यांची ही मुलगी होती असे म्हटले आहेहा लग्नसमारंभ कृष्णाजी . नाईक थत्ते यांच्या वाड्यात झाला असे बखरीत वर्णन आहे त्यामुळे वधूच्या पित्याच्या नावाचा उलगडा होत नाही पेशवे दप्तर, बखर यात माधवरावांच्या मुंजीचे लग्नाचे मिरवणुकीचे वर्णन आहे. तसेच त्या प्रसंगी हजर असणारे छत्रपती,निजामाचा मुलगाअनेक सरदार यांचे वर्णन आहे ,. नानांनी या लग्नाची व्यवस्था किती चोख ठेवली याचेही वर्णन आहेपरंतु विवाह विधीचे वर्णन आढळत नाही प्रभुवंश काव्यात नानां .चा कारभारी म्हणून उल्लेख येणे अपरिहार्यच आहेपण मराठी रियासतीत सांगितल्याप्रमाणे लहानपणी सवाई माधवरावांच्या नेहमी . भोवती असणारे पुरुषोत्तम दाजी पटवर्धन त्यांचे सहकारी यांचा उल्लेख नाही पण हरिपंत फडके व महादजी शिंदे .यांचे उल्लेख आहेत

'प्रभुवंशकाव्य 'ा खेरीज सवाई माधवराव यांच्या जीवनावर इतर अनेक काव्ये रचली गेली तसेच त्यांच्या कारकीर्दीचे पेशवे दप्तर मराठी रियासत बखर पोवाडे अशा अनेक पुराव्यांवरून धागे दोरे सापडतात पण प्रस्तुत प्रभुवंश काव्याचा कशातही उल्लेख नाही मागे उल्लेख केल्याप्रमाणे गोविंद राजाच्या राजवंश काव्याचा)catalogue catalogorum) मध्ये उल्लेख आहे तसेच गणपत हरिहर पटवर्धन यांचे मराठीत एक सर्गाचे भट्टवंशकाव्य आहे. पण हे बाजीराव ते चिमाजी अप्पा चा मृत्यू पर्यंतच्या काळाचे असल्याने प्रस्तुत काव्याचा व त्याचा संबंध येत नाही या व्यतिरिक्त सवाई माधवरावांची कारकीर्द सांगणारे शाहिरी वाङ्मय आहेशाहीर खंडू . न.ऐतिहासिक पोवाडे य) सन्तु यांचा सवाई माधवरावांच्या जन्माचा पोवाडा प्रसिद्ध आहे.केळकर१९२८यांत (माधवराव परशुरामाचा अवतार आहे असे म्हटले असून त्यांचा जन्म मुंज विवाह याचे वर्णन आहे सवाई माधवराव रंग ख‌ेळत वानवडी पर्यंत गेले याचे वर्णन रंगाचे पोवाडे म्हणून प्रसिद्ध असलेल्या पोवाड्यातून आढळते होनाजी बाळा प्रभाकर शाहीर महादेव गुणराज छंदी यांचे रंगाचे पोवाडे प्रसिद्ध आहेतसेच प्रभाकर . शाहिरांचे सवाई माधवरावांच्या मृत्युच्या प्रसंगी पोवाडा केलेला आहे. तेव्हा सवाई माधवराव यांच्या जीवनातील एक कालखंडावर आधारलेले हे काव्य १८८० मध्ये प्रसिद्ध होऊनही त्याचा इतिहास साधन म्हणून उपयोग का केला नाही सवाई माधवरावाच्या जीवनावरील वर निर्देश केलेल्या लेखनात या काव्याचा उल्लेखही येऊ नये ही आश्चर्याची गोष्ट आहे निदान सवाई माधवरावांसंबंधीच्या ऐतिहासिक माहितीला आधार म्हणून तरी राजकीय व सांस्कृतिक बाबतीत यातील तपशील उपयुक्त ठरावा

हस्तलिखित प्रतींचा परिचय:-

प्रस्तुत काव्याच्या तीन प्रती संशोधिकेला प्राप्त झाल्या आहेत.
१क्र.द)प्रभुवंशकाव्यम्|(.३१.६८४आनंदाश्रमसंस्था पुणे(.
२प्रभुवं(शम्(सर्ग)२१९५,मुंबई विद्यापीठ ,
३अ९३२) प्रभुवंशकाव्यम् (.१२/६/५१.दि.स.४१(

हस्तलिखिताचे स्थूल स्वरूप:-

पहिल्या प्रतीचे वर्णन या हस्तलिखित प्रत मध्ये ३२पृष्ठ/पाने आहेत. हे संपूर्ण हस्तलिखित उत्तम स्थितीत आहेत. ११५श्लोकाचे हे पद्य स्वरूपातील काव्य आहे. प्रत्येक पानावर एक श्लोक आहेतर काही . पानांवर दोन श्लोक सुध्दा आहेत,श्लोकांची चरण संख्या निश्चित नाही.कुठे दोन कुठे चार तर कुठे सहा चरण दिसतातप्रत्येक पानावरील श्लोक व त्याची व्याख्या त्याच .क्रमांक्रमाणे श्लोक लागोपाठ लिहिलेले दिसतात. पानावर समाप्त केली आहे.नवीन पानावर नवीन श्लोक लिहिलेला दिसतो. हस्तलिखिताच्या पानांचा रंग पिवळसर आहे. आकार२५,१/२सें.मी.११,१/२सें.मी. आहे. हस्तलिखिताची भाषा संस्कृत आणि लिपी देवनागरी आहे. हस्तलिखितातील अक्षरे सुवाच्य व सुंदर रेखीव आहेत.वाचण्यास सोईस्कर आहेत.श्लोक वृत्तबध्द आहेत, यात आलेल्या वृत्तांची नावे वसन्ततिलकाआर्या ,शार्दुलविक्रीडीत ,स्रग्धरा,, इंद्रवज्राउपजाती ,उपेन्द्रवज्रा,, शिखरिणीभुजंगप्रयात,पञ्चचामर,मत्तमयूरी ,,अनुष्टुभ इत्यादी. टीकाभाग गद्य स्वरूपातील आहेत.जिथे चुका झाल्या आहेत तिथे लिहिणार्याने पिवळ्या रंगाचा वापर शब्द खोडण्यासाठी केला आहे.

दुसऱ्या प्रतीचे वर्णन:पृष्ठसंख्या १८-,आकार लांबी रुंदी १०, १/४सें.मी.४, ३/४ पानांचा रंग पिवळसर , हस्तलिखिताची स्थिती चांगली वाचण्यासाठी उत्तम आहे,भाषा संस्कृत आणि लिपी देवनागरी आहे,एका पानावर ४ते १०ओळी आहेत.आणि एका ओळीतील अक्षर संख्या ३६आहेत.लालरंगाची हस्तलिखिताला बार्डर केली आहेपानाच्या मधोमध श्लोक लिहिलेला आहे आणि त्याच्या वरच्या बाजूला आणि खालच्या बाजूला . एकूण श्लोक संख्या ६०आहेत .काव्याची व्याख्या लिहिलेली आहे. या हस्तलिखिताच्या शेवटी इति “ प्रभुवंशे टीकायां विषमपदव्याख्यासम ाख्यायां विवाहवर्णनो नाम द्वितीय।२।आणि :सर्ग: असा उल्लेख केला आहे “ ।:समाप्त:प्रभुवंशद्वितीयसर्ग. सुरूवातीला ।।अथ प्रभुवंशद्वितीयसर्गप्रारम्भ ::।। असे लिहिले आहे. या पोथी मध्ये फक्त सवाई माधवरावांच्या विवाहाचे वर्णन आहे.

तिसरी प्रत ही मुद्रित आवृत्ती आहे.काव्याचे नाव लिहिले आहे आणि ११५श्लोक व्याख्येसह दिलेले आहेत.पृष्ठसंख्या २०आहेत.संस्कृत भाषा ,देवनागरी लिपी आहे.

हस्तलिखिताचे आंतरिक स्वरूप:- हस्तलिखिताचे नाव प्रारंभी हस्तलिखिताच्या सुरुवातीला आहे तसेच हस्तलिखिताचा शेवट ज्या पानावर झालेला आहे त्या समाप्ती भागात सुद्धा हस्तलिखिताचे नाव लिहिलेले आहे . या काव्यात सवाई माधवराव पेशवे यांच्या जन्माचे मुंज विवाह सोहळ्या चे वर्णन आलेले आहे. या काव्याचे कवी गोविंद पंडित आहेत परंतु या काव्याच्या रचयिता चे जन्मस्थळ काल,वंशाचीयाविषयी कुठल्याही , प्रकारची माहिती हस्तलिखितात उपलब्ध नाही .ठिकाणी प्रामाणिक माहिती उपलब्ध झाली नाही .आणि इतर. कावळ्याची रचनाकार गोविंद पंडीत यांच्या गुरु शंकराचार्य सच्चिदानंद नावाचे कोणी एक अनुवर्तक यांच्या मार्गदर्शनात कवींनी हे काव्य लिहिल्याचे या काव्याच्या शेवटी नमूद केलेले आहे. या ग्रंथाच्या आश्रयाने लिहिलेली व्याख्या ही अनंत कवी यांनी केलेली आहे.यांचा सुद्धा काळ जन्मस्थळ याचा उल्लेख या पोथी मध्ये दिलेला नाही .

साहित्यिक स्वरूप:-काव्यात वैदर्भीय रितीचा प्रयोग केलेला आहे सरळ वाक्यरचना आहे दीर्घ सामासिक वाक्यरचना कुठेही दिसत नाही अलंकार उपमा अनुप्रास श्लेषआहेत .उत्प्रेक्षा इ,. शुंगार रस पूर्ण तसेच वीररस पूर्ण हे काव्य आहे शब्दालंकार अर्थालंकार या काव्यात दिसून येतात.

हस्तलिखिताची कथावस्तू:-

प्रस्तुत शोधनिबंधात पेशवे श्रीवर्धन भट्ट बाळाजी विश्वनाथ बल्लाळ घराण्याचा उल्लेख केला आहे".अतुल पराक्रमी सेवक[3]" म्हणून शाहू महाराजांनी स्वतः गौरवलेल्या बाळाजी विश्वनाथ भटांची शौर्य वर्णन आणि पेशवे वंशाची गाथा या शोधनिबंधात वर्णन केले आहेत पेशवे वंशातील पहिले पंतप्रधान बाळाजी विश्वनाथ बल्लाळ आणि त्यानंतर बाजीराव बाळाजी विश्वनाथला यांना पंतप्रधान पद प्राप्त झाले त्यांच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशवेपदावर आरुढ झाले आणि त्यानंतर थोरले माधवराव पेशवे यांनी कर्तबगार पेशवे म्हणून नावलौकिक मिळविले त्यांच्यानंतर नारायणराव पेशवे यांचा खून झाल्यानंतर रघुनाथराव पेशवे यांनी काही महिन्याकरिता पंतप्रधान पदाचा कार्यभार सांभाळला आणि नंतर नारायणरावांच्या पत्नी गंगाबाई यांनी कार्यभार काही कालावधीसाठी सांभाळला आणि सवाई माधवराव पेशवे यांच्या जन्मानंतर व्या दिवशी सवाई 40 नाना फडणवीस यांच्या देखरेखीखाली सवाई माधवरावांनी .माधवराव यांना पेशवाईची वस्त्रे बहाल केल्या गेली राज्यकारभार सांभाळला.

विवाहयोग्य झालेल्या श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या विवाह करता उत्तम कुळातील थत्ते घराण्यातील कन्या योग्य जाणून नाना फडणीसांनी आणि इतर मंत्री मंडळांनी श्रीमंतांच्या विवाहाची तिथी जागा निश्चित केली पर्वतीवर जागा ठरविण्यात आली विशाल असा मंडप विवाहा करिता निर्माण करण्यात आला विवाहाची आमंत्रणे पाठविली गेली निजाम हैदर होळकर भोसले आणि इतर मित्र मंडळींना सरदारांना विद्वानांना विवाहाचे निमंत्रण पाठविले गेले संपूर्ण विवाह चे नियोजन नाना फडणवीस यांनी आपल्या हाती घेतले होते त्यांच्या देखरेखीखाली संपूर्ण विवाह समारंभाच्या कार्याची व्यवस्था आखली होती इतर मंत्री मंडळांना आणि इतर सेवकांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुसार कामाची विभागणी केली होती प्रत्येक व्यक्ती आपल्याला मिळालेल्या कामात व्यस्त होता प्रत्येक व्यक्ती स्वतः जातीने लक्ष देऊन आपली जबाबदारी पार पाडत होता श्रीमंतांच्या विवाहाचा उत्सव सर्वत्र पसरला होता संपूर्ण पुणे शहरात उत्साहाचे वातावरण दिसून येत होते.

"पाणिग्रहोचितनृपस्य.....सर्वाति सत्कृतिविधौ व्यदधात्प्रतिज्ञाम्।।१।।[4]

नाना फडणवीस यांनी सवाई माधवराव पेशवे यांच्या विवाहात कुठल्याही प्रकारची कमतरता भासू देणार नाही अशी प्रतिज्ञा करुन विवाहाची जबाबदारी संपूर्ण स्वतःच्या खांद्यावर घेतली आणि प्रतिज्ञा प्रमाणेच नाना फडणविसांनी विवाहाची संपूर्ण जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली योग्य मंडप शोभा उभारण्यात खाली विस्तृत मंडपाची रचना करण्यात आली व भव्य मंडप उभारण्यात आला पर्वतीवर विवाहाचे ठिकाण ठरविण्यात आले संपूर्ण विवाह स्थळावर दीपमाला सुशोभित करण्यात आले योग्य आणि ठिकठिकाणी कारंज्याची व्यवस्था करण्यात आली. असा विवाह मंडप उभारून सजावटी करण्यात आल्या केसर युक्त पाणी रस्त्यावर शिंपडले

---

[3] पेशवे घराण्याचा इतिहास, प्रमोद ओक पृक्र..९

[4] प्रभु वंश काव्य मुंरप्रत..

चौकाचौकात रस्त्यारस्त्यावर गल्लीबोळात रांगोळ्या काढल्या गेल्या संपूर्ण पुणे शहर सजविण्यात आले घरोघरी दीपमाळा लावल्या गेल्या संपूर्ण रस्त्यावर फुलांची आरास केली गेली.

स्वच्छा रथ्या....दीपा विष्वग्व्यापतशोभाश्च विरेजु॥[5]:

विवाहाला आलेल्या स्त्रियांनी मंडपामध्ये धान्य कांडण करून उडीद मूग वाटून मंगल गाण्यासह वड्या घातल्या या महोत्सवी स्त्रियांनी परस्परांना हळदी कुंकू लावले आणि फळांनी त्यांच्या ओटी भरल्या ज्यांना निमंत्रण केले गेले असे राजे मित्र आणि विद्वान पंडित तसेच शंकराची पूजा करायला उत्सुक असलेले ब्राह्मण त्यांना त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणे आदरपूर्वक निवासासाठी जाणोसामंदिरे देण्यात आली आणि आपल्या , आवडीचे भोजन पदार्थ तयार आहेत असे सांगण्यात आले विवाह सोहळ्या आधी आपापल्या पसंतीच्या प्रासादात त्यांच्या आप्तेष्टासह ते भोजनासाठी येऊ लागले जेष्ठ श्रेष्ठ राजे आणि त्यांचे मंत्री प्रतिष्ठित जणांनी प्रेमाने बोलावल्यावर हे सर्व लोक जेवायला यायचे त्या पौरजनांनी सुद्धा वस्त्रप्रावरणे आधी आहेर उपरणे देऊन उपस्थितांचा छान सत्कार केला मंगल अक्षता यांनी भरलेल्या सोन्याच्या पात्रात अक्षदा वाटल्या गेल्या सोन्याचे पात्र हातात ठेवून अनेक मित्रांसमवेत पुरोहित मंडळी यांना आदरपूर्वक निमंत्रण करण्यासाठी घरोघरी गेलीत घरोघरी राजाचा विवाहमुहूर्त सांगून सत्कार पूर्वक और पौरजनांना आमंत्रण केले गेले त्या निमंत्रितांनी सुद्धा वस्त्र आदी आहेर देऊन निमंत्रण करणाऱ्यांचा यथोचित आदर सत्कार केला.

दिव्याक्षतैपूरितहेमपात :्रं...यातं पुरोधोभिरथादरेण॥८॥[6]

गल्लोगल्ली सुंदर आणि भरजरी वस्त्रे परिधान केलेली स्त्रीत्यांच्यापुढे .पुरुष यांचे थवे शोभत होते- गावाच्या ेहत्ती घोड्यांवर वेगवेगळी वाद्यांचा गजर करणारे चतुर कलाकार शोभत होते यथासांग उपचारा प्रमाण सीमेवर सीमांत पूजनाचा महोत्सव झाला त्यात नवरदेवासाठी वस्त्र अलंकार देऊन वराचे स्वागत केले गेले त्यानंतर दोन्ही कुळाचे गोत्र व नाव त्यांचा उल्लेख साक्षगंधाचाहळकुंड .साखरपुडा कार्यक्रम संपन्न झाला , सुपारी इत्यादीनी पूजा झाल्यानंतर त्यांचे तुकडे मित्रांमध्ये वाटून घेतले वरिष्ठ लोकांनी अत्यंत आदराने त्या सभेमध्ये सर्वांना पुन्हा एकदा संतुष्ट केले वधूला हळद लावून, स्नान घातल्यावर उरलेली हळद नवऱ्या मुलासाठी अत्यंत स्नेहाने आणली गेली त्या स्त्रियांनी रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या नवरदेवाला हळद लावून अभ्यंग स्नान घातले असा हा विवाह सोहळा सुरू झाला सर्वप्रथम गणपती पूजन करून विद्वानांच्या समक्ष पुण्याहवाचन केले गेले हेच विद्वान विवाह सोहळ्याचे आदरणीय साक्षीदार असतात पुण्याहवाचन करण्यासाठी सुशोभित कलशात पैसे सुपारी अक्षदा गंधफूल दूर्वा घालून त्यावर ताम्हण पूर्णपात्र ठेवून घरच्या देवघरात गौरीप-ूजनाची गौरीहर पूजनाची सिद्धता झाली.

विघ्नेशपूजनपुर :...गौर्यादिकं च निमित्त गृहदेवताग्रे॥१४॥[7]

आपापल्या प्रासादामध्ये वाड्यांवर भवनांनमध्ये कुळाचार संपन्न झाल्यानंतर सर्व लोकांनी उत्सव वस्त्रे रत्ने सुवर्ण आभूषणे देऊन श्रीमंत माधवराव यांची पूजा केलीआह .ेर करणाऱ्यांची गर्दी झाली पुण्याहवाचन झाले अनेक प्रकारचा बहुमूल्य आहेर आला प्रत्येक दिवशी असेच आहेर येत होते तेव्हा राजा फक्त डोळ्याने पाहून होकार देत

[5] तथैव

[6] प्रह..मुं प्रत२.

[7] प्रत २ह.

स्पर्श न करता आहेर स्वीकारत होते ज्याप्रमाणे सर्वांवर प्रेम करणारा सूर्य मित्र या नावाने ओळखला जातो त्याचप्रमाणे सवाई माधवराव पेशवे श्रीमंत या विवाह समारोहात पेशवे असूनही आणि राज्याचे प्रमुख असूनही अधिराज भासत होते. प्रजेला मित्रा सारखे वाटू लागले त्यामुळे मित्र आणि शत्रू या दोघांनाही पेशव्यांच्या विवाह सोहळा मुळे एक सारखाच हर्ष झाला राजांना आहेर मित्राकडून येतो तसा शत्रूकडून सुद्धा आला शत्रू पेशव्यांच्या लग्न सोहळा पाहून हर्षित झाला कारण पेशव्यांच्या तर्फे शिष्टाचार म्हणजे परत आहेर दिला गेला आणि त्यांनी तो आनंदाने स्वीकारला सुद्धा त्या काळात शत्रू सुद्धा आनंदाच्या सोहळ्यात भाग घेत असत. जेव्हा लग्नाचे वराड निघाले त्यात विविध प्रकारच्या लोकांची सरदार दरकदार मांडलिक राज्य सरकारी अधिकारी पेशव्यांचे अधिकारी अशी सर्व गर्दी होती आणि अशाच गर्दीमध्ये सजलेल्या हत्तीवर सुशोभित अंबारी मध्ये सवाई माधवराव पेशवे शोभत होते ज्याप्रमाणे स्वर्गातील देवतांच्या गर्दीमध्ये दिव्य वेश धारण केलेले ऐरावतावर आरूढ असलेले इंद्र दिसावे त्याप्रमाणे सवाई माधवराव पेशवे शोभून दिसत होते. सर्वात पुढे झांजा ढोल ताशे यांच्या त्यांच्यामागे पादचारी त्यांच्यामागे झुलींनी सजलेले हत्ती घोडे आणि त्यांच्या मागे लखलखणारे शास्त्र घेतलेले सुंदर वेशातील घोडेस्वार आणि या सर्वांच्या पुढे अनेक वाद्यांच्या संमिश्र नादामुळे आकाश दणाणून टाकणारे वादक असे हे वराड मोठ्या थाटात निघाले अशा जय्यत तयारीत वर आणि वराडी हे वधूच्या गृहात प्रवेश करू लागलेपौरांगनांचे कौतुक सगळ्यांन सह पाहात त्या विशाल सुरेख पैकी सजविलेल्या सभे ,त श्रीमंत माधवराव पेशवे आसनस्थ झाले वधूकडील सुजाण लोकांनी ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे आदराने बुद्धिमान आप्त मंत्री आणि सैनिक इत्यादींना आसनावर बसण्याचा आग्रह केला देवांचा राजा इंद्र प्रमाणे सर्व वैभवानीशी राज्यश्रीनी युक्त असा जणू काही इंद्रच त्या सभेत शोभत होता लग्न माघ शुद्ध नवमी शके सतराशे चार या रोजी झाले. विवाह सभेत आसनावर विराजमान असलेल्या नवरदेवाची मेव्हण्याने व सासूने यथाविधी स्वागत व पूजा केल्यानंतर गुरुजींनी मंगलाष्टक गायलेशुभ घडी टळू नये म्हणून सुलग्न सावधान असं शास्त्रसंमत घडीला अंतरप .ाट दूर केला नवरदेवाचे मुखावलोकन करून लाजलेली कन्या इष्ट जनांनी थोरामोठ्यांनी सांगितल्यावर नवरदेवाच्या म्हणजेच श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या चरणकमलावर नतमस्तक झालीवधूने नवरदेवाच्या चरण स्पर्श . करताच सर्वांनी अक्षतांचा वर्षाव केला. त्याचवेळी अनेक वाद्यांचा गजर ऐकू लागला आणि समस्त लोकांना आनंद झाला.

अतिसमयसुलग्नं सावधानं वदद्भि....मस्तकेनास्पृशत्सा॥३६॥[8]

मंगलाष्टका नंतर आलेल्या अतिथी पाहुण्यांना मित्रमंडळींना वधु पक्षातील आप्तेष्टांनी भोजनाची व्यवस्था झालेली आहे असे सांगून सर्वांना आदराने विनंती करून प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणे त्यांना पंक्तीत आसनस्थ होण्याची विनंती केली सगळ्या पंगतीपुढे सुरेख रांगोळ्या काढलेल्या होत्या, चंदनाचे पाणी शिंपडले होतेकेळीच्या पानावर मांडलेल्या निर्मळ अशा चांदीच्या .प्रत्येकाच्या भोजन पाना समोर समई ठेवली होती , ताटात घरच्यास्त्रियांनी वाढायला सुरुवात केलीपुरुषाच्या कपाळावर केसर कस्तुरी घातलेला मंगल तिलक . .लावण्यात आला अशी ही सगळी सजलेली प्रसन्न पंगत षडरसयुक्त दिव्या पकवाना सहीत भोजन करू लागली विविध प्रकारच्या भाज्या आणि कोशिंबिरी विविध प्रकारच्या चटण्या सर्वात श्रेष्ठ खीर लाडू केसरी भातावर साजूक तूप ,श्रीखंड मधुर दही ,असे स्वादिष्ट जेवण वाढल्यावर सर्वांना वाळयाचे पाणीगुलाबाच्या पाकळ्या ,

[8] प्रत २श्लोक ३६.

कस्तुरी टाकून सुगंधी पाणी पिण्यासाठी दिले,सगळ्या पंगतीपुढे अत्यंत विनम्रपणे हात जोडून पुन्हा पुन्हा प्रत्येकाला आग्रह करत जेवण पदार्थ वाढलेप्रत्येकाच्या समोर जाऊन पदार्थ घेण्याचा आग्रह केला जाऊ . लागला,अशाप्रकारे आप्तेष्टांच्यापंगती सोबतच इकडे वरसोन्याच्या ताटातून .वधू परस्परांना घास भरवत होते- सोन्याच्या ताटात दोघांचे प्रतिबिंब पडल्यामुळे ते .एकमेकांना घास देताना नवरी अतिशय गॉड लाजत होती द ोघे असून अनेक भासत होते. घास देताना वधू वरा कडे पाहत होती तिथे सभोवताली जमलेले आप्तेष्ट मित्रपरिवार नातेवाईक सगळेजण या प्रसंगाने हर्षित झाले होते थट्टामस्करी करून आनंद घेत होते अशाप्रकारे जेवणावळी आटोपल्यावर सर्व ब्राह्मनांनी इतर मंडळीपौरजनांनी तृप्त होऊन वधूवरांना आशीर्वाद देऊन सर्वांची प्रशंशा केलीया प्रसंगी जर दुर्वासा ऋषि मुनी जरी आले असते तर तेसुद्धा प्रसन्न झाले असते अशा प्रकारची . ऐरणीपूजनानंतर वधूच्या परिवारातील ज्येष्ठांच्या मांडीवर बसलेली भरजरी वस्त्रे .उत्तम व्यवस्था केलेली होती परिधान केलेली वध ू त्यांनी सासरच्यांना दिलीआज पासून ही आपली जबाबदारी आणि आपली कन्या . झाली असे सांगून हा विधी झाल्यावर नवरदेव नाना उत्सवा सहीत स्वगृही जाण्यासाठी सुंदर अंबारी असलेल्या वधु सहित हस्तीनी वर आरुढ झाला. नववधूला घेऊन स्वगृही येत असलेल्या वराच्या चारही बाजूला रोषणाई झगमगत होती अशा त्या प्रकाशमान रस्त्यावर लहानवाद्यांचा गजर ही चालू होता .मोठे दीप प्रकाशित होत होते- अशा स्थितीमध्ये महोत्सवाच्या वातावरणात .अशा प्रकाशमान वातावरणात जणांचा समूह सहर्ष चालत होता प्रिय पत्नीला घेऊन अत्यंत सुशोभित अशा स्वतःच्या राजगृहात विव ाह समारोहाची समृद्धी आणि शोभा घेऊन इंद्राच्या वैभवाला मागे सारेल अशा हत्तीवर आरूढ होऊन रत्नजडित वस्त्रालंकारांनी नटलेले पेशवे पत्नी सह आणि वैभव लक्ष्मी सह त्या हत्तीवर आरूढ झाले तेव्हा रस्त्यामध्ये ऐश्वर्या लक्ष्मी ही जणू काही श्रीमंताची दुसरी भार्याच असे वाटत होतेज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा ज्योतिषी यांनी सांगितलेल्या वेळी ही वेळ गृहप्रवेशाला उचित . आहे असे सांगितल्यावर हातात श्रीफळ धरून घरच्या देवघरात जाऊन त्या वधूवरांनी देवांना नमस्कार केला तेव्हा विद्वानांनी सांगितल्याप्रमाणे लक्ष्मीपूजन उत्सवी जगाला आन ंद देणारे असे त्या वधूचे नाव रमा असे ठेवले गेले अशा प्रकारे अत्यंत बुद्धिमान महात्मा असलेला सवाई माधवराव पेशवे यांनी लोकांना आवडले असे एकूण असलेल्या उच्च कुळात जन्मलेल्या आणि रूपाच्या बाबतीत तर इंद्राच्या इंद्रायणीला शीला लाजवेल असे रूप असलेला चा भिम'रमे'कन्या दमयंती प्रमाणे पत्नी म्हणून स्वीकार केला.

हस्तलिखिताचे महत्त्व:-

१) प्रस्तुत हस्तलिखित हे सवाई माधवराव पेशवे यांचा जन्म व मौंजविवाह या प्रसंगावर आधारित असून , या हस्तलिखिताचेमहत्त्व ऐतिहासिकदृष्ट्या आहे.

२) पेशवे वंशातील लग्न सोहळ्याचे वर्णन करताना कवींनी समाजातील व्यक्तीकरिता साहित्यिक दृष्टी अत्यंत उपयुक्त हे हस्तलिखित महत्त्वपूर्ण ठरू शकते.

३) ऐतिहासिक सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टीने महत्त्वाचे प्रस्तुत काव्य आहे.

४) हस्तलिखितांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता हे काव्य महत्त्वपूर्ण ठरू शकते.

५) पेशवेकालीन लेखन पद्धती काव्य पद्धती काव्यातील साहित्यिक दृष्ट्या विवेचन तसेच कवी कल्पना काव्यातील साहित्यिक रसग्रहण या दृष्टीने हे काव्य महत्त्वपूर्ण ठरू शकते.

६) हस्तलिखितांचे व्याकरणदृष्ट्या विवेचन करताना त्याकाळातील कवींचे व्याकरण लेखन पद्धती इतर अनेक गोष्टींचा आढावा घेता येतो.

७) काव्यातील साहित्यिक भाग पाहिल्यावर छंद वृत्त अलंकार आणि वर्णने पाहिल्यावर कवी गोविंद पंडित यांच्यावर कवी कालिदास यांचा तसेच बाणभट्ट यांचा प्रभाव दिसून येतो.

हस्तलिखिताचे ऐतिहासिक अध्ययन:-

प्रस्तुत हस्तलिखित हे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. या हस्तलिखितात कवी ने लिहिलेले काव्य हे सवाई माधवराव पेशवे यांच्यावर आधारित आहे. पेशवे वंशातील सवाई माधवराव हे गाजलेले व्यक्ती म्हणून ओळखल्या जाते. या हस्तलिखितात आलेल्या घटना प्रसंग यांची वर्णने या हस्तलिखिताला ऐतिहासिक ठरविते . हस्तलिखितात आलेली जन्मतिथी हे या काव्याचे ऐतिहासिक स्थान निश्चित करतेसवाई माधवराव यांची मुंज . हे ऐतिहासिक समारंभ इतिहासाला .पर्वती परिसरात झालेला उल्लेख याच काव्यातून आपल्याला स्पष्ट होतो बळकटी प्रधान करते. या हस्तलिखिताचा काळ पेशवेकालीन इतिहासाला कलाटणी देणारा आहे. या काव्यात आलेल्या विवाह समारंभाचे वर्णन अतिशय रसाळ पूर्ण आहे यावरून पेशवेकालीन विवाह संस्कृतीचे दर्शन घडते ही घटना ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरते. पेशवेकाळात विवाह पद्धती आणि विवाहात होणारे रिती पद्धती तसेच कुळाचार यांचा वाचकाला ऐतिहासिक दृष्टीने लाभ होतो. काव्यात आलेली विवाह प्रसंगी चे रमणी प्रसंग वाचकाची शृंगार रसाची आवड पूर्ण करतेवाचकाच्या मनात काव्याविषयी आवड निर्माण करते .. काव्यात आलेल्या प्रसंगानुरूप घटना या इतिहासाची पुस्तके वाचल्यावर या घटना वाचल्यावर वाचकाच्या समोर ह्या काव्याच्या माध्यमाने चित्र उभे रहाते यातूनच कवीची यशस्वी कारकीर्द चे दर्शन घडते. काव्यात आलेल्या उल्लेखावरून श्रीवर्धन भट चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण यांचाही समावेश विचार ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरू शकतो. चाळीसाव्या दिवशी सवाई माधवराव पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे देण्यात आली होती या ऐतिहासिक प्रसंगाची पुष्टी या काव्यातून प्राप्त होतेप्रत्येक घटना ही ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे .. नारायणराव पेशवे यांचा खून झाल्या प्रसंगी गंगाबाई ही गरोदर होती.या घटनेची नोंद या काव्यातून प्राप्त होते.सवाई माधवराव पेशवे यांना नाना फडणवीस यांचा सल्ला अतिशय उपयुक्त आहे हे ऐतिहासिक घटनांची माहिती देणारे आहेत.कवि गोविंद पंडित यांच्यावर कालिदास यांचा प्रभाव दिसून येतो.तसेच कविकालिदास यांचा काळखंड नाव , ठिकाण ठरविण्यात मतमतांतरे आहेत तसेच या काव्याच्या रचयिता गोविंद पंडित यांच्याविषयी ठोस माहिती उपलब्ध नाही.

उपसंहार:-

प्रस्तुत प्रभुवंशम् हस्तलिखित हा शोधनिबंधाचा विषय आहे.

या हस्तलिखिताच्या सहाय्याने अभ्यासाकरिता नवी दिशा मिळते.

हस्तलिखितातील विषय हा ऐतिहासिक असून या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक तथ्य मांडण्याकरिता या हस्तलिखिताचा उपयोग महत्त्वपूर्ण ठरतोप्राचीन परंपरा चे विधीचे ज्ञान होते काव्याच्या स्वरूपात सांस्कृतिक . बाबींचा सुद्धा विचार करता येतो. ऐतिहासिक घटनांचा चा आढावा या काव्यातून दिसून येतो. अशाप्रकारे या प्राचीन काव्यातून ऐतिहासिक पुरुषाचे जन्म मुंज विवाहाचे वर्णन काव्यात्मक स्वरूपात पाहायला मिळते.

संक्षेप सूची:-

प्र.हा .का .- प्रभुवंशम् काव्यम् हस्तलिखित

प्रत १-प्रभुवंशम् काव्यम् आनंदाश्रम पुणे६८४./३१.

प्रत२प्रभुवं-शकाव्यम् गोविंद पंडित विरचित मुंबई विद्यापीठ २१९५

संदर्भ ग्रंथ सूची:-

१क्र.द,प्रभुवंशम् हस्तलिखित(.३१.६८४, आनंदाश्रमपुणे,

२प्रभुवंशम् हस्तलिखित (, मुंबई विद्यापीठ २१९५(सर्ग)

३प्रभुवंशम् टंकित ग्रंथ (, भारत इतिहास संशोधन मंडळ,पूणे.

४सरदेसाई गोविंद (, पेशवा इतिहास, बाम्बे प्रकाशन१९९१,.

५सरदेसाई गोविंद (, सवाई माधवराव पेशवे, दाते प्रकाशन, १९९०

६रा.कुलकर्णी अ (. पुण्याचे पेशवे, आमार्च१९९९..

७न.केळकर य (. काही अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे आस १९६७.

८साने का (. ना१९२५.आ स,पेशव्यांची बखर ..

९स.सरदेसाई गो (.मराठी रियासत विभाग भाग ६,आस..१७९५.

१०ओक प्रमोद (, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, आ२००१..

११श ,पुराणिक (. प्रथम बाजीराव ,मुकुंद शंकर दाते१९९९.पुणे आ ,काळे प्रकाशन ,.

१२ खरे(,वावा.. ऐतिहासिक लेखसंग्रह,भाग १ते५.

१३इतिहास संशोधन पत्रिका (,अंक१सन १९८९-९०.

१४इतिहास आणि संस्कृती (, त्रेमासिक ,एप्रिल ते सप्टेंबर१९८७ ,

१५ब.या ,वाड(.ग चिसवाई माधवराव पेशवे रोजनिशी ४ .,आस..१९०८.

१६पुणे ,प्रभुवंश एक अध्ययन,रानडे उषा(.

१७इतिहास अभ्यासपत्रिका क्रमांक १ (.

१८१८१८) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (-१९२०(

१९वा.भावे(.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र.पुणे.१९९८.

२०सरदेसाई (.जी.एस, मराठी रियासतपा ॅप्युलर प्रकाशन मुंबई ,.

****

‘ग्रामज्योति:’ या कथासंग्रहातील तत्कालीन सामाजिक परिस्थिती

- सौ. सुवर्णा संजयकुमार केवटे,
प्रो.कविता होले

प्रस्तावना –

प्राचीन काळापासून संस्कृत भाषेत कथासाहित्याचे दालन उघडलेले आहे. वैदिक काळात ज्याप्रमाणे घोषा, अपाला यासारख्या अनेक ब्रह्मवादिनींचा नामोल्लेख होत होता. त्याचप्रमाणे आधुनिक काळात विसाव्या शतकात सुद्धा स्त्रियांचा वारसा संस्कृत साहित्याच्या क्षेत्रात दिसून येतो. उदा. नलिनी शुक्ला, पं. क्षमादेवीराव यांचे नावं प्रामुख्याने घेतली जाते. पं. क्षमादेवीराव यांनी कथासाहित्यात फार मोलाची कामगिरी केली आहे. त्यांनी प्रथम इंग्रजी भाषेत अनेक कथा लिहिल्या. नंतर सरळ भावाभिव्यक्ती होईल अशा संस्कृत भाषेत त्यांचा अनुवादही केला. गुजराती, फ्रेंच, इटालियन, इंग्रजी, मराठी, संस्कृत इ. भाषेचे ज्ञान असल्यामुळे पं. क्षमादेवींना ‘बहुभाषाकोविद्’ म्हणून ओळखले जात होते. पं. क्षमादेवीराव यांचे महाकाव्ये, खंडकाव्य आणि लघुकथासंग्रह मिळून संपूर्ण बारा साहित्यकृती प्रसिद्ध आहेत. त्यापैकी प्रस्तुत शोधनिबंधात तीन लघुकथासंग्रहापैकी ‘ग्रामज्योति:’ या लघुकथासंग्रहातील तत्कालीन सामाजिक परिस्थिती या विषयावर प्रस्तुत शोधनिबंधात प्रकाश टाकणार आहे.

‘एडगर एलन पो’ यांना आधुनिक लघुकथेचे जनक मानले आहे. आधुनिक कथातंत्रानुसार त्यांनी सर्वप्रथम १८३२ मध्ये लघुकथा लिहिली आणि ‘Staturday courier’ या मासिकातून प्रसिद्ध झाली. लघुकथेला इंग्रजीत ‘Short Story’ म्हणतात.

लघुकथेची व्याख्या –

आधुनिक काळात संस्कृत साहित्यात ‘लघुकथा’ स्वतंत्र वाङ्ग्यप्रकार म्हणून ओळखला जातो. आधुनिक तंत्राचा वापर करून आधुनिक विषयांवर संस्कृत भाषेत लघुकथा लेखनामध्ये सर्वप्रथम पं. क्षमादेवीराव यांचे नाव घेतले जाते.

“कमीतकमी पात्र आणि कमीतकमी प्रसंग वापरून थोड्यावेळात परिणामकारकरीतीने सांगितलेली आणि ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीगत म्हणजे लघुकथा होय.”[१]

साहित्यशास्त्रामध्ये कथा पद्यात्मक आणि गद्यात्मक दोन्ही स्वरूपात असू शकते असे ‘हेमचंद्र’ आचार्यांनी त्यांच्या ‘काव्यानुशासन’ या शास्त्रग्रंथात म्हटले आहे.

उदा. “धीरप्रशान्तनायका गद्येन पद्येन वा सर्वभाषा कथा ।”[२]

पं. क्षमादेवीराव यांचा परिचय -

पं. क्षमादेवीराव यांचा जन्म ४ जुलै १८९० मध्ये महाराष्ट्रातील पुणे येथे झाला. त्यांच्या पित्याचे नाव शंकर पांडुरंग पंडित होते. सर्वप्रथम पित्यापासूनच त्यांना संस्कृतचे ज्ञान प्राप्त झाले कारण ते संस्कृतचे प्रगाढ

पंडित होते. पैतृकधनरूपाने प्राप्त झालेल्या संस्कृत ज्ञानाला त्यांनी पुढे नेले. संस्कृत भाषेत त्यांनी अनेक साहित्यरचना केल्या. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहे.

१. सत्याग्रहगीता
२. उत्तरसत्याग्रहगीता
३. स्वराज्यविजय:
४. शङ्करजीवनाख्यानम्
५. मीरालहरी
६. श्रीतुकारामचरितम्
७. श्रीरामदासचरितम्
८. श्रीज्ञानेश्वरचरितम्
९. कथापञ्चकम्
१०. ग्रामज्योति:
११. कथामुक्तावली
१२. विचित्रपरिषद्यात्रा

पं. क्षमादेवीराव यांच्या वरील ग्रंथापैकी 'ग्रामज्योति:' या लघुकथासंग्रहाचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे.

उद्दिष्टे –प्रस्तुत विषयाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. 'ग्रामज्योति:' या लघुकथासंग्रहातील तत्कालीन परिस्थिती अभ्यासणे.
२. स्वांतत्र्यसंग्रामात स्त्रियांचे योगदान यावर प्रकाश टाकणे.
३. तत्कालीन काळात स्त्रियांची परिस्थिती कशी होती याचा अभ्यास करणे.
४. ब्रिटिशांनी भारतीयांवर केलेले अत्याचार आणि स्वतंत्रतेसाठी भारतीय पुरुषांबरोबर स्त्रियांनी केलेले कार्य यावर प्रकाश टाकणे.

शोधपद्धती –

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विश्लेषणात्मक शोधपद्धतीचा अवलंब केला आहे.

'ग्रामज्योति:' लघुकथासंग्रहातील कथांचा संक्षिप्त परिचय –

'ग्रामज्योति:' हा लघुकथासंग्रह पं. क्षमादेवीराव यांनी इ.स. १९३० मध्ये लिहिला. क्षमाराव यांच्या निधनानंतर त्यांची मुलगी 'लीलाराव दयाल' हिने इ.स. १९५४ मध्ये हा कथासंग्रह प्रकाशित केला. हा पद्यकथासंग्रह असून यात तीन कथा आहेत. त्यांची नावं खालीलप्रमाणे आहेत.

१. 'रेवाया: कथा' - प्रथम मयूख
२. 'कटुविपाक:' - द्वितीय मयूख
३. 'वीरभा' - तृतीय मयूख

वरील तीन कथा अनुक्रमे प्रथम मयूख, द्वितीय मयूख आणि तृतीय मयूख अशा तीन मयूखांमध्ये विभक्त आहेत. तीनही कथेच्या सुरुवातीला कथेतील वर्णनाला अनुरूप सुभाषिते लिहिली आहेत. या तीनही कथा अनुष्टुभ् छंदात लिहिलेल्या आहेत. कवयित्री

महात्मा गांधींबरोबर गुजरात भ्रमणासाठी गेल्या असतांना तिथल्या ग्रामीण लोकांची अवस्था पाहून त्यांनी 'ग्रामज्योति:' या पद्यात्मक कथासंग्रहाची रचना केली. या तीनही कथा स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या त्याग आणि आत्मबलिदान यांच्याशी सबंधित आहेत.[३] गुजरातमधील खेड्यात घडलेल्या घटना, समाजातील लोकांची सामाजिक परिस्थिती आणि सत्य घटनांवर आधारित या कथा आहेत. 'सत्याग्रहगीता' या महाकाव्याचा प्रभाव 'ग्रामज्योति:' या कथासंग्रहातील कथांवर दिसून येतो. सत्याग्रह आंदोलनात गावातील स्त्रिया सुद्धा सहभागी होत्या. आंदोलनातील नेत्यांनी पं. क्षमादेवींना 'बोर्सद' नावाच्या गावातील देशसेविकांवर झालेले अत्याचार आणि तेथील वतर्मान परिस्थिती पाहण्यासाठी पाठविले होते.[४] क्षमादेवी सत्याग्रहगीतेच्या सतराव्या अध्यायात म्हणतात –

"पर्याटिषं प्रतिग्रामं सह पत्न्या महात्मन: |
पांसुदूषितमार्गेण गाढदुर्भिक्षशंसिना ||"[५]

पं. क्षमादेवी कस्तुरबा गांधींबरोबर गावा-गावात फिरतात. आंदोलनात जखमी झालेल्या स्त्रियांना भेटतात आणि त्यांच्या शिबिरांमध्ये जातात. तिथे पाहिलेल्या सत्यघटनांचे वर्णन 'ग्रामज्योति:' या पद्यकथासंग्रहात केलेले आहे.

'ग्रामज्योति:' या पद्यकथासंग्रहातील प्रथम मयूख 'रेवाया: कथा' आहे. 'देशाभ्युदयसक्तानां तृणाय धनसम्पद: |' हे या कथेचे ध्येयवाक्य आहे. देशाच्या उन्नतीसाठी काम करणाऱ्या लोकांची धनसंपत्ती गवताप्रमाणे आहे असा तात्पर्यार्थ आहे. या कथेत १९२ पद्य आहेत.[६]

'बार्दोली' नावाच्या जनपदात 'स्वर्णपुर' नावाच्या गावात घडलेली घटना आहे. तिथे 'रेवा' नावाची एक शेतकरी कुटुंबीनी दोन मुलांना घेऊन राहते. ब्रिटीश लोक गावातील सावकारांद्वारा सर्व लोकांकडून कर वसुली करतात. गावकरी कर देण्यास नकार देऊन गाव सोडून जातात. परंतु 'रेवा' व्याधिने पिडीत असल्यामुळे ती गाव सोडून जाण्यास असमर्थ असते. त्याचबरोबर ती स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी असते. रेवाचा मुलगा आंदोलनात सहभागी असतो म्हणून इंग्रज शासक त्याला कारागृहात बंदी करतात. तेव्हा रेवा घरातील वस्तू, धन-धान्य सेवकांना देते आणि विदेशी वस्तू नष्ट करते. नंतर देवाऱ्यात दिवा लावते. तेवढ्यात तिला पायांचा आवाज येतो. गावातील ग्रामप्रमुख कर मागण्यासाठी येतो आणि म्हणतो –

"वरं ते भूकरं दत्त्वा स्थितिरत्रैव मन्दिरे |"[७]
"भद्रे शासनभङ्गेन न कदापि भवेत् सुखम् |"[८]

त्यावर रेवा त्याला भूकर देण्यास नकार देऊन उत्तर देते की, जोपर्यंत विजय प्राप्त होत नाही तोपर्यंत आम्ही सत्य परिस्थितीनुसार आमच्या निर्णयावर स्थिर आहोत. तेवढ्यात एक युवक तिला येऊन सांगतो की, तुझ्या पुत्राने भूकरदान न दिल्याने त्याला खुप मारले आहे. तेव्हा ती घराला कुलुप लावून जखमी मुलाला घरी आणायला जाते. त्याला घरी आणण्यापूर्वीच तिच्या घराला आग लावतात. तरी ती मागे पुढे न पाहता आग विझविण्याचा प्रयत्न करते पण आग सर्वत्र पसरून घर पूर्णपणे जळले आहे असे तिला तिचे शेजारी म्हणतात. तरी हताश न होता ती म्हणते –

"सर्वं यातु सखे शोको न कार्य: सेयमाहुति: |
कल्पिता सत्यदेवाय प्रेयो: न: स हि दास्यति |"[९]

शेवटी ती जखमी मुलाला तिच्या सेवकाच्या घरी नेण्याचा निर्णय घेते.

'ग्रामज्योति:' कथासंग्रहातील द्वितीय मयूख 'कटुविपाक:' आहे. 'परसेवी निजद्वेषी कुलमृत्युर्न संशय: |' या आदर्शवाक्याने दुसऱ्या कथेची सुरूवात आहे. अर्थात् 'दुसऱ्याची सेवा करणारा आणि आपल्या लोकांशी द्वेष करणारा कुळासाठी मृत्यूच आहे.' ह्या कथेत २०० पद्य अनुष्टुभ् छंदात लिहिलेले आहेत.[१०]

'कटुविपाक:' या कथेत 'जालाल' प्रदेशातील 'मणिपुर' नामक गावातील ग्रामप्रमुखाच्या पत्नीची कथा वर्णन केली आहे. ती देशभक्त परायण आहे. तिची मुलगी आणि मुलगा सुद्धा ग्रामप्रमुखापासून लपून देशकार्य आणि देशसेवा करतात. ग्रामप्रमुख हा इंग्रजांचा सेवक होता. म्हणून त्याला सोडून त्याच्या घरातील सर्वजण सत्याग्रह परायण आणि देशभक्त असतात. गावातील लोक त्याच्या विरोधात असतात. गावात एक तालवृक्षाचे वन असते. त्या वनातील वृक्षापासून एक युवक मद्यनिर्माण करतो आणि त्यापासून धन प्राप्त करतो. त्या मद्यसेवनाने भरपूर ग्रामवासी मृत्यूमुखी पडतात म्हणून –

"इति सञ्चिन्त्य धीमन्त: केचित् स्वार्थपराङ्मुखा: |
सर्वशश्छेदयामासु: स्वकांस्तालीमहीरुहान् ||"[११]

परंतु ग्रामप्रमुख वन कापण्यास मनाई करतो. भूकरदान दिले नाही म्हणून त्या गावातील शेतकरी स्थलांतर करतात तेव्हा तिथले वातावरण निर्जन झाले आहे -

"न पूमान् न च नारी भवति स्माक्षिगोचर: ||
चाण्डालकुक्कुरा ये च व्यलम्बन्तान्नकाङ्क्षिण: |"[१२]

त्याची मुलगी शिबिरातील देशसेविकांचे वस्त्रसंचय करून त्यांना नेऊन देण्याचे कार्य करते.मुलाने इंग्रज शासनाविरुद्ध लेख प्रकाशित केला म्हणून त्याला शिक्षा करण्यासाठी इंग्रज अधिकारी पकडतात. त्याला एक वर्षाचा कारावास आणि दोनशे रुपये दण्ड देतात. तेवढ्यात तालवन कापल्याची वार्ता कोणीतरी येऊन सांगतो तेव्हा सरपंच क्रोधाने दण्ड घेऊन मारण्यासाठी जातो. त्यांना मारून आणि बंदी बनवून घरी येतो. तो पत्नीला सांगतो की-

"ग्रामणी: पुनरेवाह महिलाशिबिरं प्रति |
दीयतेऽद्याभ्यवस्कन्दस्तत्र नैकापि गण्यते ||"[१३]

तो मुलीबद्दल विचारतो, ती देशसेविकांचे कपडे घेऊन गेलेली असते. परंतु मद्यविक्री थांबविण्याऱ्या महिलांना इंग्रज अधिकाऱ्याने लाठीने मारले. त्यात तुमची मुलगी जखमी झाली. तिचे डोके फुटलेले आहे. सत्याग्रह अनुयायांनी तिला दवाखान्यात नेले. परंतु तिला रात्र काढणे सुद्धा कठीण आहे असे एक युवक येऊन सांगतो. हे ऐकून सरपंच पत्नी रडायला लागते आणि जमिनीवर पडते. तेव्हा सरपंचही विस्मित होऊन पत्नीला रागावतो. तो म्हणतो –

'ब्रूहि कस्यानुमत्या वा सुता मम बहिर्गता |'[१४]

सत्याग्रहपरायण असलेल्या देशसेविकांना उद्देशून रागावून बोलतो तेवढ्यात दुरूनच देशसेविकांचा हाहाकार ध्वनि ऐकू येतो.

'ग्रामज्योति:' या लघुकथासंग्रहातील तृतीय मयूख 'वीरभा' आहे. या कथेच्या सुरूवातीला 'दुर्जनोऽपि सतां सङ्गात् भवत्येव हि सज्जन: |' हे ध्येयवाक्य दिलेले आहे. याचा अर्थ 'दुर्जन लोकं सुद्धा सज्जनांच्या संगतीने सज्जन बनतात.'[१५] या तिसऱ्या कथेत 'वीरभा' ह्या स्त्रीचे वर्णन २१२ पद्यात केलेले आहे.

'वीरभा' नावाची स्त्री या कथेची नायिका आहे. ती अतिशय साहसी, बलवान, निर्भयी आणि धैर्यशील आहे. ती 'बोर्सद' गावात राहत होती. ती ब्रिटीशांच्या अत्याचाराने त्रासून त्यांना प्रतिकार कसा करायचा या विचारात मग्न होती. तिच्या घरात घुसलेल्या लुटेऱ्यांशी ती एकटीच लाठी युद्ध करते आणि त्यांना बाहेर काढण्यात यशस्वी होते. वरिभाचा मुलगा देशकार्य करतांना वीरगतीला प्राप्त होतो. त्याची पत्नी आधीच दिवंगत झालेली असते. मातृपितृहीन एक पौत्र असतो. त्याचा ती स्वत:च्या पुत्राप्रमाणे सांभाळ करते. ती महिला संघटना तयार करण्यासाठी गावा-गावातील स्त्रियांना प्रोत्साहित करते -

"यावन्न लभ्यतेऽस्माभि: स्वराज्यं चिरकाङ्क्षितम् ||
तावन्नैव प्रदास्याम: प्राणान्तेऽपि भुव: करम् |"[१६]

'स्त्रियांनी घरातील कार्य करावे, बाहेरील भांडणात पडू नये.' असे ग्रामप्रमुख म्हणतो. तेव्हा ती महात्मा गांधींनी दिलेल्या शिकवणीची आठवण करून देते -

"अहिंसासत्यरूपेण वयं बद्धा व्रतेन हि |
धर्मेकनिष्ठतां चापि शिक्षिता: स्मो महात्मना ||"[१७]

नंतर 'वीरभा' चतुष्पथावर येते आणि सर्व महिलांना आंदोलनाची रूपरेषा सांगून, त्यांना आदेश देऊन घरी परत जाते. तेव्हा पाहते तर -

'चोरितं गोधनं सर्वं शून्यीभूतं च गोष्ठकम् |'[१८]

एकीकडे तिच्या पतिने भूकरदान न दिल्यामुळे त्याला सैनिकांनी मारले. एक सैनिक शकटयानमध्ये तिच्या पतिला आणतो तो रक्ताने लिप्त झालेला असतो. तरीही ती स्वत:च्या कार्यात मागे सरकत नाही. ती पतिला दूध देऊन, पौत्राला खांद्यावर बांधून राष्ट्रध्वज घेऊन गावाच्या चतुष्पथावर पोहोचते. महिला यात्रेचे नेतृत्व करीत ती महिलांची यात्रा काढते. 'वन्दे मातरम्' चा नारा सर्वत्र गुंजतो. सैनिकांचा लाठीप्रहार सुरू होतो. ती पौत्र आणि राष्ट्रध्वज दोघांचेही रक्षण करते आणि उंचस्वरात घोषणा देते - 'हे सखि ! प्राण गेला तरी ध्वजाचे सर्वत: रक्षण करा.' तेवढ्यात तिच्यावर लाठींचा प्रहार झाल्याने तिचा डावा खांदा शिथिल होते आणि ती मूर्च्छित होऊन जमिनीवर पडते. तेव्हा तिला काही लोकं घरी पोहोचवितात. जेव्हा तिला चेतना येते तेव्हा ती दुपारचा वृतांत आठवून विलाप करते. तर तिचे पती तिचे सांत्वन करतात.

वीरभाची आंदोलनातील एकनिष्ठता पाहून एका सैनिकाचे हृदयपरिवर्तन होऊन तो तिच्या पौत्राचे रक्षण करतो. त्याला घरी पोहोचवितो आणि म्हणतो –

"ध्वजरक्षापरिव्यग्रां तदा चिन्ताकुलोऽभवम् ||
ततच्छिन्ना मया रज्जु: शिशुकन्थावलम्बिनी |
स्कन्धात्त्वदीय भार्याया अपनीतश्च बालक: |"[१९]

तो सेवक हिंसा कार्य सोडतो. असे म्हणून अश्रुपात करून वीरभाला नमस्कार करून निघून जातो.

'ग्रामज्योति:' या लघुकथासंग्रहातील तत्कालीन सामाजिक परिस्थिती –

'ग्रामज्योति:' या लघुकथासंग्रहातील पहिल्या कथेतील तत्कालीन सामाजिक परिस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

'रेवाया: कथा' यात रेवा देशाच्या उन्नतीसाठी कार्य करतांना स्वत:च्या संपत्तीचाही विचार करीत नाही. इंग्रजाना भूकर दान देण्यास नकार देते म्हणून त्यांनी तिचे घर जाळले तरी सुद्धा ती शोक व्यक्त करीत नाही. ती कट्टर देशभक्त स्त्री आहे. स्वतःच्या देशाबद्दल तिच्या मनात प्रेम आहे म्हणून ती कितीही संकट आले तरी मागे सरत नाही. ती सामान्य स्त्री असून सुद्धा ग्रामप्रमुखाला प्रत्यूत्तर द्यायला घाबरत नाही.

तत्कालीन समाजात लोकांवर अत्याचार केले जात होते. इंग्रज अधिकारी गावाच्या ग्रामप्रमुखाद्वारे गावातील लोकांकडून कर वसुल करीत होते. परंतु लोकं कर देण्यास नकार देतात तेव्हा त्यांना दंड देत होते. म्हणून जनता गावसोडून जाते. रेवा ही व्याधिग्रस्त असते म्हणून ती गावसोडून जाऊ शकत नाही. तरी ती ठामपणे उत्तर देते –

"जयप्राप्तिर्न यावत् स्थाद्युद्धेऽस्मिन् सत्यजीविते |
स्थास्याम: सर्वदा भद्र निश्चला अचला इव ||"[२०]

लोकमान्य टिळकांच्या उक्तीचाही याठिकाणी प्रयोग केलेला आहे. यावरून 'रेवा' सुद्धा म्हणते - 'स्वातंत्र्य हा देहांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. त्याला प्राप्त करून आम्ही डोके वर करू.' यातून देशाबद्दलची प्रेम भावना दिसून येते.

तिच्या घराला आग लावतात तेव्हा ती म्हणते की, 'सत्यदेवाला अर्पण केलेली आहुती आहे, नीरांजन आहे.' यावरून कोणतेही संकट आले तरी मागे सरायचे नाही. अशा दृढनिश्चयी रेवासारख्या स्त्रिया तत्कालीन समाजात होत्या.

'कटुविपाक:' या दुसऱ्या कथेतील तत्कालीन सामाजिक परिस्थिती खालीलप्रमाणे आहे.

या कथेत नायिकेचे आणि इतर कुठल्याही पात्रांची नावं दिलेली नाही. ग्रामप्रमुखाची पत्नी, मुलगा आणि मुलगी हे तिघेही देशसेवेचे कार्य करतात. परंतु ग्रामप्रमुख त्यांना विरोध करतो तरी सुद्धा त्याच्यापासून लपवून ते देशकार्य करतात. पुत्राला तर तो देशभक्त आहे म्हणून घराबाहेर काढतो. मुलगी शिबिरामधील देशसेविकांचे कपडे धुवून देण्याचे कार्य करते आणि पत्नी मद्यविक्री थांबविण्याचे कार्य करते. परंतु ग्रामप्रमुख इंग्रजांचा सेवक असल्यामुळे त्याला हे कार्य केलेले आवडत नाही.

तत्कालीन समाजात वृक्षापासून मद्य निर्माण करण्याचे कार्य जनता करीत होती. परंतु त्या तालवृक्षापासून बनविलेल्या मद्याने अनेक लोकांचा मृत्यू होतो. म्हणून देशसेविका मद्यविक्री थांबविण्याचे कार्य करतात. त्यात ग्रामप्रमुखाची पत्नी सुद्धा असते. छापा पडणे अशासारखे कृत्य देखील तत्कालीन समाजात होत होते.

ग्रामप्रमुखाची मुलगी देशसेविकांसोबत मद्यविक्रीसाठी विरोध करीत असतांना दण्डप्रहाराने जखमी होते. तेव्हा ग्रामप्रमुखाची पत्नी दु:खी होते. तत्कालीन समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रिया पुरुषांच्या विरोधात कोणतेही कार्य करण्यास घाबरत होत्या. कारण त्या स्वतंत्र्य नव्हत्या. तरी सुद्धा आलेल्या परिस्थितीला सामोरे जाऊन तोंड देण्याची जिद्द त्यांच्यात होती.

काही देशसेवक तालवृक्षाचे वन कापतात तेव्हा ग्रामप्रमुख त्यांना पशुप्रमाणे मारतो आणि बंदी बनवितो. यावरून गावामध्ये ग्रामप्रमुखाची हुकुमशाही चालत होती असे दिसते.

'वीरभा' या तिसऱ्या कथेतील तत्कालीन सामाजिक परिस्थिती खालीलप्रमाणे आहे

'वीरभा' ही या कथेची नायिका आहे. ती देशभक्त परायण आहे. गावा-गावात फिरून स्त्रियांची संघटना तयार करते आणि तत्कालीन स्त्रियांना ब्रिटीशांच्या अत्याचारांसोबत सामना करण्यास प्रोत्साहित करते. या कथेत वीरभाचे स्थान शत्रूसाठी दामिनीप्रमाणे, पौत्रासाठी मातेप्रमाणे आणि ग्रामवासी योषितांसाठी सखीप्रमाणे आहे कारण ती अतिशय बलवान आणि धैर्यशील आहे. स्वातंत्र्याच्या संग्रामात वीरभा स्त्री सैन्याचे नेतृत्व करीत देशासाठी स्वत:चे प्राण द्यायला सुद्धा मागेपुढे पाहत नाही.

तत्कालीन समाजात ब्रिटीश लोकांचा पगडा असल्यामुळे विदेशी वस्तुंची ने-आण करीत असतांना वीरभाचा मुलगा त्यांना अडवितो तेव्हा ब्रिटीश लोकं त्याच्या शरीरावर गाडी नेऊन त्याला मारतात. भूकर न दिल्यामुळे तिचे गोधन चोरी करतात तिच्या पतीला मारतात. तरीसुद्धा वीरभा स्वत:च्या पोत्राला पाठीवर बांधून देशासाठी लढण्यास तयार होते. लाठीप्रहार झेलत राष्ट्रध्वजाचे रक्षण करते. गावा-गावातील स्त्रियांना स्वातंत्र्यसंग्रामात लढण्यासाठी प्रोत्साहित करते.

वीरभा स्त्रियांनाच नाही तर देशबांधवांना सुद्धा उपदेश करते की, 'कितीही संकटे आली तरी स्वत:चे धैर्य सोडू नका.' अशाप्रकारे ती ब्रिटिशांच्या अत्याचारावर मात करून भारतीयांना स्वत:च्या देशाचे राष्ट्रध्वजाचे आणि स्वत:च्या परिवाराचे रक्षण करण्याची शिकवण देते. तत्कालीन समाजातील स्त्रिया स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता देशासाठी लढत होत्या. यातून त्यांची जिद्द, एकनिष्ठता आणि दृढनिश्चयी भावना दिसून येते.

तिची देशाबद्दलची निष्ठा पाहून इंग्रजांचा सेवक सुद्धा हिंसाकार्य करणे सोडते आणि तिच्या पुत्राचे रक्षण करून त्याला सुखरूप घरी पोहचवितो. यावरून ब्रिटिशांमध्ये काही सैनिक सहानुभूती दाखविणारे होते. भारतीयांची देशभावना पाहून त्यांचे मतपरिवर्तन होते.

अशाप्रकारे 'ग्रामज्योति:' या पद्यकथासंग्रहातील तीनही कथेत स्वातंत्र्य संग्रामात भारतीय स्त्रियांचा वाटा भरपूर मोठा आहे. हे दिसून येते. तत्कालीन समाजातील परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. कारण गावातील ग्रामप्रमुख इंग्रजाचे सेवक होते. भूकर न दिल्यामुळे आपल्याच लोकांना त्रास देते होते. त्यांची घरे जाळणे, गाई चोरणे, बंदी बनविणे असे कार्य करीत होते. इंग्रजांनी भारतीयांना गुलाम बनविले होते. त्यांच्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या कठपुतल्या बनविल्या होत्या. परंतु तरीही भारतीयांनी विशेष करून स्त्रियांनी येईल त्या संकटांना समोर जाऊन आपले धैर्य सोडले नाही. स्वत:च्या देशाचे आणि राष्ट्रध्वजाचे रक्षण करण्यास यशस्वी झाले.

तीनही कथेतील सुभाषिते कथेतील वर्णनाला अनुसरून यथार्थ. पं. क्षमादेवींनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे वर्णन करतांना प्रसाद गुणांनी युक्त वैदर्भी रीतीचा उपयोग केला आहे. अत्यंत सोप्या भाषेत युद्धपूर्ण वातावरणाचे हुबेहूब डोळ्यासमोर उभे राहणारे वीर रसाचे परिपूर्ण वर्णन केले आहे.

पं. क्षमादेवीराव यांनी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेल्या सत्य घटनांचे विश्लेषण तीनही कथेत केले आहे. यावरून कवयित्रीचे रचना कौशल्य दिसून येते. या कथेतून जीवनातील सत्य अनुभव सांगणारे सुभाषितांचा वापर केलेला आहे.

उदा. **'मुखद्वेषकृते नासाच्छेदनं नहि युज्यते।'**[२१]

'सुजात: को नरो मृष्येदपमानं सुयोषितम्।'[२२]

'तेनैव हि कृता शय्या शेतां तदुपरि स्वयम्।'[२३]

अशासारख्या सूक्तींचे वर्णन केले आहे. यावरून कवयित्रीचे अफाट शब्दभांडार दिसून येते.

निष्कर्ष –

वरील सर्व विश्लेषणातून तत्कालीन सामाजिक परिस्थिती डोळ्यासमोर उभी राहते. तत्कालीन समाजातील स्त्रियांची स्वातंत्र्यासाठी झालेल्या आंदोलनात महत्त्वपूर्ण सक्रिय सहभाग दिसून येतो. स्त्रियांची त्या काळातील दु:खी अवस्था वांचकांच्या डोळ्यासमोर येते. ब्रिटीशांनी भारतीयांवर केलेले अत्याचार आणि स्वतंत्रता संग्रामात समाजातील पुरुषाबरोबर स्त्रियांनी स्वत:च्या जीवाची आणि संपत्तीची पर्वा न करता देशासाठी लढा दिला आणि यशस्वी झाल्या यातून भारतीय स्त्रियांची देशाबद्दलची सद्भावना दिसून येते.

संदर्भसूची –

१. कथामुक्तावली - पृ. क्र. - ३
२. काव्यानुशासन - पृ. क्र. - ८
३. मीरालहरी का काव्यशास्त्रीय अध्ययन - पृ. क्र. - २३
४. क्षमादेवीराव (भारतीय साहित्य के निर्माता) - पृ. क्र. - ३८
५. सत्याग्रहगीता - पृ. क्र. - १२५, अध्याय - १७, श्लोक - ४७
६. क्षमादेवीराव (भारतीय साहित्य के निर्माता) - पृ. क्र. - ५३
७. ग्रामज्योति: - पृ. क्र. - ८, श्लोक - ८०
८. कित्ता - पृ. क्र. - ८, श्लोक - ८३
९. कित्ता - पृ. क्र. - १८, श्लोक - १८८
१०. क्षमादेवीराव (भारतीय साहित्य के निर्माता) - पृ. क्र. - ५३
११. ग्रामज्योति: - पृ. क्र. - २०, श्लोक - १४
१२. कित्ता - पृ. क्र. - २२, श्लोक - ३५
१३. कित्ता - पृ. क्र. - ३२, श्लोक - १४०
१४. कित्ता - पृ. क्र. - ३६, श्लोक - १८६
१५. क्षमादेवीराव (भारतीय साहित्य के निर्माता) - पृ.क्र. – ५३
१६. ग्रामज्योति: - पृ. क्र. - ४२, श्लोक – ४१
१७. कित्ता - पृ. क्र. - ४२, श्लोक - ४६
१८. कित्ता - पृ. क्र. - ४३, श्लोक - ८३
१९. कित्ता - पृ. क्र. - ५५, श्लोक - १९३, १९४
२०. कित्ता - पृ. क्र. - ०९, श्लोक - ९४
२१. कित्ता - पृ. क्र. - १०, श्लोक - १०२
२२. कित्ता - पृ. क्र. - ११, श्लोक - ११०
२३. कित्ता - पृ. क्र. - ३४, श्लोक - १६२

संदर्भग्रंथसूची –

१. सत्याग्रहगीता - पं. सौ. क्षमा राव
न. मा. त्रिपाठी प्रा. लि., मुम्बापुरी
तृतीयावृत्ति: - १९५७

२. क्षमादेवीराव (भारतीय साहित्य के निर्माता)
डॉ. राधावल्लभ त्रिपाठी

३. कथामुक्तावली - पण्डिता सौ. क्षमा राव
प्रकाशक - न. मा. त्रिपाठी लि., प्रिन्सेस स्ट्रीट, मुम्बापुरी २

४. ग्रामज्योति: - पं. सौ. क्षमा राव
प्रकाशक - व्ही. एन. चटर्जी, कलकत्ता,
प्रथमावृत्ति :- १९५४

५. मीरालहरी का काव्यशास्त्रीय अध्ययन - डॉ. रचना रस्तोगी
प्रकाशक - परिमल पब्लिकेशन, दिल्ली
प्रथम संस्करण - २०१५

६. काव्यानुशासन – हेमचंद्र
निर्णयसागर प्रेस, मुंबई - १९३४

****

भक्ष्याभक्ष्यविवेचन ।

सौ. भारती विजय कोळेकर
प्रो.नन्दा पुरी

प्रस्तावना -

पुरातन भारतीय पारंपारिक संकल्पनांमध्ये मानण्यात आलेल्या धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी मोक्ष हे अन्तिम वास्तव आहे आणि तेच सर्वांचे मुख्य ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्यात **धर्म** ही प्राथमिक संकल्पना महत्त्वाची भूमिका वठविते. वेद, उपनिषदे, स्मृती - इतिहास - पुराणे यांसारख्या ग्रंथांतून समाजात धर्माचे महत्त्व विशद केलेले आहे. एकंदर पाहता धर्म या शब्दाचा अर्थ व्यापक आहे. धर्म या संकल्पनेतून समाजस्वास्थाच्या अनुषंगाने सामाजिकांचे आचार-विचार, धर्म-कर्म, नीति-सदाचार, कर्तव्याकर्तव्यादि विषयांचे प्रतिपादन करण्यात आले आहे. श्रीमद्भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे आपले शरीरव्यवहार सुरळीत सुरू राहाण्यासाठी प्रत्येक मानवाने शास्त्रविहित कर्तव्यकर्मे करत राहिले पाहिजे. कारण, सकल प्राणीमात्रांमध्ये मनुष्यास सर्वश्रेष्ठ प्राणी म्हटलेले आहे. समाजात राहणाऱ्या माणसांनी आपल्या धर्मशास्त्रांत वर्णित विधिनिषेधांना अनुसरून आपले आचरण ठेवणे अत्यन्त आवश्यक आहे. तदनुरूप आपल्या धर्मशास्त्रात जे विधिनिषेध स्पष्ट मांडले आहेत, तद्विषयी विचार करता स्मृतींचा एक आवश्यक विवेच्य भाग म्हणून **भक्ष्याभक्ष्य** हा विषय महत्त्वपूर्ण ठरतो.

प्रत्येक मानवाने आचरलेल्या शास्त्रविहित कर्मामुळे यज्ञ - जो आध्यात्मिक, आधिभौतिक तसेच आधिदैविक अशी त्रिविध संकटे दूर सारणारे व विश्वकल्याणकारक असे सदनुष्ठान आहे, तो घडतो, यज्ञामुळे पाऊस पडतो, पावसामुळे अन्ननिर्मिती होते आणि अन्नापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात.

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः।
यज्ञाद्भवति पर्जन्यः यज्ञः कर्मसमुद्भवः।। [i]

याअर्थी अन्न हे **कारण** व प्राणी हे **कार्य** मानणे भाग पडते. कारणाचा कार्यावर असावा तसा अन्नाचा शरीरवर आणि पर्यायाने मनावर प्रभाव पडतो. अन्न मनोमय असल्याचे वर्णन उपनिषदात[ii] आढळते, म्हणून अन्नाचा प्रभाव थेट मनावर पडतो, असे म्हणता येणे शक्य आहे. प्राणी जे अन्न सेवन करतात तदनुरूप सन्तती उत्पन्न होते. म्हणून आपल्या संततीच्या निरामय स्वास्थ्यासाठी व आपल्या मनाला रोगमुक्त आणि खंबीर ठेवण्यासाठी मानवाने सात्त्विक आहार सेवन करावा असा उपदेशही भगवद्गीतेतून देण्यात आलेला आहे.

खाद्यद्रव्यांची विभागणी सात्त्विक, राजसिक आणि तामसिक अशी त्रिधा करण्यात आली आहे. सात्त्विक आहारामुळे विचारप्रवृत्ती सात्त्विक बनते. सात्त्विक विचारप्रवृत्ती तनामनातील दोष समूळ नष्ट करते. प्राणी सात्त्विक, राजसिक आणि तामसिक अशा ज्या कोणत्या प्रकारचे अन्न भक्षण करतो तो त्या अन्नातील गुणांनी युक्त बनतो. सुमधुर, स्निग्ध, सरस अशा सात्त्विक शाकाहाराने मनुष्यास आयुर्बल, निरामयता, सत्त्वशीलता

प्राप्त होते. मसालेदार, झणझणीत, गरमगरम, आंबट-खारट असा आहार राजसिक आणि निरस, शिळा, विशेषगन्धयुक्त, वसा-मांसयुक्त अपवित्र आहार तामसिक असल्याचे मान्यही करण्यात आले आहे. अशुद्ध, तामसिक आहार सेवन केल्याने विकार निर्माण होतात. आहाराचा शरीराशी तसाच मनाशी, बुद्धीशी व भावनांशी देखील विशेष सम्बन्ध आहे. म्हणूनच आपण जे अन्न ग्रहण करतो, त्याबाबत हेतुपुरस्सर जागरूक असावयास हवे.

भक्ष्यान्नात ज्या कारणांनी दोष निर्माण झाल्याने भक्ष्यान्न अभक्ष्य ठरते, त्याविषयी भविष्यपुराणात अपरार्कांने उद्धृत केलेल्या -

जातिदुष्टं क्रियादुष्टं कालाश्रयविदूषितम् ।
संसर्गाश्रयदुष्टं च सहृल्लेखं स्वभावतः ।।

या वचनानुसार अन्नातील मूळ गुण, अन्न सिद्धतेची प्रक्रिया, वेळ-कालावधी, संमिश्र घटकांचा अन्नावर होणारा प्रभाव, अन्ननिर्माण होण्याच्या पूर्वापार सार्वकालिक परिस्थितींचा प्रभाव यांचा विचार करता जातिदुष्टं किंवा स्वभावदुष्ट, क्रियादुष्ट, कालाश्रयदुष्ट, संसर्गाश्रयदुष्ट, भावदुष्ट तसेच परिग्रहदुष्ट असेही अन्नदोषाचे प्रकार मानण्यात आले आहेत. स्वभावतःच उग्र-दूषित असणारे लसूण, कांदा इ. जातिदुष्ट; गायीचे दूध, शिळे, ग्रहणात शिजलेले, इ. कालदुष्ट; श्वान - मद्य - लसूण - कीट, कृमी यांनी सम्पृक्त असे संसर्गाने दूषित झालेले ते संसर्गाश्रयदुष्ट; रिक्तहस्त-परिवेषित, पतितचाण्डालादिदृष्ट असे क्रियादुष्ट; अनादराने, क्रुद्ध होऊन, वाईट बुद्धीने सिद्ध कलेले / दिलेले भावदुष्ट; पतिता, व्यभिचारिणी, वांझ आदिंचे अन्न परिग्रहदुष्ट असल्याचे अपरार्क, गौतम व वृद्धहारीत यांचे मानणे आहे.

मनुष्याचे पापकर्म त्याच्या अन्नात भाव, क्रिया, संसर्ग, दृष्टी, आचार, विचार, परिग्रहादींच्या रूपाने वसलेले असते. ज्याचे असे दूषित अन्न आपण खातो त्याचे पापच आपण भक्षण करतो.

कोणी, कोणाकडचे काय खावे किंवा काय खावू नये यांविषयीचे विशेष वर्णन आपल्याला स्मृति, पुराण, इतिहास ग्रन्थातून प्राप्त होते. यात प्रामुख्याने गौतम धर्मसूत्र, आपस्तम्ब धर्मसूत्र, वसिष्ठ धर्मसूत्र, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति आहेत. त्याचप्रमाणे महाभारतातील शान्तिपर्व, कूर्मपुराण, पद्मपुराण, पाराशरोपपुराण, स्मृतिचन्द्रिका, गृहस्थरत्नाकर, मदनपारिजात, स्मृतिमुक्ताफल इ. अनेक ग्रन्थांतूनही सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. या सर्व ग्रन्थांतील भक्ष्याभक्ष्य अन्नविषयक वर्णनाचे तात्पर्य सामान्यपणे सर्वसारखेच आहे. भक्ष्याभक्ष्य अन्नविषयक वर्णनाचा **व्यक्तिनिहाय विचार करायचा झाल्यास -**

ब्राह्मणासाठी शूद्राकडचे अन्न अभक्ष्य आहे.
नाद्याच्छूद्रस्य विप्रोऽन्नं मोहाद्वा यदि वान्यतः । [iii]

फासेपारधी, मद्यविक्रेता, अन्य भिन्न-भिन्न वस्तूंची निर्मिती करणारे निम्नस्तरीय मेहेनती कसबी कलाकार, चोर, नोकर, कैदी, रोगी, चिकित्सक, ढोंगी, नास्तिक, देवनिंदक, चाण्डाल, नपुंसक, संन्यासी, दारुडा, रुदन करणारा, विद्धलिंगी, परिवेत्ता - ज्याचा ज्येष्ठ भ्राता अविवाहित आहे असा विवाहित व्यक्ती, रजस्वला स्त्री, व्यभिचारिणी स्त्री, वांझ स्त्री, वेश्या, दोनदा विवाहित स्त्री वा तश्या स्त्रीचा पती, मातापित्याकडून ज्यांचा त्याग केला गेला आहे अशी संतती, वैश्य स्त्रीपासून उत्पन्न शूद्रपुत्र, शत्रू, बुरसा किंवा पारवसा, कंजूष, उष्टावळ खाणारा, शस्त्रजीवी, पातकी, सुवेर वा सूतक असणारी व्यक्ती, व्याज घेणारा या व्यक्तिविशेषांची **मानसिकता** ही त्यांच्या कर्मानुरूप त्यांच्या अन्नात वसते, त्यामुळे यांच्याकडचे अन्न अभक्ष्य असल्याचे सांगण्यात आले आहे.

रीतिनिहाय विचार करायचा झाल्यास -

तिरस्कृत अन्न, ज्या अन्नावर शिंकले आहे असे अन्न, जेवणाच्या पंक्तितून रागाने कोणी उठून गेलेल्या जेवणाच्या पंक्तितले अन्न, एखाद्याच्या तोडीच्या व्यक्तिला किंवा तुच्छ व्यक्तिला ज्यादा मानसम्मान देण्यात येतो त्याठिकाणचे अन्न, ज्या अन्नाविषयी काहीच माहिती नाही असे अन्न, रागाने दिलेले अन्न, संशयास्पद अन्न, गुरूद्वारा दिलेले संस्कारहीन अन्न, केस-कृमीयुक्त अन्न, पुनःसिद्ध अन्न, अयाचित अन्न अशा अन्नाची देव-घेव करणाऱ्यांच्या वागणूकीतील भाव, आचार-कर्मानुरूप त्यांच्या अन्नात वसतो, त्यामुळे असे अन्न अभक्ष्य असल्याचे सांगण्यात आले आहे.

प्राणीविशेषविचार करायचा झाल्यास -

ष्णं त्वैकशफं लघु।ुबाढम - - - - - - - - - - - - - -

शाखावातहरं साम्ललवणं जडताकरम् ।। [iv]

प्रकृतीने उष्णरक्त व त्वचादितील वातदोषनाशक असले तरी आंबटसर व ,बाहू ,हलके असून पाय , प्राण्यांचे दूध अपेय्य आहे ,जुळ्या बछड्यांना जन्माला घालणारी ,त्याचप्रमाणे थानातून दूध टपकत असलेली . गाभण असूनही दूध देणारी अशा गायीचे दूध, ऊंटणीचे दूध अपेय्य असते .

उष्ट्रीक्षीरमृगीक्षीरसन्धिनीक्षीरयमसूक्षीराणीति । [v]

ईषद्रूक्षोष्णलवणमौष्ट्रकं दीपनं लघु ।। [vi] - उंटणीचे दूध रूक्षत्वयुक्त, प्रकृतीने उष्ण, लवणरसयुक्त, अग्निदीपक व हलके असते जे सामान्यतः आढळणाऱ्या गायीच्या दूधाचे गुण त्यात नसल्याने मानवास अनुपयुक्त आहे.

धेनोश्चाऽनिर्दशायाः । [vii] - ज्या गायीचे वासरु मेले आहे तिचे दूध, त्याचप्रमाणे जंगली मादापशुचे दूध अपेय्य असल्याचे सांगण्यात आले आहे.

डुक्कर, ससा, सुसर, घोरपड, कासव, वानर वगळून पाच नखे असलेले प्राणी, जबड्यात वर-खाली दात असणारे घोडा इ. पशु, केसाळ पशु, अकेशी सर्पादि प्राणी; रोगीट पशु-पक्षी, कावळा, कंक, गिधाड, ससाणा, पाणपक्षी, लाल पाय व लाल चोच असलेले, पाळीव कोंबडा, बगळा, सारस, पाणकोंबडी, टिटवी, वटवाघुळ, घुबड, सुतारपक्षी, शकटविल, हंस, चक्रवाक हे पक्षी अभक्ष्य असल्याचे म्हटले आहे.

निचुदारुबकबलाकाशुकमद्गुटिट्टिभमास्थालनक्तंचराः अभक्ष्याः।। [viii]

भक्ष्याः प्रतुदविष्किरजालपादाः । [ix] - चोच व पाय या अवयवांचा वापर करून आपले भक्ष्य तोडून खाणारे व जाळीप्रमाणे पाय असलेले पक्षी,

मत्स्याश्चाविकृताः । [x] - अविकृताकृती असलेले मासे खाण्यास योग्य असल्याचेही सांगण्यात आले आहे.

क्रूरता, बीभत्सता, पशुत्व असे स्वाभाविक गुण ज्यांच्या अंगी आहेत त्या पशु-पक्ष्यांना अन्न म्हणून भक्षण केले तर त्यांच्या अंगची क्रूरता, बीभत्सता, पशुता मानवाच्या अंगी येईल आणि मानवसमाजही पशुवत् आचरण करेल.

परिस्थिती-स्थल-काल-विशेष विचार करायचा झाल्यास -

हिंस्र प्राण्याकडून मारला गेलेला पशु वा पक्षी जर त्यात दोष नसेल व ब्राह्मणवचनानुसार भोज्य असेल तर धुवून खाण्यास योग्य असल्याचे गौतमधर्मसूत्रात सांगण्यात आले आहे.

हवन करून झाल्यानंतर उरलेले अन्न भक्षण करण्यास योग्य असते. त्याचप्रमाणे पृथ्वी, पाणी, वृक्ष यांतून उत्पन्न झालेली भाजी, मूळे, फुले, फळे आणि त्या फळांपासून उत्पन्न झालेले तेल, वेळेवर तयार झालेली फुले, फळे व रताळ्यासारखे कंद सेवन करण्यास योग्य असल्याचे मनुस्मृतित सांगण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे दारु, मांस, भूछत्र, लसूण, कांदा, अळींबे, बेहडादि सेवन करण्यास अयोग्य असल्याचेही मनुस्मृतित सांगण्यात आले आहे.

अनर्चितं वृथामांसं केशकीटसमन्वितम् ।
शुक्तं पर्युषितोच्छिष्टं श्वस्पृष्टं पतितेक्षितम् ॥
उदक्यास्पृष्टसङ्घुष्टं पर्यायान्नं च वर्जयेत् ।
गोघ्रातं शकुनोच्छिष्टं पदा स्पृष्टं च कामतः ॥ [xi] सांगण्यात आले आहे कि, बेकार मांस, केस-कृमीयुक्त अन्न, अपमान करून दिलेले, स्वतःसाठी शिजवलेले, श्वानस्पृष्ट, गायीने वास घेतलेले, कोण्या एकासाठी बनवून दुसऱ्याला दिलेले, पक्ष्याने उष्टवलेले, जाणूनबुजून पायाने स्पर्श केलेले अन्न अभक्ष्य आहे.

भोजनं तृणकेशादिजुष्टमुष्णीकृतं पुनः ।
शाकावरान्नभूयिष्ठमत्युष्णलवणं त्यजेत् ॥ [xii] - कसु, केस, माशी पडलेले, पुन्हा पुन्हा गरम केलेले, ज्यात पाला विपुल प्रमाणात वापरण्यात आल आहे असे, ज्यात जास्त लवण आहे अश्या अन्नाचा परित्याग करावा.

देवतार्थं हविः शिग्रुं लोहितान्व्रश्चनांस्तथा ।
अनुपाकृतमांसानि विड्जानि कवकानि च ॥ [xiii] देवतांसाठी राखून ठेवलेले, हवनसाहित्य, वृक्ष कापल्यानंतर त्यातून निघणारा चीक, यज्ञात आहूत पशूंचे मांस, विष्ठेच्या ठिकाणी उगवलेले या प्रकारचे अन्न अभक्ष्य असल्याचे सांगण्यात आले आहे.

शवमांस खाणारे लांडगा, गिधाडादि पशु-पक्षी, चोचीने भक्ष्याचे लचके तोडून खाणारे घार, गरूडादि पक्षी, सारस, हंस, डोमकावळा व ग्रामीण पक्षी अभक्ष्य असल्याचे सांगण्यात आले आहे. ज्या घरी सुवेर किंवा सूतक असते अशा घरचे अन्न आणि पाणी ग्रहण करण्यायोग्य नसते.

गहू, जवस, दूध इ. युक्तपदार्थ तसेच तूपादि स्निग्धपदार्थयुक्त खाद्यपदार्थ काही दिवसांच्या कालावधीनंतरही खाण्यायोग्य असल्याचे सांगण्यात आले आहे.

अभक्ष्याः ब्राह्मणैर्मत्स्याः शल्कैर्ये वै विवर्जिताः ।
चतुष्पात् कच्छपादन्यो मण्डूका जलजाश्च ये ॥ [xiv] काटारहित मासा, कासव, बेडूक यांना वगळता चार पाय असलेले पशु अभक्ष्य असल्याचे सांगण्यात आले आहे.

वाग्भटलिखित **अष्टाङ्गहृदय** या ग्रन्थात हितभुक्, मितभुक् आणि ऋतभुक् म्हणजेच शरीरस्वास्थ्याच्या दृष्टिने हितकारक ठरणारे, योग्य प्रमाणयुक्त असे आणि त्या त्या ऋतुंमध्ये उपलब्ध होणारे अनुरूप अन्न जो भक्षण करतो तो निरोगी राहतो असे सांगीतले गेले आहे.

निष्कर्ष - प्राचीन काळापासूनच योग्य आहारास जीवनाचे अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण अंग मानण्यात आले आहे. आपल्या धर्मशास्त्रांतून विवेचन करण्यात आलेल्या विविध विषयांवरील अनेक मुद्यांपैकी - जरी ते कालबाह्य गणले गेले असले तरी - भक्ष्याभक्ष्य या मुद्द्याकडे आपण सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. अभक्ष्य म्हणून शास्त्रोल्लेखित ज्या अन्नाचे सेवन केल्याने सद्यकालीन दुष्प्रभाव अवघे विश्व अनुभवत आहे, त्यावरून यापुढे सर्वांनी सावधानता बाळगली पाहिजे. कोणत्याही गोष्टीची शहानिशा करणे आवश्यक असते असे मानले तरी काही गोष्टी दुसऱ्याच्या अनुभवांचा आधार घेऊन करणे कैकवेळा हितावह ठरते.

मनुष्याच्या क्रिया, संसर्ग, दृष्टी, भाव, आचारादींच्या रूपाने दूषित अन्नात त्या मनुष्याचे पापकर्म वसलेले असते. हे अन्न खाणे म्हणजे पापभक्षण करणेच होय. अश्या सदोष अन्नग्रहणाने मानवाची मानसिकता मलीन होते. मलीन किंवा कलुषित मानसिकता धारण करणाऱ्यास धर्म जाचक वाटतो आणि तो धर्माला अधर्म व अधर्माला धर्म मानून तदनुरूप आचरतो. अधर्मयुक्ताचरण म्हणजेच धर्माचरण मानणाऱ्या व्यक्तिंमध्ये ब्रह्म, ब्रह्मविद्यादि आध्यात्मिक विषयांत आसक्ती असल्याचे जाणवत नाही. अन्नातील दोषामुळेच भगवंतावर तसेच यज्ञ - दान - तप - कर्म यांवर त्यांना श्रद्धा नसते. म्हणून निषिद्ध अन्न सर्वथा परिवर्जित करावे. खाण्यायोग्य अन्न खाल्ल्याने चित्तशुद्धी होते म्हणून चित्तशुद्धी करणारे सात्त्विक अन्न भक्षण करावे.

सन्दर्भग्रन्थसूची

१. **अष्टाङ्गहृदयम्**,दिल्ली ,चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान ,ब्रह्मानन्द त्रिपाठी .डॉ , २०१४.
२. **छान्दोग्योपनिषद्**, रायबहादुर बाबू जालिमसिंह, नवलकिशोर प्रेस, लखनऊ, १९२९.
३. **संस्कृत साहित्य का इतिहास**, वाचस्पति गैरोला,
चौखम्बा विद्याभवन वाराणसी - १, १९६०.
४. **संस्कृत साहित्य**, शारदानगर, काशी, १९४८.
५. **गौतमधर्मसूत्राणि**, डॉ. उमेशचन्द्र पाण्डेय,
चौखंबा संस्कृत सिरीज ऑफिस, वाराणसी - १, १९६६.
६. **याज्ञवल्क्यस्मृतिः**, डॉ. उमेशचन्द्र पाण्डेय,
चौखंबा संस्कृत संस्थान, वाराणसी, १९९४.
७. **श्रीमद्भगवद्गीता**, गीताप्रेस गोरखपुर, २०१९.
८. **आपस्तम्ब धर्मसूत्र**, हरदत्त मिश्रा,
चौखंबा संस्कृत सिरीज ऑफिस, वाराणसी - १, १९३२.
९. **मनुस्मृतिः**, पं. गिरिजाप्रसाद द्विवेदी, नवलकिशोर प्रेस, लखनऊ, १९१७.
१०. **A Sanskrit - English Dictionary**, Sir Monier Monier-Williams, Oxford, 1956
११. **कूर्मपुराण**।
१२. **महाभारत -शान्तिपर्व**।

मेदिनीकोशः ।

---

[i] श्रीमद्भगवद्गीता । (३.१४)

[ii] अ□न्नमयं हि सोम्य मनः । (छा.उ. ६.५.४)

[iii] कूर्मपुराण । (उत्तरभाग अ. १७.१)

[iv] अष्टाङ्गहृदयम् (१.५.२७)

[v] आपस्तम्बधर्मसूत्र । (प्रश्न१-पटल५-कण्डिका१७-२३)

[vi] अष्टाङ्गहृदयम् (१.५.२५)

[vii] आपस्तम्बधर्मसूत्र । (प्रश्न१-पटल५-कण्डिका१७-२४)

[viii] गौतमधर्मसूत्र । (२.८.३४)

[ix] गौतमधर्मसूत्र । (२.८.३५)

[x] गौतमधर्मसूत्र । (२.८.३६)

[xi] याज्ञवल्क्यस्मृतिः । (अ. १ - १६७, १६८)

[xii] अष्टाङ्गहृदयम् । (१.८.३९)

[xiii] याज्ञवल्क्यस्मृतिः । (अ. १ - १७१)

[xiv] महाभारत - शान्तिपर्व । (अ. ३६.२२)

****

List of Contributors

Prof. (Dr.) Nanda Puri,

Professor & Dean, Faculty of Sanskrit and other Languages, KKSU

Dr. Neeraj Tiwari,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Prof. (Dr). Kavita Holey,
HOD, Department of Sanskrit Language & Literature, KKSU

Prof. (Dr.) Parag Joshi,
Professor, Department of Sanskrit Language and Literature, KKSU

Dr. Jitendrakumar Raiguru,
Asst. Professor, CSU, Mumbai Campus, Mumbai

Dr. Hrishikesh Dalai
Director, ODL, KKSU

Dr. Somnath Dash,
Asst. Professor, Research Publications Department, NSU, Tirupati

Dr. Jaywant Choudhari,
Assistant Professor, Vyakaran Vibhag, KKSU

Dr. Pallavi Kavale,
Assistant Professor, Dept. of Sanskrit Language and Literature, KKSU

Nisha Rameshwar Choudhary,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Rohini Nande,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Dr. Saurabh Dwivedi,
Assistant Professor, Buddha Postgraduate College, Kushinagar(U.P.)

Pratik Joshi,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Dr. Amruta Bhuskute,
Asst. Professor, Smt. Binzani College, Nagpur.

Sayali Peshwe-Deshpande,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Ms. Anagha Pradeep,
Research Scholar, Chinmay Vishwavidyapeetham, Kerala

Dr. Ramakrishna Pejathaya,
Associate Professor, Chanakya University, Bangalore.

Dr. Suchitra G. Doddoli,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Dr. Gururaj R. Doddoli,
Researcher, R.M.O, Kaivalyadham Lonavla - Research scholar

Dr. Raghavendra Bhat,
Assistant Professor, School of Shastric Learning, Sahitya, KKSU

Dr. Sharad Bhalekar
Asst. Professor, Kaivalyadham Institute, Lonavala.

Arpita Harde,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Dr. Rajendra C. Jain -
Assistant Professor, Dept. of Sanskrit Language and Literature, KKSU

Debabrata Santosh Kumar Chatterjee,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Dr. Shweta Sharma,
Assistant Professor, School of Shastric Learning English, KKSU

Mrs. Anjali Sunil Joshi,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Madhura Kayande,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Rohini R. Deshmukh,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Vaishnavi Jagannath Patil,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Mridula Atul Tapas,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Mr. Rajendra Meshram,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Sarita Rajendra Gillarkar,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Suvarna Sanjaykumar Kewte,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU

Bharti Vijay Kolekar,
Research Scholar, Dept. of Sanskrit Language & Literature, KKSU